रावबहादुर.

रावबहादुर पर्वत्या.

स्त्रियोपयोगी उत्कृष्ट पुस्तकें.

१	धाकट्या सूनबाई (कापडी). ०–१२–० (साधी).	०–८–०
२	संसारांतल्या गोष्टी.	०–६–०
३	गुणसुंदरी (कापडी). १–०–० (साधी).	०–१२–०
४	नवयुग (कापडी). १–०–० (साधी).	०–१२–०
५	सरस्वती (कापडी). ०–१४–० (साधी).	०–१०–०
६	द्रोणसंकोप.	०–६–०
७	विलक्षण भोळेपणा.	०–८–०
८	सुंदर माधव (कापडी). ०–१४–० (साधी).	०–१०–०
९	रावबहादुर पर्वत्या (कापडी). ०–८–० (साधी).	०–६–०
१०	कुसुमगुच्छ (कापडी). ०–६–० (साधी).	०–४–०
११	रमामाधव.	०–४–०
१२	सुरारराव.	०–४–०
१३	हंसदूत.	०–२–०
१४	मोहनतारा.	०–२–०
१५	स्त्रियांचीं कर्तव्यें (कापडी).	१–०–०

सर्व पुस्तकांस टपालहंशील निराळें पडेल.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव–मुंबई.

गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते ।

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.

पुस्तक ९ वें.

रावबहादुर पर्वत्या.

[एक पांच अंकी प्रहसन.]

हें

फ्रेंच कवि मोलिएर यांच्या ' ल्बुर्ज्वा जान्तिल्ऑम '

ह्या नाटकाच्या आधारानें

श्रीयुत हरिश्चंद्र आनंदराव तालचेरकर, बी. ए.,

यांनीं लिहिलें.

" Indeed Moliere you have never yet done any thing which has amused me more, and your piece is excellent ! "

LOUIS XIV. KING OF FRANCE.

[प्रथमावृत्ति]

मुंबई,

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी.

सपटेंबर १९०४.

Printed at the "Nirnaya Sagar Press"
BOMBAY.

प्रकाशकांचे दोन शब्द.

नोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीच्या पुस्तकमालेपैकीं प्रस्तुत पुस्तक ९ वें असून तें युत हरिश्चंद्र आनंदराव तालचेरकर, बी. ए., यांनीं फ्रेंच कवी मोलीएर यांच्या बुर्ज्वा जान्तिल् ऑम'या पुस्तकाच्या आधारें लिहिलें आहे. या पुस्तकाविषयीं गण्यासारखें जें कांहीं आहे तें लेखकानें स्वताच्या प्रस्तावनेंत सांगितलेंच हे. पुस्तक वाचकांपुढें आहेच, तेव्हां तें कसें काय वठलें आहे हें आम्हीं गण्यापेक्षां त्यांनींच ठरवावें हें बरें.

सांप्रत आपल्या लोकांमध्यें अगदींच कमी असलेली वाचनाभिरुची वाढण्यास बोध, मनोरंजक आणि हितकर अशीं पुस्तकें सुबक रीतीनें आणि स्वल्प किंमतींत िद्ध होण्याची फार आवश्यकता आहे. मनोरंजक ग्रंथप्रसारकमंडळीनें या ीं आपल्या अल्प सामर्थ्याप्रमाणें प्रयत्न चालविल्याचें वाचकांच्या अनुभवास लेंच असेल. मनोरंजक ग्रंथांपैकीं फक्त कादंबऱ्या प्रसिद्ध करण्याकडेच जपर्यंत मंडळीनें विशेष लक्ष्य दिलें होतें; परंतु आतां कादंबऱ्यांबरोबरच माजिक, ऐतिहासिक, पौराणिक संगीत आणि गद्य नाटकें आणि प्रहसनेंहि ाळीपाळीनें लोकांपुढें मांडण्याचें मंडळीनें योजिलें आहे. या कामीं लेखकवर्गाचें ंडळीला योग्य साह्य मिळेल, अशी उमेद आहे. लेखकांस यथाशक्त्या 'शेला-गोटें' देण्याचा मंडळी मनःपूर्वक यत्न करीलच; परंतु सांप्रतच्या निकृष्ट स्थतींत 'भरजरी शेला व नारळी पदरी चंदेरी पागोटें' याकडेच केवळ दृष्टी न देतां आपल्या मातृभाषेची हौसेनें आणि भक्तिपूर्वक सेवा करण्यांत आनंद मानणारे होतकरू लेखक पुढें येण्याची फार आवश्यकता आहे. ह्या देशकार्यासाठीं प्रकाशकांनीं आणि त्याचप्रमाणें लेखकांनींहि थोडथोडी झीज सोसून या दिशेनें ानें उद्योग चालविल्यास महाराष्ट्र वाङ्मयाची सांप्रतची निकृष्टावस्था अंशतःतरी वकरच सुधारेल, अशी उमेद बाळगण्यास बरीच जागा आहे.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीचें
ऑफिस, गिरगांव मुंबई,
ता० ३० सपटेंबर १९०३.

काशीनाथ रघुनाथ मित्र,
म. ग्रं. प्र. मंडळीचे व्यवस्थापक.

प्रस्तावना.

"So much laughter, so much life enjoyed."

—*Burns.*

थट्टाविनोद ह्मटला ह्मणजे त्यांत असभ्यपणा, अश्लीलता, बाष्कळपणा, अचकटविच शृंगार इत्यादि प्रकार असलाच पाहिजे, सभ्य प्रकारचा थट्टाविनोद तो वास्त थट्टाविनोदच नव्हे, अशा प्रकारचीच बहुतेक आमच्या लोकांची अगदीं अलीकडेप समजूत होती व अद्यापिहि थोडीबहुत कां—वरीच आहे. पाश्चिमात्य लोकांचें सभ्य विनोदानें जसें मनोरंजन होत असतें, तसें आमचें होत नाहीं; आमच्या मनोरंजन सभ्य थट्टाविनोदापेक्षां बाष्कळ थट्टाविनोदच जास्त पसंत पडतो, हें सध्या लोकां असणाऱ्या नाटकांनीं सिद्ध केलेंच आहे.

सभ्य थट्टाविनोदापेक्षां असभ्य थट्टाविनोदच आह्मांला जास्त आवडूं लाग अशी आमची अभिरुची अवनत दशेला पोहोंचण्याचीं जीं कित्येक कारणें आहेत, त्यांत प्रख्यात अमेरिकन विनोदी ग्रंथकार 'मार्कत्वेन' यांनीं आमची पारतंत्र्यावस्था हें एक प्रमुख कारण असल्याचा आपला अभिप्राय प्रगट केला आहे. हे गृहस्थ कांहे वर्षापूर्वीं हिंदुस्थानांत आले होते व येथील परिस्थितीचें बारकाईनें निरीक्षण केल्याव आमच्या अभिरुचीविषयीं त्यांनीं वरील मत दिलें आहे. 'मार्कत्वेन' यांचें हें ह्मणणें कदाचि खरेंहि असेल; तथापि आमची राजकीय परिस्थिति बदलून आह्मी पूर्ण स्वतंत्र होईपर्य सभ्य थट्टाविनोदांतील रहस्य ओळखण्याची आमच्या अंगीं पात्रताच येणार नाहं असें निदान आह्मांलातरी वाटत नाहीं. अवनतदशेला गेलेल्या आमच्या थट्टाविनोदाच्य कल्पनेला योग्य वळण लावणें, असभ्य शृंगाराविषयीं तिटकारा उत्पन्न करून सभ्य थट्ट विनोदाकडेच लोकांचें जास्त चित्ताकर्षण करणें, हें सुशिक्षित लोकांचें कर्तव्य आ या बाबतींत आपणांस पाश्चात्यलेखकांचें बरेंच अनुकरण करतां येण्याजोगें आहे.

आपल्या प्राचीन नाटकांत या असभ्य थट्टाविनोदास फारसें प्राधान्य दिलेलें आढव नाहीं. तर उलट जागोजाग सभ्य विनोदच दृष्टोत्पत्तीस येतो. सभ्य विनोदास हद्दप करून त्याची जागा ग्राम्य विनोदानें बळकावण्याचा समय अर्वाचीन नाटकांत आ अर्वाचीन रंगभूमीवरचाच आहे, असें ह्मटल्यास फारसा वस्तुविपर्यास होणार नाहीं. स पांसष्ट वर्षांपूर्वीं सांगलीकर संस्थानिकांच्या आश्रयाखालीं प. वा. विष्णुपंत भावे यां प्रथमच महाराष्ट्रांत नाटकें करण्याचा क्रम सुरू केला तेव्हां त्यांत हा ग्राम्य विनोद फार

ता. परंतु भावे यांच्या मागून ज्या नव्या कंपन्या अवतीर्ण होऊं लागल्या, त्यांत क्षित मंडळी क्वचितच असल्यामुळें, हळूहळू नाटकाचें स्वरूप बदलूं लागलें. विदुषकाचा कळपणा कळसास पोंचूं लागला. हिंदूंचीं पूज्य दैवतें गणपती, सरस्वती यांनां रंगभूमी- न पिटाळून लावणाऱ्या संगीत नाटकांचा प्रादुर्भाव होण्यापूर्वी बिचाऱ्या गणपतीची षकाच्या पात्राकडून जी थट्टा होत असे व भाविक लोकांस प्रत्यक्ष आपल्या देवतांची वना पहाण्यांत कौतुक वाटत असे, त्या काळीं इतर अचकटविचकटपणा किती बोकाळला ल, याची सहज कल्पना होण्यासारखी आहे ! ह्यासंबंधानें युरोपियन प्रेक्षकांनीं* ं आपला तिटकारा व्यक्त केलेला आहे. श्रीगजाननाची सोंड उपटण्यापर्यंतच्या षकाच्या अतिक्रमानें व दुसऱ्या धांगडधिंग्यानें प्रेक्षकांचें व्हावेंतसें मनोरंजन होत अशी नाटकवाल्या मंडळीची समजूत असल्यामुळें प्रेक्षकांच्या करमणुकीला अन्य न हुडकून काढण्याकडे त्यांची प्रवृत्ति बरेच दिवसपर्यंत न झाल्यास त्यांत आश्चर्य वयास नको. तथापि ह्या जुन्या पद्धतींत थोडीशी नवीन तऱ्हेची सुधारणा करणाऱ्या र्सा'चा प्रवेश आपल्या रंगभूमीवर पहिल्यानें कसा झाला व या फार्साची मूळ ना सुचण्यास काय कारण घडलें, याची त्रोटक हकीगत येथें देणें अप्रासंगीक लसें वाटत नाहीं.

'फार्स' ह्या शब्दाचा त्या वेळेस व हल्लींसुद्धां कसा विपरीत अर्थ होत आहे ज्यांनीं 'नारायणराव पेशव्यांच्या वधाचा फार्स', 'अफझुलखानाचा मृत्यूच्या फार्स', रे छोटेखानी ऐतिहासिक नाटकांच्या जाहिराती वाचल्या असतील त्यांनां मजण्यासारखें आहे. परंतु मूळ फार्साची कल्पना, प. वा. बाळा कोटीभास्कर यांस ळीसपन्नास वर्षांपूर्वी, मुंबईतील ग्रांटरोडवरील कै. नाना शंकरशेट यांच्या बादशाही एटरांत इंग्रजी कंपन्यांचीं नाटकें पाहून सुचली. असें समजतें कीं, इंग्लिश नाटक- ल्यांचा आपल्या नाटकाचे शेवटीं एखादा फार्स करून दाखविण्याचा सांप्रदाय असे. इंग्रजी फार्स पाहून पौराणिक नाटकांतहि असाच एखादा फार्स घातल्यानें प्रेक्षकांचें चित्त धेल अशी कल्पना प्रथम प. वा. बाळा कोटीभास्कर यांच्या डोक्यांत आली व ती ांनीं लवकरच ठाणें येथें अमलांतहि आणिली. नेहमींप्रमाणें त्यांच्या नाटकमंडळीचा ीताहरण' ह्या नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर चालला असतां, एका अंकाच्या शेवटीं डदा पडून आतां पुढील अंकास सुरुवात होणार इतक्यांत रंगभूमीवर एक साठसत्तर र्षांचे वृद्ध बुवा एकदम ओरडत येऊन नाटकाच्या मॅनेजरांस हांका मारित सुटले. नेजर चकित मुद्रेनें बाहेर येऊन काय गडबड आहे ह्मणून तपास करताहेत तों ह्मातारे

Mrs. Guthrie ह्या ग्रंथकर्त्रीनें आपल्या "Life in Western India" ह्या स्तकांत ह्यासंबंधानें येणेंप्रमाणें ह्मटलें आहे:— * *The manager and the own who amidst the derisive laughter of the audience fairly ustled the heavenly personages off the stage. * * * It was ppalling to see the divinities to whom millions of people bow own in worship treated with such indignity!"

गृहस्थ अधिकच गलबला करून कपाळावर हात मारून घेत ह्मणाले "अहो ! दगा, दगा ! मॅनेजरसाहेब, पहिल्यानें तुह्मी खेळ बंद करा. माझ्या पंधरा वर्षांच्या तरुण सुंदर स्त्रीला कुणी छानछुक तरुणानें भुलथाप देऊन पळविली आहे व तीं दोघें आज तुमच्या नाटकास आलीं आहेत, अशी मला एकानें बातमी दिल्यावरून मी हा धापा टाकित इथें आलों आहें-तर माझ्या बायकोचा तपास करून तिला माझ्या हवालीं करा. माझी बायको मला मिळेपर्यंत मी तुह्मांला तुमचें नाटक करूं देणार नाहीं ! " त्या ह्मातार्‍यानें याप्रमाणें मध्येंच स्टेजवर अशी गडबड करून नाटकाच्या रंगाचा भंग केल्यामुळें प्रेक्षकवर्ग त्याच्यावर प्रथम संतापून गेला; तथापि त्याची दयाजनक स्थिति ऐकतांच सर्वांना त्याची करुणा आली व त्यांनीं ओरडून "पहिल्यानें ह्या ह्मातार्‍याच्या तरुण स्त्रीचा तपास करा," असा एकच गोंगाट आरंभिला. "अहो ह्मातारेबुवा, घाबरूं नका, तुमच्या कुटुंबाचा शोध लावितों," वगैरे प्रकारें मॅनेजरांनीं त्या वृद्धास आश्वासन दिलें, तथापि त्याचें समाधान होईना व प्रेक्षकांतील गलबलाहि कमी होईना. जो तो स्त्रियांच्या गॅलेरीकडे पाहूं लागला. या वेळीं बिचार्‍या स्त्रीप्रेक्षकांसतर मेल्यापेक्षांहि मेल्यासारखें होऊन गेलें. आपल्या शेजारीं बसलेली अनोळखी स्त्रीतर या ह्मातार्‍याची पळून आलेली दुर्व्यसनी स्त्री नसेलना? ह्या शंकेनें जी ती भिऊन गेली व आपल्याला आज ही कुठली दुर्बुद्धि सुचली व आपण नाटक पहावयास आलों, असें प्रत्येकीला झालें ! शेवटीं त्या गर्भगळित झालेल्या स्त्रीसमाजांत मॅनेजराला संगातीं घेऊन ते जरठ नवरदेव शिरले व त्यांनीं कोंपर्‍यांत खालीं मान घालून बसलेल्या एका तरुण स्त्रीचा हात धरून तिला फरफटत स्टेजवर ओढित आणिलें. नंतर मॅनेजरसाहेबांनीं त्या जरठ नवरदेवास आपल्या कुटुंबास अशी मोकळीक न देण्याविषयीं बोध करून त्याची बोळवणूक केल्यावर, जरठतरुणीविवाहापासून होणार्‍या दुष्ट परिणामांचें प्रेक्षकांच्या मनावर उत्कृष्ट चित्र बठविलें, व शेवटीं हंसतहंसत सांगितलें कीं "मघांचे ह्मातारेबुवा आणि त्यांचें कुटुंब हें दांपत्य आमच्या नाटकांतीलच पात्रें होतीं ! ह्मातार्‍याची स्त्री खरोखरीची स्त्री नसून एका पोरानें तें सोंग घेतलें होतें !" हें ऐकतांच प्रेक्षकांत जो हंशा पिकला, तो पुसूं नये ! जो तो मॅनेजराच्या या विलक्षण कृतीचें कौतुक करूं लागला ! नंतर पुनः पौराणिक खेळास सुरुवात झाली. परंतु मशारनिल्हे कंपनीस हा किंवा अशा प्रकारचा 'फार्स' करण्याचें नंतर धैर्य झालें नाहीं. कारण त्या दिवसा-नंतर कोणतीहि सभ्य स्त्री नाटक पहावयास धजेनाशी झाली; आणि ह्याचमुळें हळूहळू फार्सची दिशा बदलत जाऊन फार्स ही संज्ञा ऐतिहासिक किंवा इतर छोटेखानी नाटकांस मिळूं लागली, व त्याचें कारण वर दर्शविलेलेंच असावें, अशी कित्येकांची अटकळ आहे व ती फारशी चुकीची होईलसें वाटत नाहीं.

एकंदरीनें फार्स किंवा हास्यरसप्रधान नाटकें व प्रहसनें यांचा प्रवेश पाश्चिमात्यां-पासूनच आमच्या रंगभूमीवर झाला. परंतु आमच्या नाटकमंडळ्यांची स्थिति असावी तशी नसल्यामुळें आणि अशिक्षित वर्गाचाच विशेषतः नाट्यकलेशीं निकट संबंध जडूं लागल्यामुळें नाटकवाल्यांनीं आमची अभिरुची अगदीं नीच स्थितीस आणून पोहोंचावेली

व अश्लील शृंगार, बाष्कळपणा आणि ग्राम्य विनोद याशिवाय आमचें मनोरंजन होईनासें झालें आहे. ही शोचनीय स्थिति पाहून कै. वा. शंकर मोरो रानडे, प्रो. केळकरप्रभृति मंडळींनीं, इंग्रजी पुस्तकांच्या आधारानें कित्येक हास्यरसप्रधान नाटकें व प्रहसनें मराठींत रचिलीं. या प्रयत्नापूर्वीं प्रहसनांची कल्पना आपल्या लोकांस फारशी नव्हती, असें म्हटलें असतां चालेल. हीं इंग्रजींतील प्रहसनें मराठी वाचकांचें मनोरंजन करण्यास येत आहेत तोंच कित्येक प्राचीनाभिमानी लोकांस स्फुरण चढून त्यांनीं आपल्या सामाजिक स्थिती-संबंधानें प्रहसनें लिहिण्यास कंबर बांधिली व या लेखकांपैकीं कित्येकांनींतर आपल्या पुस्तकांत थट्टाविनोदाचा अतिरेक केल्यामुळें त्यांस सरकारदरबार पहाण्याचीहि पाळी आली होती ! आमच्या लोकांच्या थट्टाविनोदाबाबतींतील अवनत अभिरुचीला बळी पडणें, हेंच या लेखकांची आपल्या पुस्तकांतून अश्लीलपणा भरण्याकडे प्रवृत्ति होण्याचें कारण असलें पाहिजे. असो.

कॉलेजांत असतांना फ्रेंच वाङ्मय हा आवडीचा विषय बी. ए. च्या परीक्षेसाठीं घेतल्या-मुळें फ्रेंच कवींचीं वरीचशीं नाटकें आह्मांला वाचावीं लागलीं होतीं. त्यांतील मोलिएरच्या हास्यरसप्रधान नाटकांतला सभ्य थट्टाविनोद पाहून या पुस्तकांचें कोणीं मराठींत रूपांतर केल्यास ग्राम्यपणाकडे वळलेल्या आमच्या लोकांच्या अभिरुचीस योग्य वळण लागेल व सभ्य थट्टाविनोदानें त्यांनां आपली करमणूक करून घेतां येईल, अशी आमची खात्री होऊन चुकली. तत्रापि मराठींत लिहिण्याचा व्यासंग नसल्यामुळें हें कार्य स्वतां पत्करण्याचें आम्हांस धैर्य होईना. असें असतांहि हें पुस्तक लिहिण्याकडे आमची प्रवृत्ति होण्याच्या कारणाचा येथें उल्लेख केल्याविना रहावत नाहीं. एके दिवशीं मोलिएरचें ' लबुर्ज्वा जान्तिल ऑम ' हें हास्यरसप्रधान नाटक आह्मी वाचित असतां त्यांतील एका प्रवेशाचे वेळीं स्वतांशींच मोठमोठ्यानें हंसत सुटलों. त्या वेळीं जवळच कुटुंब बसलें होतें. त्यांनीं आमच्या हंसण्याचें कारण उत्सुकतेनें विचारल्यामुळें सदरील नाटकांतील त्या प्रवेशाचें मराठींत भाषांतर करून सांगितलें. त्यानें त्या पुस्तकासंबंधीं अधिकच उत्सुकता उत्पन्न होऊन त्या पुस्तकाचें समग्र भाषांतर करण्याविषयीं कुटुंबानें आमच्या पाठीशीं सारखा तगादा लाविला व केवळ त्याच तगाद्यामुळें आह्मांला 'लबुर्ज्वा जान्तिल ऑम'ला 'रावबहादूर पर्वत्या'चा मराठी वेश चढवावा लागला. पुढें दुर्दैवानें कुटुंब निवर्तल्यामुळें या पुस्तकाची हस्तलिखित प्रत तशीच एकीकडे पडून राहिली होती. मागील सर्व गोष्टींची आठवण होऊन मन उदास होई व या पुस्तकाकडे ढुंकूनहि पाहूं नये, असें वाटे. यामुळें दोनचार वर्षें हें जागच्याजागीं तसेंच पडलें होतें. परंतु प्लेगच्या धामधुमींत पदवीदाना-संबंधानें जें विलक्षण औदार्य दृष्टीस पडलें त्या वेळीं कित्येक पदवीधरांचे चाळे पाहून आमच्या ' रावबहादुर पर्वत्या'ला बाहेर आणल्यास तोहि महाराष्ट्र वाचकांचें थोडेंबहुत मनोरंजन करील असें कांहीं स्नेही मंडळींचें मत पडल्यावरून हें पुस्तक लोकांपुढें मांडण्याचें धैर्य करित आहों. हें पुस्तक आमच्याकडून—सक्तीनेंहि म्हटलें तरी चालेल—तयार कर-विणाऱ्या आमच्या प. वा. प्रियपत्नी सौ. ताराबाई आज जर हें प्रसिद्ध झालेलें पहाण्यास

जिवंत असत्या तर खरोखर त्यांनां फार समाधान झालें असतें. याप्रसंगीं त्या दुःखद गोष्टीच्या आठवणीनें अंतःकरणाची चमत्कारिक स्थिति होते! असो.

प्रस्तुत पुस्तक फ्रेंचकवि मोलिएर याच्या 'लबुर्ज्वा जान्तिल ऑम'ची प्रतिकृति आहे, हें वरती सांगितलेंच आहे. मोलिएरचें हें नाटक सर्व युरोपखंडांत फारच प्रिय झालें आहे इतकेंच नाहीं, तर इंग्लंडांत निरनिराळ्या नाटककारांनीं याच्या साह्यानें सात नाटकें * रचिलीं आहेत. फ्रान्स देशाचा सुप्रसिद्ध राजा चौदावा लुयी यास हें किती आवडलें होतें, हें मुखपृष्ठावर दिलेल्या त्याच्या उद्गारांवरून व्यक्त होण्यासारखें आहे. होतां होईल तों मूळाला धरून चालण्याचा या पुस्तकांत प्रयत्न केला आहे; तथापि मूळ पुस्तकांतील कित्येक प्रवेश जे आपल्या रीतिरिवाजांस विसंगत दिसले ते अजीबात गाळून त्याऐवजीं थोडासा फेरबदल करून प्लाटस या गमती लॅटिन कवीच्या नाटकांतून घेतले आहेत व कित्येक नवीनच रचून घातले आहेत. मोलिएरच्या नाटकांतील maitre à danser ह्मणजे नृत्यशिक्षक हें पात्र अजिबात गाळून टाकण्यांत आलें आहे. पदोपदीं पाश्चिमात्य लोकांच्या चालीरीतींचें अनुकरण करण्याची अनावर इच्छा आमच्याकडील कांहीं व्यक्तींस असते हें सुप्रसिद्धच आहे. 'पाश्चिमात्य नृत्यशिक्षक पाहिजे!' ह्मणून एका सधन गुजराथी गृहस्थानें मुंबईच्या एका इंग्रजी दैनिक पत्रांत दिलेली जाहिरात पुष्कळांच्या वाचनांत आली असेल. तथापि वर निर्दिष्ट केलेल्या तऱ्हेचा नाद अद्यापि महाराष्ट्रांत बोकाळला नसल्यामुळें प्रस्तुत पुस्तकांतील नायक रावबहादुर पर्वत्या यांस नृत्य शिकण्याच्या भानगडींत घालणें इष्ट वाटलें नाहीं! ह्या प्रहसनांत गोंविलेल्या कित्येक गोष्टींतील क्वचित् अतिशयोक्तीचा प्रकार कित्येकांस रुचणार नाहीं; परंतु यांत वर्णन केलेल्या तऱ्हेवर कित्येक भलभलते वेडेचार प्रत्यक्ष आमच्या अवलोकनांत आले आहेत. मोठ्या गोऱ्या शिंप्याच्या कंपनीमध्यें कपडे शिवायास दिले असतां त्यांवर त्या कंपनीनें कपडे शिवणार ह्मणून स्वताच्या नांवाचा शिक्का मारला नाहीं एवढ्याचसाठीं, बील भरलें असतांहि, कपडे परत पाठवून देणारे वेडपीर या मुंबईत आम्हीं पाहिले आहेत!

मोलिएर कवीनें आपल्या पुस्तकांतील नायक मॉसिय जुर्दें यास 'मामामोचि' पदवी देऊन पदवीदानाच्या वेळेस नामधारी तुर्की राजपुत्राकडून तुर्की भाषा बोलविण्याचा जो घाट घातला आहे, त्यांत कांहींएक अर्थ नसून फक्त वेळ मारून नेण्यासाठीं व हंसें पिकविण्याकरितांच तो अर्थरहित गडबडगुंडा करविण्यांत आला आहे. मोलिएरला तुर्की भाषा अवगत नसल्यावरूनच हा गडबडगुंडा झाला व ह्या कृतीबद्दल कांहीं विद्वान् ग्रंथकारांनीं त्याला दूषण दिलें आहे. तथापि कांहीं मर्मज्ञ फ्रेंच लेखकांचें ह्याबद्दल उलट मत असून त्यांनीं ह्या गडबडगुंड्याबद्दल मोलिएरची तारीफ करून त्यामुळेंच खेळास जास्त रंग आला आहे असें ह्मणून दाखविलें आहे. प्रस्तुत पुस्तकांतील नायक

* Scaramouch; Philosopher; Harlequin and a Schoolboy; Bravo; Love and a bottle; The Commissary; The Mamamouchi or The Shop-keeper turned a Gentleman.

पर्वतराव यास मामामोचि ह्या पदवीऐवजीं राजाफत्तेहेधुडिमसंगबहादुरसादअलरिंद ह्मणजे 'अत्यंत मूर्ख विक्षिप्त बुवाजी' अशा अर्थाची पदवी देण्यांत आली आहे. पांग्या (दिवाणजी) व विश्वासराव (कुमार) यांच्या तोंडीं फारशी भाषेचा उपयोग केला आहे, तींत मुद्दाम बडेबडे शब्द घालून कांहींकांहीं ठिकाणींतर मुद्दाम अर्थरहित गडबडगुंडाच केला आहे. ह्याचें कारण पांग्या व विश्वासराव ह्यांस फारशी भाषा येत नसल्यामुळें त्यांनीं कांहींतरी वाक्यें पाठ करून ठेविलीं होतीं, परंतु ज्या वेळेस पांगोजीरावांस दुभाष्याचें काम करण्याचा प्रसंग येतो तेव्हां, व आयत्या वेळेस बोलावें लागतें तेव्हां त्याच्या तोंडीं मुद्दाम अशुद्ध फारशी भाषा देऊन त्यास कांहींतरी बडबड करण्यास लाविली आहे. तथापि उर्दुभाषा जितकी शुद्ध देतां येईल तितकी देण्याचा प्रयत्न केला आहे. हें प्रहसन कोणत्याहि व्यक्तीस उद्देशून लिहिलें नसून व्यवहारांत आपण जो प्रकार पहातों तोच थोडीबहुत अतिशयोक्ति करून यांत वर्णिला आहे, हें येथें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

ह्या आमच्या पहिल्याच प्रयत्नांत दोष असणें साहजिक आहे. तथापि प्रसिद्ध आंग्लकवि ड्रायदन यांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

"Errors like straws upon the surface flow
"He who must search for pearls must dive below."

या ड्रायदनच्या उक्तीकडे लक्ष्य देऊन त्या दृष्टीनेंच वाचक या प्रयत्नाकडे पहातील अशी आशा बाळगितों.

फर्ग्युसन रोड–मुंबई,
ता० २१ सपटेंबर १९०४.

ह. आ. तालचेरकर.

पात्रें.

रावबहादुर पर्वत्या–रावबाहादुरीची पदवी मिळालेला एक गांवढेकरी.

विश्वासराव–रावबहादुरांचे भावी जामात.

यशवंतराव–रावबहादुरांचा एक दिवाळखोर स्नेही आणि निंबाजीरावांचा पुतण्या (हंसाबाईशीं पुनर्विवाह करूं इच्छिणारा).

निंबाजीराव–एक कृपण श्रीमान गृहस्थ.

पांग्या–विश्वासरावांचा नोकर.

पिल्या–यशवंतरावांचा नोकर.

दौलत्या–रावबहादुरांचा एक गांवढळ नातलग.

कहानसिंग, पांडू–रावबहादुरांचे नोकर.

गणेशसिंग–रावबहादुरांस दांडपट्टा शिकविणारा वस्ताद.

म्हाळसाबाई–रावबहादुरांचें कुटुंब.

मंजुळा–रावबहादुरांची कन्या.

हंसाबाई–एक श्रीमान विधवा.

गजराबाई, **ताराबाई** } हंसाबाईच्या मैत्रिणी.

दगडी–मंजुळेची दासी.

सारजा–हंसाबाईची दासी.

शास्त्रीबोवा, गवयी, कारकून, आचारी, दरजी, इ. इ. इ.

रावबहादुर पर्वत्या.

[एक पांचअंकी प्रहसन.]

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

[स्थल—रावबहादुरांचा दिवाणखाना. खुर्च्या, टेबल, कोच, गालीचा वगैरे इंग्रजी तऱ्हेच्या सामानानें दिवाणखाना शृंगारला आहे. एका इझीचेअरवर रावबहादुरांचे परम मित्र यशवंतराव हातपाय पसरून घोरत पडले आहेत. पांडू कोचावरील धुरळा हातरुमालानें झाडित आहे असा प्रवेश.]

पांडू—(स्वगत) इची भन, ह्ये ह्मन रावभादुर झाल्याती! कसल रावभादुर आन् कसल काय! मस्नीतर त्येंचमंदी कायबी फरक दिसत नाय पगा! धनीसाब अद्गर जिक्त कोलशावानी काळ ढूस्स व्हत तिक्तच अजूनबी हैती. उंचीबी हाय तिकतीच हाय. पून डोईतून अक्शी पार ग्येल्याती? आतास धनीसाबांनीं ह्यो काय परकार मांडला हाय पगा. योक दिनबी सुना न्है जात. रोज कायना काय आपल हायेच! आज म्हन त्या ल्योकाला मिजवानी हाये, उंद्यां म्हन त्या गवईबावांचं गानं हाये, परवां म्हन त्या नायकिनीचा नाच हाये, येऱ्या दिसा मुरल्यांचा तमासा! शीः शीः शीः! काय हे ढंग आन् रंग मांडले हायती त्यांच त्येनाच ठाव! आपनालातर बुआ ह्या समद्याचा म्वाप कंटाला आलाया. (थोडा वेळ थांबून) पन् अर गाडवीच्या ल्योका पांज्या! तुलार ही पंचात व्होवी कशाला? तुज्या बाच काय जात! धनीसाब करीनात का त्येंस्नी गमल त्यें. तुझ्या प्वाटांत कल कशापाई उटतिया! (कोच पुसून झाल्यावर टेबल पुसण्यास येतो तों पाठीमागें खुर्चीवर रुमाल आणि काठी पाहून चपापतो.) इची भन! ह्यो कोन हाय हकड! जनु आपल्या बाच्याच घरीं तंगड्या तानूनशेनी पडलाया. (विचार करून) व्हय, याला उटवावच आतां. (यशवंतरावांच्या जवळ जाऊन) अर शेट—शेट, ये रावसाब? अर उटा उटा. (इतक्यांत आंतून 'पांडू पांडू' अशी हांक ऐकूं येते. त्यासरसा पांडू लगबगीनें निघून जातो.)

यशवंतराव—(झोंपेंतून घाबऱ्याघाबऱ्या उठून सभोंवार पाहून) काल रात्रीं मी घरींतरी गेलों होतों ? ही कांहीं माझी खोली दिसत नाहीं, नी मी माझ्या पलंगावरसुद्धां नाहीं ! पण मीतरी मी स्वताच आहें कीं दुसराच कोणी आहे ? (डोकें चाचपतो.) मीच –मीच तो ! बरें पण बच्चाराम ! घाबरतोस कशासाठीं ? तूं कुठें आहेस याचें चांगलें स्मरण कर. (आठवल्यासारखें करून) काल रात्रीं क्लबांतून माझा जिगरजानचा दोस्त रामभाऊ डाक्तर याजबरोबर दारूच्या धुंदींत असतांना मी गेलों–हां, हां, हां, आतां आठवलें. त्यांनींच–त्यांनींच माझीन् त्या नव्या रावबहादुरांची ओळख करून दिली आणि ह्या नूतन स्नेहाचे अभिनंदनाप्रीत्यर्थ डझन दीड डझन बाटल्यांचीं डोकीं फोडून टाकल्यावर आमच्या ह्या तंगड्यांनीं घरीं जाण्याचें साफ नाकारिलें. (हंसून) झाला खुलासा—अस्मादिक येथेंच झोंपेच्या आधीन झाले. परंतु मला ह्या स्थितींत ते नवे रावबहादुर पहातील तर पुरी फजिती व्हावयाची. तर यशवंतरावजी ! चला, करा येथून पोबारा ! (रुमाल धांदलीनें डोईस गुंडाळून काठी फिरवितफिरवित मिशांला पीळ देत जाऊं लागतो; परंतु तसाच पाठच्या पायानें मागें फिरून) अरेरे ! दुर्दैव ! दुर्दैव ! तो पहा खंडूजी बेलीफ त्या कस्तूर मारवाड्यास घेऊन उभा आहे. इथून बाहेर जाणें ह्मणजे आगींतून उठून फोपाट्यांत पडणें होय ! इथून आतां मुळींच हालतां कामा नये; परंतु ह्या घरांतून कुणी येऊन मला विचारील तर त्याला काय सांगूं ? मी त्या रावबहादुरांचें नांवसुद्धां विसरून गेलों ! माझें नशीबच खडतर ! एरवीं मी ह्मणजे केवढा सालस माणूस ! देवमाणूस—अगदीं देवमाणूस ! पण माझे सर्वच शत्रू ! चांगल्या माणसांस शत्रू असणें अवश्यच ! पहा माझा धोबी, माझा शिंपी, न्हावी, कापडवाला, वाणी, गवळी, मारवाडी हे सारे हात धुऊन माझ्या पाठीस लागले आहेत; आणि ह्या कोर्टाच्या बेलिफांनींतर मला अगदीं दे माय धरणी ठाय करून सोडिलें आहे ! जिथें जावें तिथें हे आपले दत्त ह्मणून उभे ! ह्या लोकांनां व आमच्या सरकाराला दुसरा काम ना धंदा ! मीतर बुआ अगदींच वैतागून गेलों! आतां इतकें खरें कीं, मजजवळ पैसा नाहीं; परंतु तो जवळ नसला ह्मणून मी क्षुधेनें मरून आत्महत्येसारखें पातक करूं कीं काय ? इतकें बरीक खरें कीं, माझ्यांत एक व्यंग आहे आणि तें कोणतें ह्मणाल तर मला स्मरण ह्मणून मुळींच रहात नाहीं; आणि याचमुळें कुणाचें कर्ज काढलें ह्मणजे मला त्याचा विसर पडतो ! यांत तुह्मीच विचार करा पाहूं, माझा काय

अपराध आहे तो? व ह्याच पिडेमुळेंतर मी मजबरोबर हमेश एक नोटबूक घेऊन फिरत असतों. कारण स्मरण ठेवण्यासारखें कांहीं असल्यास त्यांत टिपून घेतां यावें. खरें पाहूं गेलें असतां माझा चुलता आहे लक्षाधिपती; पण स्वारी पडली कवडीचुंबक! आमच्या काकांनीं अस्मादिकांला घरांतून घालवून दिल्यापासूनतर मोठीच पंचाईत होऊन गेली आहे! त्यांच्यानंतर त्या सर्व संपत्तीचा हा पठ्ठ्या (मिशांवर ताव देतो) होणार मालक. पण मीं जादु केली, पंचाक्षरी नाचवले, नवस केले, मोहरमांत फकीरीसुद्धां घेतली, तरी पण आमचा हा बुढ्ढा काका कांहीं मरत नाहीं!–अरे, पण हा समोरून कोण येत आहे इकडे? संभाळ यशवंतराव! हा कुणीतरी बेटा गचाळ, गांवढळ दिसतोय. (दौलत्या प्रवेश करतो. त्याजकडेस पाहून दचकून) दोस्त! नमस्कार, रामराम; कोण आहेसरे तूं?

दौलत्या—मीं व्हय! मीं–तो ल्योकाचा रावभादुर न्हव का, त्यचा भाचा. माज नांव दौलू पोटल्या.

यशवंतराव—रावबहादूर?

दौलत्या—(मोठ्या आढ्यतेनें) व्हय व्हय, रावभादुराची शेटानी ती माजी फुई. त्या दगडीसंग फुई माज लगीन लावनार हाय आन् ह्मनूनशेनी मी मुल्कांतून हकड आलूया.

यशवंतराव—काय ह्मटलेंस, काय? नाहीं, मला तें माझ्या स्मरणवहींत टिपून घेतलेंच पाहिजे. नाहींतर आमचा विसराळूपणा आम्हांस पुनः नडायचा! (नोटबूक काढून त्यांत लिहितो.) दौलू–रावबाहादुरांचा भाचा–दगडीबराबर लगीन लावणार—

दौलत्या—(विस्मित होऊन) हा ल्योकाचा काय लिवतोय? काय सरकार लगीनबिगीनावरबी इण्कम् टॉकीस लागू करायाचा व्येत करतसा का काय?

यशवंतराव—बरें दौलू, इथल्या घरधन्याचें नांव काय बरें?

दौलत्या—ल्योका! तूं जर घरधन्यास्नी वलकत न्हैसा, तर मग हकडे कशा पाई आल्याशी?

यशवंतराव—(मोठ्या सभ्यतेनें) खरें सांगूं–दौलू ऊर्फ दौलतराव! मी आहें बुवा जात्याच फार विसराळू. तूं जर मला विचारलेंस मिस्टर यशवंतराव —माझें नांव यशवंतराव आहे बरें का?—तर घटकाभरानें मी माझेंच नांव विसरून जाईन! (हंसतो.)

दौलत्या—(उत्सुकतेनें) माझ्या फूयाच नांव रावभादूर पर्वल्या.

यशवंतराव—वाहवा ! रावबहादूर पर्वल्या–चला आपण माझ्या नोटबुकांत ! (लिहितो.) कालचे पार्टी देणारे नवे मित्र ते आपणच ?

दौलत्या—(आश्चर्यानें) इची भन–लईच लई इसराळू ! (इतक्यांत दगडी हातांत झाडू घेऊन येते व यशवंतरावास बाहेर पाहून मुरकतमुरकत चटकन् निघून जाते. तिला एकटी जातांना पहातांच) कशी आपसूक शिकार गवासली ? आतां जातीया कुट निसटून ! [जातो.

यशवंतराव—बरी एकदाची गेली पिडा. (खिडकीच्या फटींतून रस्त्याकडे पहात) खंडू बेलीफहि चालता झाला. रस्ता अगदीं मोकळा दिसतो. यशवंतरावजी! काढा आतां आपला रस्ता !

[मोठ्या ऐटीनें काठी फिरवितफिरवित निघून जातो.

प्रवेश २ रा.

[स्थल—रावबहादुरांची ड्रेसिंगरूम. आरसा, ब्रश,
वगैरे टायलेटचें साहित्य पडलें आहे.]

रावबहादुर—(समोर ठेविलेल्या एका युरोपियनाच्या तसबिरीकडे व आरशाकडे पाहून) झाला ! मला वाटतें या तसबिरीप्रमाणें माझा पोषाख अगदीं बरोब्बर झाला ! हा शर्ट, ही पाटलूण, हें जॅकीट (शर्ट पाटलुणींत घालून वर पाटलुणीच्या गुंड्या लावतो) हो ! अगदीं बरोब्बर ! तसेंच हे बूट, इस्टाकिनी–अरे पण मी अगदींच विसरलों ! बूट चढवितांना हा हस्तिदंताचा चमचा–अरे पण त्याला इंग्रजींत काय ह्मणतात बरें ? विसरलों–अगदींच विसरलों! हा माझा विसर मला जेथेंतेथें नडतो. बरें असो, हा बूट मीं त्याच चमच्यानें घालायचा तो हातांनींच घातला. छेः, ही फॅसिन पुनः विसरतां कामा नये. बरें, पुढें हा वरचा कोट, शर्टाचे कप,–जरा बाहेर सोन्याच्या गुंड्या दिसतील इतके–गळयाचा नेकटाय, सेंट टाकलेला रुमाल, जॅकिटाच्या खालच्या दोन्ही खिशांत–एकांत घड्याळ व दुसऱ्यांत शेडा, ह्याप्रमाणें बरोबर– अगदीं बरोब्बर सर्व बेत कसा अगदीं बरोब्बर जुळला ! ड्रेस करण्यास मी इतका

लौकर शिकलों कीं, त्याबद्दल माझी मी जेवढी तारीफ करीन तेवढी थोडीच! (पुन्हा आरशांत पाहतो) वाः, काय मजेदार पोषाख दिसतो आहे पण! मला वाटतें, माझ्या साऱ्या जन्मांत मी इतका सुरेख दिसलों नसेन! आतां हे माझे केंस जरासे रांठ दिसताहेत–अंः, त्याचें काय! ते जातील रुमालाखालीं झांकून! (इतक्यांत कांहीं आठवल्यासारखें करून) अरे हो, पण मी अगदीं विसरलों कीं! ते आमचे नवे दोस्त यशवंतराव-त्यांनीं डोक्याला कायसेंसें लावायला सांगितलें होतें तें पाहिलें पाहिजे लावून. (घड्याळाकडे पाहून) माझा कहानभय्या अजून कां बरें आला नाहीं ते जिन्नस घेऊन? (टेबलांतून कागद काढून) काय बरें 'मोमेंटम् ऑन्ड व्हॉक्सीनेशन,' कोण आहेरे तिकडे! दौलू-अरे दौलू–

दौलत्या—(प्रवेश करून) जी.

रावबहादुर—अरे, तो देवडीवरचा माझा नवीन भय्या कहानसिंग कॅम्पांतून आला असेल तर त्याला बोलावून आण. (दौलू जातो.) तेवढें तें 'मोमेंटम् ऑन्ड व्हॉक्सीनेशन' लाविलें ह्मणजे यशवंतराव म्हणतात कीं केंस कसे माथ्याला चिकटून बसतील. मग डोईवर एक रेशमी पगडी ऐटींत ठेवून द्यावी. मी सरदार घराण्यांतला नाहीं असें ह्मणण्याची कोणाची प्राज्ञा आहे! व अशा भपकेदार पोषाखांत मला जर त्या हंसाबाईनें पाहिलें, तर ती खात्रीनें मजबरोबर पाट लावण्यास राजी होईल. आणि मी इतका फॅसिनेबल होण्याचें कारण कोण ह्मणाल तर तो आमचा नवा दोस्त यशवंतराव! स्वारी जराशी पैसे उडाऊ आहे खरी, पण एकंदरींत मनुष्य मोठा मजेदार! माझ्या पूर्वीच्या आणि हल्लींच्या स्थितींत किती अंतर हें? मला वाटतें, माझा जवळजवळ पुनर्जन्मच झाला! ह्या यशवंतरावाच्या बिचाऱ्याच्या पाठीस गांवांतले सर्व बेलीफ जणूं काय हात धुऊनच लागले आहेत. चांगल्या माणसाचा ह्या जगांत कोणीच त्राता नाहीं! अरेरे! त्याचा चुलता कितीतरी निष्ठुर! मीं त्याला जर वेळेवर मदत केली नसती, तर त्याला ते लोक खात्रीनें तुरुंगांत नेऊन टाकिते! रामभाऊ डाक्तरांचे याबद्दल 'थ्यांक्स' मानिले पाहिजेत. त्यांच्याचमुळें ह्या व्यक्तीची न् माझी ओळख झाली, आणि त्या फक्कड हंसाबाईबरोबर याच्याच साह्यानें माझी ओळख होण्याची आशा दिसते.

(इतक्यांत कहान येतो.)

रावबहादुर—अरे कहान! मीं तुला आणायला सांगितलेले जिन्नस आलास का घेऊन?

कहानसिंग—हां सरकार! आप जैसा बोला था वैसाही मैं ढूंडके आया, आपनेपास आताथा तो दौलत मुजे बुलाने आया.

रावबहादुर—मग घेऊन आलास का ते जिन्नस ?

कहानसिंग—आपकी चिठी लेके मैं बडे शापमें गया, तो सब कहने लगे के यह चीजही नही है !

रावबहादुर—यू जंगली! क्या चीज-क्या चीज–नही, तुमारा बोडकं! तुम् सब् बिलकूल गव्हार है !

कहानसिंग—नही साब, मेरी बात तो सुनो! ढूंडतेढूंडते मुजे एक अदमीने कहा के वह चीज डाकितरकेपास मिलेंगी, और एक डाकीतरका मकानभी बताया.

रावबहादुर—मग पुढें काय झालें? तुला मिळाली नाहींना?

कहानसिंग—अब जरा सुनीये बहादुरसाब! मैं वो चिठी डाकीतरकु बताई, तो उन्होंनें पूछा, के ये कोन मंगताहै? तो मैं बोला, हम्. तो फिर उन्होंनें एक रुसार और बाटली निकाली और हमकु बोला, खोलो. तब मुझे कहना पडा, के ये हमारे साबकूं चाहिये. फिर वो बोला के तुमारा साबकूं ह्यां लेके आव. अभी देखो साब! ये आप गयेसिवाय कैसा बनेगा? आपकुं उदर जाके खोलना पडेगा, फिर वह चीज मिलेगा.

रावबहादुर—छे छे, हम् क्या बोला और तुम् क्या सुना? चलो व्हांसे! तुम् बडे लोकोंकेपास नोकरी कीया बोलते, मगर देखनेमें तो बिलकूल नहीं आता. क्या म्हणें हम् ऐसा बोला और हम् तैसा बोला. छत् अगदीं कुचकामाचीं माणसें हीं ! काय सांगावें या गाढवांनां ! (चवताळून त्याच्या अंगावर जातो; परंतु कहान तेथून निघून जातो. इतक्यांत गडबडींत धोतरावर नेसलेली पाटलूण खालीं घसरते.) अरे, पण हें काय असें झालें? ही पाटलूण काय अशी घसरते! अरे खरेंच, तें जॅकीट व वरून ते–हें–तें–हें–मी अगदीं विसरलों. अरे दौलू, दौलू! (दौलू येतो.) कहानला मी फिरून बोलावतों ह्मणून सांग पाहूं. बरें झालें कीं, त्याची मला इथेंच आठवण झाली. नाहींतर केवढी फजिती झाली असती? (कहान येतो.) अरे कहान, तें माझें–तें–हें–तें–आणलेलें कुठें आहे?

कहानसिंग—क्या धनीसाब?

रावबहादुर—अरे ते (बोटांनीं खुणवितो.) हें–रे!

कहानसिंग—हें तें क्या रावबहादरसाब !

रावबहादुर—अरे गाढवा, ते चामड्याचे केलेले असतात ते?

कहानसिंग—हं हं, अभी समजा सरकार. अभी ले आताहूं. (निघून जातो.)

रावबहादुर—(आरशांत पाहून) मला वाटतें, आपण आज जातांजातां हंसाबाईच्या दारावरून जावें, हें चांगलें. ती जर मला आज पाहील तर निम्मे काम झालें म्हणून समजावें. (इतक्यांत कहान घोड्याच्या लगामा व गाडीच्या पट्ट्या वगैरे घेऊन येतो.)

रावबहादुर—अरे गाढवा, ह्या घोड्याच्या लगामा न् गाडीच्या पट्ट्या कशाला आणल्यास ? (पाटलूण हातांत धरून त्याच्या अंगावर धावतो. इतक्यांत यशवंतराव येतो.)

यशवंतराव—(आपल्याशींच) हें कूळ मला साध्य झाल्यापासून माझ्या स्थितींत फरक पहा कितीतरी झाला आहे तो? माझें थोर नशीब, म्हणून यांची व माझी ओळख झाली. त्या मनहरणी हंसाबाईसंबंधानें मीं जी आशा बांधिली आहे, त्या माझ्या आशांकुराला आतां जोर आला आहे. एकदा त्या सुंदरीची ओळख करून घ्यावी ह्मणजे बस्स! आज याच्याचबरोबर दर घटकेस यास फ्याशनची तालीम देतदेत त्या पार्टीस जावयाचें. (उघड व आश्चर्यानें) छे! छे! पर्वतराव रावबहादुर, त्या बिचाऱ्यावर कां इतकी खप्पा मर्जी ?

रावबहादुर—अहो, त्या गाढवाला शर्टावरून घालायच्या पट्ट्या आणायला सांगितल्या तो गाढवाचा लेक घोड्याच्या लगामा घेऊन आला!

यशवंतराव—तुम्हांला गुंडाळायच्या पट्ट्या आणायच्या त्या घोड्याला गुंडाळायच्या आणल्या, इतकेंचना? (स्वगत) मग त्यांत कांहीं विशेष चुकला नाहीं तो! तूं लेका घोड्याच्याहि पलीकडला आहेस!

रावबहादुर—अहो हें एक राहिलें, पण काल तुम्हीं तें डोक्याला लावायचें औषध आणायला सांगितलें तें, त्याचाहि असाच प्रकार! त्यानें तें कुठें मिळतच नाहीं असें म्हटलें आणि म्हणे मै डाक्तिरकेपास गया तो बोला–खोलो, जंगली सुवर—

यशवंतराव—तो फॅशनेबल्सपैकीं एक आहे, हें आपण विसरलांत वाटतें? असें बोलायची फॅशन नाहीं!

कहानसिंग—अब देखो तो सरकार, कैसे गव्हांरकेमाफिक बोलते हैं!

रावबहादुर—ते सरकार–आणि मी तुला पगार देतों तो मी तुझा चाकर वाटतें ामखोरा!

कहानसिंग—नहि नही, आप तो पालन करनेवाले मावाप हो! मगर ये बिन फेसनकी बात करते हो, इसवास्ते बहोत घुस्सा लगता है.

यशवंतराव—जाउंद्या हो,त्याचें काय घेऊन बसलां? फिरून असें बोलूं नका म्हणजे झालें. पण हो, अगोदर तुम्हीं त्याला काय आणायला सांगितलें होतें, तेंतर पाहूंया.

कहानसिंग—ये देखो चिठ्ठी साब. (चिठी पुढें करितो.)

यशवंतराव—(पाहून हंसायास लागतो.) ह्रॉ! ह्रॉ! ह्रॉ!

रावबहादुर—(ओशाळून) अहो, पण हंसायला काय झालें?

यशवंतराव—(स्वगत) मला वाटलें होतें तसेंच झालें! ह्या गाढवानें पोम्याटम् बद्दल मोमेंन्टम् लिहून दिलें, मग तो रडत येईल नाहींतर काय करील? (उघड) अहो, पण हें काय लिहिलेंत?

रावबहादुर—अहो, पण हळू बोला. तुह्मीं सांगितलें तेंच मीं लिहिलें ना?

यशवंतराव—तरी पण मी सांगत होतों कीं, माझ्याप्रमाणेंच तुह्मीहि एक स्मरणवही हमेश जवळ बाळगा, ह्मणजे कधींच विसर पडायचा नाहीं.

रावबहादुर— अहो, पण असें झालेंतरी काय?


यशवंतराव—अहो, व्हॅसलाईन बद्दल व्हॅक्सिनेशन लिहिलेंत आणखी विनाकारण त्या कहानसिंगाला मात्र दोष देतां.

रावबहादुर—(हळूच) पुरे, पुरे, पण त्याच्यादेखततरी नका जास्ती बोलूं हो! (कहानास) अब तुम जाव-(कहान आंत जाऊन ब्रेसीस आणून टेबलावर ठेवितो व मुजरा करून निघून जातो.) बरें, पण आतांच्या घटकेला कुठें मिळणार तें? मिळेल का कुठें जवळपास? आपणच आणून द्या. (यशवंतरावांच्या हनुवटीस बोट लावून मोठ्या केविलवाणीनें) जा, आत्तां चला. खालीं माझी गाडी तयार आहे.

यशवंतराव—(स्वगत) पहा लेकाचा मलाच कॅम्पांत जा ह्मणून ह्मणतो. (घड्याळ पाहून) पण हें पाहिलेंत का? आपल्याला पानसुपारीला जायला उशीर होईल.

रावबहादुर—(घड्याळ पाहून) अर्धा तासच राहिला; पण माझें कसें आटपणार? (घाईनें) जा, जा तर, तुह्मी तें आपलें जवळूनच घेऊन या कसे! काय पडेल इथून आणलें तर?

यशवंतराव—अंः, फार झालें तर सातआठ रुपये पडतील.



रावबहादुर—अरे गाढवा, ह्या घोड्याच्या लगामा नू गाडीच्या पट्ट्या कशाला आणल्यास ? [अंक १ ला, प्रवेश २ रा, पृष्ठ १५.]

CHITROTTEJUCK P. BOMBAY

रावबहादुर—काय! सातआठ रुपये? पण कँम्पांत दोनतीन रुपये पडतात असें तुह्मीच ह्मणालां होतां?

यशवंतराव—मग नाहीं कोण ह्मणतो? पण कॅम्प आणखी गांव ह्यांत दुपटीचा फेर हा असणारच! (मुद्दाम) नाहींतर तसेंच चलाना का! तें नसलें तर फॅशन बिघडेल असें नाहीं कांहीं. रुमालाखालीं केंस झांकून जातील.

रावबहादुर—छे छे छे! तें नाहीं हो उपयोगी. आठ सोडून दहा पडले तरी हरकत नाहीं. (टेबलांतून नोट काढून) अहो, दहांची नोट नाहींच— ही विसांची आहे. हीच सध्या घेऊन जा कसे. पण तें झटपट लौकर घेऊन या.

यशवंतराव—(जातांना) मी मागतों एक आणि देव देतो दोन! आठ आण्यांचे ऐवजीं वीस रुपये मिळाले हें कांहीं वाईट नाहीं. सध्या तो दरजी आणि गवळी यांचींतर तोंडें बंद करतां येतील. ह्या जगाच्या पाठीवर परमेश्वरानें जर असे वेडेपीर उत्पन्न केले नाहींत तर आमच्यासारख्यांचें चालावें कसें? फॅशनचा आतां याला इतका नाद लागला आहे कीं, हा वाटेल तें करण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं! असो; पहिल्यानें आपण आपली कामगिरी झटपट बजाविली पाहिजे. [जातो.

रावबहादुर—आतां कहानानें आणून दिलेले ब्रेसीस् घालावे. (घालतो.) मला वाटतें, हा यशवंतराव मला खात्रीनें फसविणार. ह्मणे येथल्या आणि कॅम्पातल्या भावांत दुपटीचा फरक आहे. इतका फरक नसावा हें आह्मांला समजत का नाहीं! पण जाऊंद्या, आहे काय त्यांत. त्याला वाटत असेल आह्मीं अगदीं दुधखुळेच आहोंत! पण ह्मणावें, लेका, तूं आह्मांला अजून ओळखलें आहेस कुठें? अथवा तो ह्मणतो तसेंहि असूं शकेल. नाहींतर त्याच्यासारख्या सत्राशें पन्नासांनां फसविणारा जो मीं त्या अस्मादिकांपुढें असे शब्द त्यानें कधींहि काढिले नसते! म्हणून मला वाटतें कीं, त्याचें ह्मणणेंच खरें असावें. मीं अशातशानें फसणारा मनुष्य नव्हे, हें त्याला ठाऊक नाहीं कीं काय? तसा असतों तर मी या पदवीला कधींहि पोहोंचलों नसतों! अलीकडे उगीच पदव्या मिळत नसतात! (मिशांवर पीळ देऊन) अंगांत कर्तबगारी लागते—कर्तबगारी! अं:, पण आपली आपण स्तुति करण्यांत काय अर्थ आहे? मी किती हुषार आहें हें जगालाच दिसत आहे; पण हें माझें सगळें ह्मणणें त्या यशवंतरावाच्या जिवावर आहे, तेव्हां त्याला विसरतां कामा नये. आतां आपण त्याला असाच आंजारूनगोंजारून घेऊन जांवई करून टाकावा. पण ह्या बेट्याचेंहि हंसाबाईवर लक्ष्य आहेसें ऐकतों. (विचार करून) छे: छे:, तिथें त्याची मुळींच डाळ शिजणार नाहीं! कारण ती सुंदरी

माझ्यासारख्या मोहऱ्याला टाकून या माकडाला वरील कीं काय? माझी पोरगी याला दिल्यावर मगतरी त्याचें लक्ष्य हंसाबाईवर जाणार नाहींच. आमच्यासारख्या सरदार घराण्यांतली मुलगी मिळण्याला नशीब पाहिजे नशीब! त्यांतून रावबहादुरांची मुलगी मिळाल्यावर तर तो नाचूंच लागेल! (नाचूं लागतो.) माझी मुलगी लिहावाचायला शिकून इतकी हुषार आणि फॅसिनेबल झाली आहे कीं, ती याचीचशी काय, पण एखाद्या राजाची राणी शोभेल! मग काय–मी हंसाबाईशीं पुनर्विवाह लावणार! सुधारक ह्या कामांत मला साह्य करतील; आणि असें झाल्यानें मी त्यांचा पुढारी होईन. (किंचित् विचार केल्यासारखें करून) हो, पण एक मुख्य गोष्ट मीं अगदींच विसरलों. ही आमची घरांतील बया आतांशा फारच कजाग झाली आहे. ती मला स्वस्थ म्हणून बसूं देणार नाहीं. अगोदर अगदीं गांवढळ, त्यांतून मोठें होण्याचीतर तिला बिलकूल इच्छाच नाहीं! तोंडतर नुस्ता तोफखाना! मला ती अवदसा अगदीं दृष्टीसमोर नकोशी झाली आहे. अहाहा! काय पण अवदसेचें तोंड! कपाळावर गाडीच्या चाकाएवढा कुंकवाचा टिळा लावलेला, शुद्ध भागाबया! भिकारडीला चांगले कपडे घालायला नको, डोंबाऱ्याच्या पोतडीसारखी एक चोळी, ते पिंजारलेले केंस, जोड्यांतल्या घामोळ्यासारखें लुगडें, जशी कांहीं जखीण नुक्तीच वडावरून उतरली आहे! हिच्या माहेरचीं माणसेंतर हिच्याहूनहि गांवढळ! कांहींतरी निमित्त काढून द्यावी ब्याद घालवून—

म्हाळसाबाई—(रागानें प्रवेश करून) कुणाला! कुणाला माहेरीं पाठविणार? मला का? माझं अडलय खेटर निघून जायला! काय ह्मणे कपाळाला गाडीचे चाकाएवढा टिळा लावते! लावतें ह्मणजे, कुणाची भीति आहे कीं काय? आपण मेल्यावर नाहीं हो लावायची! आणि ती रांड हंसी नवऱ्याच्या पाठीमागं जशी नखरा करून मिरवते, तशी नाहीं बरं मी मिरवायची—समजलांत? मीं भागाबया काय? आणखी आपण डोमकावळ्यासारखे दिसतां ते! काय तें म्हारकावळ्यासारखं डोकं वाढलेलं, काळखापरासारखं तोंड, किरिस्तांवासारखा पोषाक, मला असलीं सोंगं डोळ्यासमूरदिखील नकोत, पण—

रावबहादुर—(स्वगत) ही पिडा इथें कुठून आली! मीं आपला संतापानें वाटेल तें बोललों, हिनें हें आडून सर्व ऐकलें वाटतें! (उघड) जा जा, तुझी जिभली फार लवलवते आहे. हो चालती इथून–मला तुझें तोंडसुद्धां नको पहायला!

म्हाळसाबाई–अहो, माझं तोंड पाहिलंत म्हणूनतर तुह्मांला इतके पैसे मिळाले, अन् असले ढंग करायला लागलेत. नाहींतर जन्मभर हातचा नांगर आणि

डोक्याची घोंगडी सुटली नसती! काय ह्मणे, माझ्या माहेरचीं गांवढळ! नी मामंजींचा सारा जल्म चाळणी विणण्यांत आणि गुरें हांकण्यांत गेला, तें विसरलां वाटतं?

रावबहादुर—बस बस्स, पुरे झालें! फारच तोंड सोडलें आहेस! चाकरमाणसांनीं ऐकलें तर ते काय ह्मणतील?

म्हाळसाबाई—काय ह्मणणार आहेत? मनांत समजतील कीं, आपल्या धन्याचा बाप दोऱ्याच वळित असे ह्मणून! तुह्मीं आणखी डोळे वटारलेत तरी मी कांहीं भ्यायची नाहीं बरं! माझ्या बापाचे पैसे कांहीं वर आले नव्हते! तुह्मीं त्याचा चांगला उपयोग करावा आणि मला चांगल्या रीतीनं वागवावी, ह्मणूनच दिले होते. त्या मेल्या बोक्या बंगाल्याच्या नादीं लागून किरिस्तांव होण्याकरितां नी त्या बाजारवेसवेजवळ पाट लावण्याकरितां नव्हते दिले!

रावबहादुर—बरें बरें, जा आतां, फार तोंड चाललेंय! ते पहा यशवंतराव येत आहेत. मंजुळेला चहा घेऊन यायला सांग पाहूं.

म्हाळसाबाई—काय म्हटलंत! शरम नाहीं जिभेला वाटतं? माझी मुलगी नी ह्या उनाडटप्पूला—ह्या दिवाळखोराला चहा आणून देणार?

रावबहादुर—अग चूप, चूप! (म्हाळसाबाईला आंतल्या दारानें ढकलून देतो व आरशांत पाहून) काय खुळसट आहे! मी आतां पूर्वींपेक्षां कितीतरी सुरेख दिसतों. तरी मला ह्मणते किरिस्तावांसारखे दिसतां! गांवढळ-अगदींच गांवढळ! हिला रूपाची परीक्षाच नाहीं! (इतक्यांत यशवंतराव येतो त्यास) काय, आणलेंत का तें?

यशवंतराव—हो, चला तुह्मी आतां लवकर. फार उशीर होईल. (पर्वतरावाला गडबडीनें निघण्यास सुचवितो. रावबहादुर बाटलींतील तेल हातावर ओतून डोकीस लावितो, आरशांत पाहून ब्रश फिरवितो, तरी केंस कांहीं खालीं बसत नाहींत.) रावबहादुर! फार सुरेख झाले केंस. आतां रुमाल घालून निघाच! (घड्याळ पाहून) उशीर फार झाला. (रावबहादुर रुमाल चढवितो.)

रावबहादुर—(आठवल्यासारखें करून मोठ्यानें ओरडतो) अरे कहान! अरे पांडू! (भपकेबाज पोषाख केलेले दोघे खिदमतगार प्रवेश करून अदबीनें मुजरा करितात. त्यांकडे पहात हंसून) तुह्मी किती आज्ञाधारक आहांत याची परीक्षा करण्यासाठींच तुह्मांला बोलाविलें. काय यशवंतरावजी, यांचे पोषाख कसे आहेत? आहेत कीं नाहीं नामी?

[सर्व जातात.

प्रवेश ३ रा.

[स्थल—रावबहादुरांच्या बंगल्यांतील एक दालन.
दगडी व तिच्या पाठोपाठ पांग्या प्रवेश करितात.]

दगडी—(मागें वळून) हां, खबरदार ! अस माज्या माग लागलेल मस्नी विलकूल खपायच न्हाय, शाप सांगते ! अस कुत्र्यावानी गोंडा घोळूनशेनी हत मजसंग कायबी वलायच न्हाय !

पांग्या—हा ! हा ! काय मुर्की आन् काय नक्रा ! इक्ती मिजास कशापाई ?

दगडी—कशापाई मंजी ! मी कोन् हाय काइ दक्कल हाय का ?

पांग्या—तूं व्हय ! तूंतर या पांगुजीरावांची फटाकडी बायकु व्हनार हैस, आन् दुसर काय !

दगडी— जीभ लईशी लवलव कराया लागलिया ? मी रावभादुरांच्या जणाणखाण्यावरची नायकीन् हाय नायकीन ! ध्येनांत ठिवा.

पांग्या—कोन् ? रावभादुरांची नायकिन् का पांगुजीरावांची ! त्या हुप्या-वानराची ? त्या तुज्या रावभादुरांची योक भागाबया हाय–नी त्येला ही दुसरी जाखमाता कशापाई व्होवी ?

दगडी—अस वंगाळ बोलनं मस्नी राव खपायचं न्हाय, शाप सांगतें ! मी काय मंजुला हाय, अस तुमास्नी वाटल व्हय? तुसच धनी आल कीं मंजुलाताई अक्शी गालांत कशा गुलगुल हसाया लागत्याती, आन् मग त्ये इस्वासराव तुमच धनी–त्येंच्यावर रुसत्याती, आन् मंग त्या अक्शी लई व्येजार होत्याती. पन् राव, माज्यासंग त्ये कायबी साधायचं न्हाय पगा.

पांग्या—आन् हतबी कुना ल्योकाच तटलाया ! मी त्या इस्वासरावावानी अस कुनाच पाय धरायचा न्हाय! मस्नी जांवाय व्हायच झाल तर मी अस दिमाक दावीन की वा रवा ! काय व्हईल त्ये भ्येतर, पन् सासरा माझ्या पाया पडला आन् तुज्यासारकी आवाबी पाया पडली, तरी दुकुनश्यानबी मी पघायाचा न्हाय ! (तोंड फिरवितो.)

दगडी—मंग काय घेवजीधसाड्यावानी योका बाजूस गुमान त्वांड खुपसून अस रडात बसाल व्हय ? (रडून दाखविते.)

पांग्या—अग रडन् कशापाई; तुज्यावानी आवा आली तर तिस्नि बेगुमान् ढकलूनश्येनी घेईन. (तिच्या जवळ जाऊन तिला ढकलून देतो व हळूच मुका घेतो.)

दगडी—(मानेस हिसडा देऊन) ह्यो चाठालपना मस्नी न्हाइ खपायचा!

पांग्या—आन् मस्नी बी—(पुनः मुका घेतो.)

दगडी—बाप्या मानूस कस कुत्र्यावानी लघाल व्हत चाललया पगा! मी कोन् हाय त्ये पुन्ना सांगाया व्होव व्हय? तस न्हाय कामाच! रावभादुरांस्नी सांगून शेनी योका घटकेमंदी समदा बंदोबस्त करून टाकतिया पघा!

पांग्या—म्होटी आली रावभादुरांचा दिमाक सांगाया. मस्नी ठाव न्हाय व्हय! म्हन रावभादुर, रावभादुर! तुज रावभादुर मस्नी काय करनार! मारनार व्हय?

दगडी—मारनार मंजी! त्येना रावभादुर पदवी मिलाली हायना? म्होटह्मोट्या लोकांमंदीं त्ये बसायाउठाया जात्याती. सबांत जात्याती. झाल ह्मंगल तर–त्येला काय बोलत्यात बर, लिकचर·व्हय व्हय–लिक्चर! रावभादुर त्या लिकचरला जात्याती. त्ये योका परदेशाजवलूनशेनी दांडपट्टा शिकत्यात आन् सवतास्नी योक बामन पंतोजीबी ठिवलिया! आन् योक गवईबुवावी गानं शिकवाया येतोया. त्ये लई ह्मोट झाल्याती. त्ये काय तुजी ख्वाड मोडायाला कमी करतील व्हय?

पांग्या—माजी ख्वाड मोडनार व्हय? काय दिमाक पघा रांडचा. चल निंग जा! व्होवी कुनाला असली डाकीन. आतां अशी अक्षी योक फटाकडी सोधूनशेनी काढतों पघ. (जाऊं लागतो.)

दगडी—(त्याला अडवून) अव, पन् अस काय करतां राव? अस इनाकारन रागवाया झाल तरी काय?

पांग्या—झाल काय मंजी! आमांस्नी तूं आपल्या रावभादुरांकडून मारवनार न्हैका? असली मुरदाड आवा व्होवी कुना ल्योकाला!

दगडी—(आर्जवानें) त्ये तुमास्नी खर वाटल व्हय? ही दगडी अस वंगाळ काम करील असं तुमास्नी वाटल तरी कस?

पांग्या—आतां कशी आलीसा अक्सी रस्त्यावर! मंग आतां योक—

दगडी—ईस्–ह्ये काय! ह्ये नाय चांगल. कांइ जनाची लाज व्होवी का न्हाय? (इतक्यांत 'दगडे दगडे' अशा आंतून हांका ऐकूं येतात.) आलें, आल्यें. आमच्या बाइसाब हाका मारत्याती. पन इस्वासराव हकड कंदीं येनार?

पांग्या—त्ये कशापाई! हं, आल ध्येनांत तुजा कावा! त्ये आल मंजी आमीबी येनार म्हुन व्हय? व्हय व्हय, त्येंच त्येंच!

दगडी—चला, चाव्हट कुटल!

[जातं.

पांग्या—बायकु पन् बायकु हाय ! आजचा वकुत झोटा नामी गवसला. तिच्या मनांतल समदं भाईर निंगाल. आतां हा पठ्या ही आवा खास पटकावनार ! अर, पन् इच्यापाई धनीसाबांनीं सांगितलेल काम तसच ऱ्हाइल की ! व्येगीव्येगी वाजारांत ग्येल पायजे आन् काय ?

[जातो.

प्रवेश ४ था.

[स्थल—रावबहादुरांच्या माजघरांतील खोली. झाळसा-
बाई डाळतांदुळ निवडित वसली आहे असा प्रवेश.]

झाळसाबाई—परमेश्वरा, काय हे माझ्या नशिबाचे खेळ मांडले आहेस ! काय म्हणे, मला माहेरीं पाठवून त्या सटवीशीं पाट लावणार! चाळिशी उलटून गेली अन् अजून सोळा वर्षांच्या पोरासारखं यांचं नटणं नी मुरडणं चाललंच आहे ! सारा दिवस लग्नाचे विचार, दुसरं कांहींएक सुचतच नाहीं ! ह्या खुळाला म्हणावं तरी काय ?–पण करीतनाका लग्न केलं तर. मला काय करायचं आहे त्यांच्याशीं ! मीतरी कां दुःख करावं ?–पण लोक ह्यांच्या तोंडावर थुंकतील म्हणजे त्याचे शिंतोडे माझ्या नाहींतका तोंडावर उडणार ! रोज गाणींबजावणीं, नाचतमाशे, साहेबांनां पानसुपाऱ्या, हें सारखं चाललं आहे. पण मी म्हणतें, कावळ्यानं मोराचीं पिसं लाविलीं म्हणून त्याला कुणी मोर का म्हणणार आहे ? मोठमोठ्या शिकलेल्या लोकांची, साहेबलोकांची बरोबरी करायला यांनां लाज कशी वाटत नाहीं? तिथंतरी मान रहात असेल का ? परवांच सांगत होते कीं, वर्तमानपत्रांतून आपल्यावर सारखी टीका चालते म्हणून. बाकी तीतरी कुणी वाचून दाखवील तेव्हां ! स्वताला बरोबर वाचायला येईल व त्यांतील भेद समजेल तर किनई ! त्यांनींतरी टीका कां करूं नये ? आपली योग्यता न पहातां मूर्खासारखं जर वागूं लागले, तर त्यांच्याकडेतरी काय दोष ? पाण्यासारखा पैसा घालवायचा आणि वरती लोकांकडून मूर्ख म्हणून घ्यायचं, हें अवदसेचंच लक्षण म्हटलं पाहिजे !

मंजुळा—(प्रवेश करून) आई, सारा दिवसभर कसलाग विचार करित बसतेस ?

झाळसाबाई—विचार कसला ! नशिबाचा नि दुसरं काय ?

मंजुळा—आई, जें व्हायचं असेल तें होईल. तूं उगाच असा जिवाचा संताप करून घेऊं नकोस.

म्हाळसाबाई—अग, मी कशाला करून घ्यायला हवा, तो आपोआपच होत आहे. आतां तुम्ही सोन्यासारखीं मुलं लग्नाला झालेलीं, ती तुमच्या लग्नाची गोष्ट बाजूला ठेवून काय म्हणे आपणच त्या रांडेशीं पाट लावणार!

मंजुळा—आई, तुला हें नाहींनाहींतें सांगतंतरी कोण?

म्हाळसाबाई—अग, मला सांगायला कोण हवं, मीं प्रत्यक्ष तोंडून ऐकलं. इतकंच नाहीं, तर म्हणे तुला त्या यशवंतरावाला द्यायचा विचार—

मंजुळा—आई, तूं त्याबद्दल मुळींसुद्धां काळजी करूं नकोस! यांतील एक गोष्टसुद्धां सिद्धीस जायची नाहीं. हंसाबाईची प्रीति आहे यशवंतरावावर आणि तोहि तिच्याजवळ पाट लावायला उल्लू बनला आहे, असं मला कळलं आहे.

म्हाळसाबाई—तसं जर असलं तर देव पावला. पण–(इतक्यांत दौलत्या प्रवेश करितो.)

दौलत्या—फुई, तूं मस्नी म्हनत्येस की आमच्याहितं ऱ्हा म्हनूनशेनी; पन् आतां आपल्या बाच्यान्दिकील ऱ्हावायचं नाय पग! फुयाच सदीसदी ह्ये नाय ह्यें त्यें नाय त्यें, असा अक्षी दिसरात तरास हाय. आमी काय तुमच गडीमानूस हावोत व्हय? म्हुनशानी असा तरास द्येत्याती! आन् भायेरच जर कुनी आल तर मंग इची भन, कुत्र्यावानी वस्कन् अंगावर येत्याती! तुमास्नी वाटत असलकी दौलू काय लग्नाच्यापाई आपल्या पायाबी पडल! तर ऱ्याप सांगतो, त्यें आपल्या काकाच्यान्बी न्है व्हनार! लगन न्है झाल तरी बी भ्येत्तर, पन् अस बोलन आपनास्नी कंदी खपायच न्हाय! फुया झाल म्हुन कांय झाल! म्यां आपल्या बाचबी कंदी ऐकूनशानी न्है घ्येतल, मंग यांना कोन इचारतोय. किरिस्तांवावानी पोश्याक काय करत्यात! मस्नीतर ह्यें लईलई वंगाळ दिसतुया. ये नोडग्यावानी चाल माझ्या बाला समजल, तर तो मस्नी आन् तुस्नीबी घरांत न्है घ्येनार! मीतर जानार आपल्या बाकड.

म्हाळसाबाई—दौलू, अरे तूं किनई अगदीं वेडा आहेस! अरे, तुला बोलतात आणि आम्हांला बोलत नाहींत, असं का कांहीं आहे? पण करायचं काय? कांहीं इलाज आहे का? आपण आपलं तिकडे लक्ष्य देऊं नये म्हणजे झालं!

दौलत्या—विलाज मंजी? येच्या कशापायीं इक्त्या पत्राजा? चल तूंन् मी दोगबी माज्या बाकड जाऊन्शान् ऱ्हाउं. खर इचारशील, तर माज आजोबा अगदी गाडाव व्हते गाडाव! माज्यासारा सासरा असता, तर येस्नी योक फुटकी कवडीबी द्येता न्है. जावाय झाल म्हुनशेनी काय झाल? पन बोलाव कुनी!

माजा बाप बोलला तर त्येस्नी म्हंगनार ह्या गाडवाच्या ल्योकाला पैस होयाती म्हुनशेनी ह्यो अस बोलतुया.

म्हाळसाबाई—अरे,तूं एक घरीं जाउन बसशील,पण माझं तसं कसं चालेल? मला इथं राहिलंच पाहिजे. आणि तूंतरी कसचा जाणार आहेस? बापानं घालवून दिलान् ह्मणून ना तूं इकडे आलास?

दौलत्या—व्हय, समद खर, पन् कस ह्मनत्येस वावर रागावूनशानी फुयाच जोड खाव व्हय? छे छे, त्ये नाय आपल्यास्नी खपायचं, मीं तुला श्याप सांगतो.

म्हाळसाबाई—तूंतरी अगदींच वेडा आहेसरे! तुला काय करायचं आहे त्यांच्या बोलण्याशीं? आह्मींतर नाहींना बोलत?

दौलत्या—आन् तुला ठावां न्हाय! मंजीबी तसलीच हाय. ती काय ह्मन इस्कुलांत जात्ये! आमी बाप्ये होऊनशान् शोरीची*बी फोडतां येईत न्हाई अन् हीतर आपल्या मैतनींसंग पॉट मॉट गॉट बॉट करतीया, जनुकाय कोन ह्मंगल ह्यो काय मडमसायबच हायती!

मंजुळा—(एकीकडे) ज्या पापाला मी भीत होतें तेंच दत्त ह्मणून पुढं! (दौलूस) मी शाळेंत गेलें ह्मणून तुझं रे काय गेलं? आपल्याला अक्कल नाहीं आणि दुसरं शिकतं तें पहावत नाहीं, अशाला बायकोतरी कुठून मिळणार? मला नाहीं वाटत दगडी तुला माळ घालायला तयार होईलसं!

दौलत्या—फुई, बघलस तुझी मंजी कशी हाये ती? आपुन शिकली म्हुनशान् काय दिमाक दावती?

म्हाळसाबाई—दौलू, तूं जा आपला, तिच्या नादीं लागूं नकोस कसा! मीं दगडी नाहींतर दुसरी फक्कड बायको तुला करून देईन, मग झालं कीं नाहीं? (दौलत्या जातो.) मंजे! तुला अगदींच अक्कल नाहीं! तो आपल्या घरीं आला ह्मणून त्याला असं बोलणं शोभत नाहीं, समजलीस? तुह्मी दोघंजणं मोठीं शहाणीं झालां ह्मणून त्याला असं बोललेलं मला बिलकूल खपायचं नाहीं. तूंदिखील जाणार आहेस तिकडच्याच वळणावर! मला तुझा स्वभाव मुळींच आवडत नाहीं. तुला काय करायचं असेल तें तूं करित जा, पण दुसऱ्याला बोललीस तर खबरदार!

[रागानें निघून जाते.

मंजुळाबाई—बावा एका तऱ्हेचे आणि आई एका तऱ्हेची! ह्यांच्याशीं दिवस काढणं आतां फारच चमत्कारिक झालं आहे. बाबांनीं मला हें शिक्षण दिलं,

हें खरोखरच किती चांगलं झालं आहे. आईला काय त्याची किंमत? परंतु आज जें कांहीं आई बोलली त्यावरूनतर माझ्या जिवाला सारखी रुखरुख लागून राहिली आहे. काय मेला तो यशवंतराव आणि त्याच्याशीं माझ्या जन्माच्या गांठी घालून देणार! मला हें खरंसुद्धां वाटलं नसतं; परंतु मोठेपणाच्या वेडाकरितां बाबा काय करतील आणि काय नाहीं, तें कुणाच्यानंहि सांगवत नाहीं. मींतर प्राण गेले तरी त्या गोष्टीला कबूल व्हायची नाहीं!

[जाते.

[पडदा पडतो.]

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

[स्थल—रावबहादुरांच्या घरापुढील आंगण. गणेशसिंग वस्ताद रावबहादुरांस दांडपट्टा शिकवित आहे असा प्रवेश.]

गणेशसिंग—रावसाब, ऐसा खडा रहना ! पऊं और नजीक रखना चाहिये–और देखो, ये हात और पऊं एक सपाटीमें आना चाहिये ! यह लठ्ठ ऐसा हातमें धरना, के हमारा लठ्ठके उप्पर सपाटा बैठेगा. और हमकु अपनेपर सपाटा मारनेकूं नहि मिलेगा. क्यंव, आया समजके बीचमे ? अबीं हुषारीसे काम चलाव. चढाव–चढाव–उपर चढाव ! क्या ? ऐसा गांह्रूकेमाफिक कबी नहीं करना ! देखो, एक–दो–तीन–तो एकदम सपाटेसे उपर लगाना !

रावबहादुर—(स्वगत) खरोखरच, दांडपट्टा खेळणें मोठ्या मौजेचें आहे.

गणेशसिंग—आप बडे रावबहादुर एक बात ध्यानमें रखना चाहिये. आपने दुष्मनके उपर एकदम सपाटेसे हल्ला करना, और उसकू हराना. आपने सामनेवालेपर लठ्ठका सपाटा लगाना, मगर उसका आप नही लेना जरूर है !

(इतक्यांत पांडू खिदमतगार येतो.)

पांडू—(लवून मुजरा करतो.) रावभादुरसाब, आपले गवईबोवा वाड्ळ आले हैती.

रावबहादुर—मग मूर्खा ! त्यांस वरती येऊंदे. (वस्तादजींस) गणेशसिंग, मला चांगला दांडपट्टा खेळतां येऊं लागला तर मी किती मनुष्यांबरोबर सामना करूं शकेन हो ?

गणेशसिंग—जो शख्स बहोत अच्छा पट्टा जानत है, उसकू हजार और दस हजार आदमीसे बिलकूल डरनेकी जरूर नहि है !

रावबहादुर—मग दहा हजार मनुष्यांबरोबर मला एकट्याला टिकाव धरतां येईल ?

गणेशसिंग—बेशक बेशक ! (इतक्यांत गवईबोवा हातांत तंबूरा घेऊन प्रवेश करितात.)

गवई—(लवून) महाराज, रामराम रामराम. (रावबहादूर अजागळासारखा फक्त मानेनेंच त्याचा रामराम घेतो.) काय महाराज ! आपण दांडपट्टा शिकतां आहां ? हः हः हः ! (हंसतो .)

गणेशसिंग—(मिशांवर ताव देत) क्यंव तंबोरीलाल ! इसमे तुमारा मूं क्यंव काला पडगया ? लढवय्येका कामतो सबसे बडा है ! जो सबलोक तुमारेमाफिक आ–आ–आ–करत गाना गावत और नाच करत बैठे, तो राजका पालन कोन करे ?

गवई—जरा तोंड आंवरून बोल!

गणेशसिंग—क्या, मेरे साम सामना चलाता है ? तेरा तंबुरीका सो तंबुरी करडालूंगा !

रावबहादुर—अहो गवईबोवा, त्याच्या तोंडी लागूं नका. तो फारच हुषार आहे. दहाहजार मनुष्यांची त्याचेपुढें डाळ शिजायची नाहीं !

गवई—संभाळा, माझ्याशीं गांठ आहे ! आपलें शौर्य मजजवळ चालायचें नाहीं बरें !

गणेशसिंग—क्या बोलत है ? (हाताच्या अस्तन्या वर चढवून मोठ्या त्वेषानें गवयाच्या अंगावर जातो. परंतु रावबहादुर त्याला थांबवितो.)

रावबहादुर— हं हं हं! त्याच्या नादीं काय लागतां ? (इतक्यांत शास्त्रीबोवा प्रवेश करितात.) हे पहा आमचे शास्त्रीबोवा आले. शास्त्रीबोवा, तुम्हीं कसे अगदीं वेळेवर आलांत! ह्या दोघांचा निवाडा तुह्मी चांगला कराल. (शास्त्रीबोवा चष्मा नीट करून पुढें होतो.)

शास्त्रीबोवा—हें काय चाललें आहे ? तुह्मी दोघेहि अगदीं एकमेकांकडे डोळे वटारून कां पहातां ? कलहाचें प्रयोजन काय ?

रावबहादुर—एक ह्मणतो, गायनकला उत्तम. दुसरा ह्मणतो, दांडपट्टा उत्तम. अशी या दोघांची लट्ठालट्ठी चालली आहे. आपण मोठे विद्वान् आहांत व आपणांस न्यायशास्त्रहि येतें. सबब कोणती कला अधिक चांगली तें आपणच सांगा.

शास्त्रीबोवा—मूर्ख हो मूर्ख ! मला वाटतें ह्या दोघांनींहि गीतार्थबोधिनी वाचिली नाहीं. अहो बावांनों, क्रोधायमान होऊन मानवास जी बुद्धि दिली आहे तिचा याप्रकारें जर असद्व्यय केला तर निर्बुद्ध प्राणी तुमच्यापेक्षां श्रेष्ठ ठरतील. मनूनें ह्मटलें आहे—

> “भूतानां प्राणिनःश्रेष्ठाः प्राणिषु कृतबुद्धयः ।
> कृतबुद्धीषु कर्तारः कर्तृषु ब्रह्मवादिनः ॥”

गवई—आपलें तें ब्रह्मज्ञान पुरे झालें. आमच्या धंद्यास या हरामखोरानें नांवें ठेवावीं व तीं आह्मीं निमूटपणें ऐकून घ्यावीं, इतके आह्मी नामर्द नाहीं.

गणेशसिंग—ए गद्धेकूं शरम नहीं लगती ! क्या हमारे कसबबरावर अपने धंदेकी बराबरी करनेकु लगाहै ?

शास्त्रीबोवा—शांतं पापं ! शांतं पापं ! मनुष्यें आपापल्या ज्ञानानुरूप भाषण व आचरण करितात.

गवई—बस्स मी ह्मणतों कीं, संगीतासारखें जगांत दुसरें कांहीं नाहीं! इंद्रादिदेव जर अप्सरांच्या मधुर गायनानें वेडे होऊन जात, तर मग आमचा मनुष्यांचा काय पाड ?

गणेशसिंग—चुप रहो बदमाष! ए सब विद्या औरतोंकेवास्ते है. रंडियां और परियेमाफिक मरद जो गाना गाएंगे और नाच करेंगे, तो बहुत शरमकी बात है! मै सबको कहताहै, के लढवय्या बनजावे, और अपना शौर्य बतावे.

शास्त्रीबोवा—अरे तत्वज्ञान, तर्कशास्त्र, व्याकरणें हीं सर्व शास्त्रें व्यर्थ आहेत काय ? असल्या भिकार धंद्याला विद्या ह्मणून त्या शब्दाला काळिमा कांरे लावितां ? त्यापेक्षां तुमच्या जिव्हा झडून कशा पडत नाहींत ? तुमच्यासारखे लढणारे व गाणारे महिष आणि गर्दभ रानांत काय कमी आहेत ?

गणेशसिंग—(संतापून व हाताच्या अस्तन्या वर चढवून शास्त्र्यास) चुप रहो बदमाष !

गवई—(रागानें) अरे मूर्खा भटुरग्या ! तुझीच हड्डी नरम केली पाहिजे !

शास्त्रीबोवा—(दोघांस) मूर्खशिरोमण्यांनों ! पशूसारखें उद्दाम वर्तन— (इतक्यांत गवई व गणेशसिंग शास्त्र्याच्या अंगावर धावत जातात व त्यास यथेच्छ मारितात) अधमांनों, तुमचा सत्यानाश होईल !

रावबहादुर—अहो शास्त्रीबोवा—

गणेशसिंग—तेरी बत्तीशी तोड डालूंगा.

रावबहादुर—अहो ! अहो—

शास्त्रीबोवा—नीचांनों ! अधमांनों, अधमाधमांनों—

रावबहादुर—गृहस्थहो ! मित्रांनों ! अहो शास्त्रीबोवा—अहो थांबा— अहो भांडूं नका, माझें ऐका—

[तिघे मारामारी करित पडद्यांत जातात.

रावबहादुर—जाऊंद्या, तिघांच्या भांडणांत कोण पडतो ! त्यांच्या मारामारींत जा व आपला फॅशनेबल् नवा इस्त्रीचा अंगरखा चुरून घ्या, इतका कांहीं मी मूर्ख नाहीं. त्यांच्या मारामारींत जाणूनबुजून जाऊन मार खाण्यांत काय हांशील. एखाद्यानें जोराचा ठोंसा लगावला तर माझी कंबक्तीच व्हायची !

[जातो.

प्रवेश २ रा.

[स्थल–यशवंतरावाचें घर. यशवंतराव दिवाणखान्यांत इकडून तिकडे खेपा घालित आहे असा प्रवेश.]

यशवंतराव—आजकाल जगांत जिकडे पहावें तिकडे खोटा डौल, खोटी फुशारकी यांचेंच भारी बंड माजलें आहे. नांवाजलेल्या जुन्या, पिढीजाद, एकाकाली श्रीमंत परंतु सांप्रत अन्नाचेहि वाखे पडूं लागले आहेत अशा घराण्यांतील मंडळीस आपल्या वडेपणाविषयीं,घरंदाजपणाविषयीं,कुलीनपणाविषयीं,खानदानी-विषयीं जो डौल वाटत असतो, कांहीं विचारूं नका ! सामान्य घराण्यांतील मंडळीस हे अगदींच तुच्छ मानितात व त्यांचा तिरस्कार करून त्यांचेपासून दूरदूर रहाण्याविषयीं फारच धडपडतात. बरें, या लोकांच्या या वृथा डौलास आणि खोट्या फुशारकीस हंसावें ह्मटलें,तर दुसरीकडेतरी काय प्रकार चालला आहे ! आजपर्यंत जे सामान्य घराण्यांतील ह्मणून प्रसिद्ध आहेत त्यांतील कित्येकांस व्यापारानें ह्मणा, उद्योगानें ह्मणा, अधिकारानें ह्मणा अगर अन्य कोणत्याहि साधनानें म्हणा विपुल पैसा मिळाला ह्मणजे त्यांनांहि आपण वडे, कुलीन, पिढीजाद, घरंदाज, सरदार बनण्याचा अनिवार मोह उत्पन्न होतो व त्या मोहानें हे भलभलते वेडेचार करूं लागतात व सर्वांच्या उपहासास पात्र होतात. या लोकांस पूर्वींच्या बडे ह्मणविणारांचे घराण्यांत आपल्या कुटुंबाचीहि गणना व्हावी ह्मणून एवढी अनिवार इच्छा उत्पन्न होते कीं, त्यासाठीं हे लागेल ती गोष्ट करण्यास मागेंपुढें पहावयाचे नाहींत ! एकंदरींत उभय पक्षांत या खोट्या डौलाचें भयंकर वेड शिरलें आहे. वास्तविक पाहूं गेल्यास या दोन वर्गांत फरक काय आहे? कारण, सांप्रत जीं घराणीं बडीं, कुलीन, पिढीजाद, खानदानीचीं, सरदार ह्मणून प्रसिद्ध आहेत, त्यांचे पूर्वज एकाकालीं सामान्य वर्गांतील लोकच होते. त्यांनीं पैशाच्या, अधिकाराच्या, सत्तेच्या अगर अन्य कोणत्याहि साधनाच्या जोरावरच त्या सामान्य स्थितींतून आपल्यास श्रेष्ठत्व प्राप्त करून घेतलें आणि केवळ जबरीनेंच ते या बड्या ह्मणविणाऱ्या वर्गांत घुसले; परंतु तोच प्रकार सांप्रत जर कुणी करूं लागला तर त्याला एकंदर समाज हंसतो, त्याची अवहेलना करितो, मोराचीं पिसें लावून मोर होऊं पहाणाऱ्या डोमकावळ्याची त्यास उपमा देतो व त्याची फटफजिती करतो; परंतु समाज असा विचार करित नाहीं कीं, आज या गृहस्थाचा आपण जसा उपहास करतों तसाच एकेकालीं सांप्रत बड्या ह्मणविणाऱ्या प्रत्येक घराण्याचा झाला होता. त्यावेळीं या बड्या घराण्यांच्या

पूर्वजांचीहि लोकांनीं अशीच फटफजिती उडविली होती; परंतु कांहीं काळानें त्या गोष्टी विसरून समाज यांनां बडे समजूं लागला; आणि तीच गत सांप्रत अशा प्रकारची धडपड करणारांचीहि व्हावयाची. कांहींकालानें हे लोकहि बडे, कुलीन, घरंदाज वर्गांत मोडूं लागावयाचे. असा जर हजारों वर्षांचा इतिहास आहे, अनुभव आहे, तर मग आज या बड्या ह्मणून मानल्या जाणारांनीं जे कोणी नवीन बडे, कुलीन, घरंदाज होण्यासाठीं धडपडत असतात त्यांचा उपहास कां करावा, ते आपल्या जवळजवळ येऊं पहाण्यास धडपडत असतां त्यांस दूर दूर लोटण्यास यांनीं कां धडपडावें? पण तसें जर नसतें, तर मग ही दुनया कसली? दुसरें असें कीं, या खानदानीच्या बडे, कुलीन, घरंदाज घराण्यांपेक्षां सामान्य घराण्यांची स्थितीच सर्व गोष्टींत कितीतरी श्रेष्ठ प्रतीची असते. बडे, कुलीन, खानदानीचे ह्मणविणारांचे घराण्यांत जे घोटाळे, जे अनाचार चालले असतात ते ऐकले असतां अंगावर कांटाच उभा रहातो! उलटपक्षीं या सामान्य घराण्यांतील लोकांची नीतिमत्ता, आचार, व्यवहार कितीतरी शुद्ध व निर्दोष असतात. बड्या लोकांनीं दुसऱ्यांचे गळे कापले, लागेल तसें वर्तन केलें, घरांत बाजारबसव्याहि आणून घातल्या, तरी त्यांचें बडेपण, कुलीनपण आपलें अढळ तें अढळ! बडेपणाच्या, कुलीनपणाच्या नांवाखालीं त्यांनीं केवढेहि अनाचार, अनन्वित कृत्यें केलीं तरी समाजांत त्यांचें श्रेष्ठत्व कमी होत नाहीं! असा जगाचा विपरीत न्याय आहे! फार लांब कशाला, अस्मादिकांचेंच उदाहरण घ्याना! अस्मादिकांची स्वारी कोणत्या कसबांत प्रवीण नाहीं? लोकांनां थापा देण्यांत, याच्या डोक्यावरची टोपी त्याच्या डोक्यावर ठेवण्यांत, दारूच्या बाटल्यांच्या बाटल्या घशांत उतरविण्यांत अस्मादिकांचा हात धरील असा प्राणी निदान आसमंतांतल्या पांचपन्नास गांवांततरी आढळणें कठीण! तथापि आमच्या सरदार घराण्याच्या नांवाखालीं त्या साऱ्या गोष्टी आह्मांला शोभून जात आहेत आणि त्या पर्वतरावांसारखे वेडे पीर आमच्या भजनीं लागत आहेत. आणि आपणतरी कशाला कमी करा! या वेड्या पिराच्या त्या वेडामुळें आपल्याला जर हवातसा हात मारायला सांपडतो आहे, हव्याहव्या त्या चैनी भोगायला मिळत आहेत, तर त्या मूर्खाची कींव करण्यांत कांहींएक अर्थ नाहीं. खरोखर या वेड्या पर्वतरावाची आठवण होतांच हंसूं येतें. काय पण बेट्याला मोठेपणाची हांव सुटली आहे ही! या वेडानें तो काय करील आणि काय नाहीं, त्याचा मुळींच नेम नाहीं! मला म्हणे आपला जांवई करणार आहे!

कशाला, तर आमच्याप्रमाणें आपलेंहि सरदार घराणें आहे असें लोकांनीं समजावें म्हणून! परंतु हा खुळा असा विचार करित नाहीं कीं,आपल्या मुलीचें जर दुसऱ्यावर प्रेम जडलें आहे तर तिच्या मर्जीविरुद्ध बळजबरीनें तिचें भलत्याशींच लग्न लावल्यानें त्याचा किती अनर्थावह परिणाम घडेल बरें! शिवाय त्यानें विश्वासरावाला आपली मुलगी देण्यासंबंधीं वाङ्‌निश्चयहि केला आहे तो मोडून आतां मला मुलगी देण्यास तयार झाला आहे ! वेड्या, तूं एक वचनभंगाचें पातक शिरावर घ्यावयास उद्युक्त झालास, पण मी त्या जोडप्याच्या प्रेमभंगाचें पातक शिरावर घेईन तेव्हां ना? मंजुळा चांगली मुलगी आहे, देखणी आहे, सद्गुणी आहे, सुशिक्षित आहे, तिच्यांत नांव ठेवायला कांहींहि सांपडणार नाहीं, ह्या सगळ्या गोष्टी खऱ्या; आणि माझें मन दुसरीकडे गुंतलें नसतें व मंजुळेला मी आवडलों असतों, तर मींहि पण आनंदानें तिचें पाणिग्रहण केलें असतें. परंतु येथेंतर सर्वच गोष्टी प्रतिकूल आहेत. एकतर तिचें प्रेम विश्वासरावाच्या ठिकाणीं गुंतलें आहे; दुसरें, माझा ती उघडउघड तिरस्कार करिते; आणि याहूनहि महत्वाचें कारण ह्मटलें ह्मणजे आमचें सारें तनमनधन त्या हंसाबाईच्या ठिकाणीं जडलें आहे. रावबहादुरांस मी वरवर हुलकावण्या दाखवितों आहें आणि तो बेटा मूर्ख तें खरेंच समजून माझ्या नादीं लागला आहे ! मंजुळेला बरीक माझा आशय कळला असावा. तिच्यावर मी दाखवित असलेलें प्रेम कृत्रिम आहे, खरें नव्हे, हें त्या चाणाक्ष मुलीला कळणें अशक्य का आहे? ती माझा उघड उघड तिरस्कार करते, तथापि रावबहादुरांस मी तिच्याशींच लग्न करणार आहें असें भासवित असून ती हंसाबाई रावबहादुरांबरोबरच पाट लावील अशी खटपट करण्याचेंहि मीं त्यांनां आश्वासन दिलें आहे ! मूर्खा पर्वत्या! तूं असाच मिटक्या मारित रहा, तुला चांगलाच तोंडघशीं पाडीन तरच मी नांवाचा खरा यशवंतराव ! हंसाबाईसारखी सुंदर स्त्री तुझ्यासारख्या माकडाला जवळ उभें तरी करीलका? आणि तें रत्न तुला मी मिळवून देईन ! हंसाबाईचें खरें ह्मटलें तर पहिल्यानें माझ्याबरोबरच लग्न व्हावयाचें. तिच्याहि मनांतून मलाच वरावयाचें फार होतें. लहानपणीं मी आजोळीं असतां तिची माझी मैत्री जडली होती. माझ्या आईनें हंसाबाईलाच आपली सून करण्याचें तिच्या आईला वचनहि दिलें होतें. परंतु हंसाबाईच्या आणि माझ्या दुर्दैवानें माझी आई पुढें मरण पावली आणि त्यामुळेंच आमच्या लग्नाचा बेत जुळून येण्यास हरकत आली. हंसाबाई उपवर होतांच तिच्या बापानें माझ्याशीं तिचा विवाह करण्याविषयीं आमच्या

काकासाहेबांनां फार आग्रह केला. परंतु आमचे काकासाहेब काय विचारतां! त्यांनां भक्कम हुंडा घेऊन येणारी सून पाहिजे होती. हंसाबाईसारखी सामान्य घराण्यांतली मुलगी ते आपल्या पुतण्यास बायको करण्यास मुळींच कबूल होईनात. मींहि पुष्कळ आग्रह करून पाहिला, परंतु त्याचा परिणाम भलताच होऊन आज आम्हांला घरांतून बाहेर पडावें लागलें. पुढें बिचारा हंसाबाईचा बाप निरुत्साह होऊन त्यानें चार वर्षांपूर्वी त्या सतकळांच्या माधवरावाशीं हंसाबाईचें लग्न केलें. हंसाबाई सातआठ वर्षांची असतांनाच तिला मीं पाहिलें होतें, तदनंतर या दहा पंधरा वर्षांत तिला मीं कधीं पाहिलीहि नाहीं हें जरी खरें असलें, तरी एकदा तिच्यावर जडलेलें माझें प्रेम कांहीं तेथून ढळलें नाहीं. परंतु ती आपली पत्नी होण्याचा मुळींच संभव नाहीं अशी जेव्हां आमची खात्री होऊन चुकली तेव्हांतर मनाला उद्विग्नता उत्पन्न होऊन याउपर लग्नच करावयाचें नाहीं, असा आम्हीं निश्चय केला व उद्विग्न झालेल्या मनाला थाऱ्यावर आणण्यासाठीं ह्मणून बाटलाबाईची आराधना आरंभिली. अस्मादिकांची स्वारी इतकी बहकण्याचें वास्तविक कारण हेंच आहे. बरें नाइलाजामुळें माधवराव सतकळांबरोबर लग्न करून घ्याव्या लागलेल्या त्या हंसाबाईलातरी सुख मिळालें का? नाहीं. तिचेंहि दैव आमच्यासारखेंच खडतर! लग्नाच्या दुसरेच दिवशीं माधवरावांनां कांहीं महत्वाच्या कारणामुळें बाहेरगांवीं जावें लागलें व तो बिचारा तिकडेच एकाएकीं मरण पावला. बिचारी हंसाबाई लग्न करून नांवालाच बाटली. तिला विधवा होऊन आज चार वर्षें झालीं आहेत. सध्या तिचें वय जवळजवळ वीस बावीस वर्षांचें असेल. त्या पोरीला मीं सातआठ वर्षांची असतांना पाहिली होती— आतां ती केवढीतरी दिसत असेल! आतां जर मी तिला भेटलों तर ती मला ओळखीलतरी का? माधवराव तिच्याशीं नांवाचें लग्न करून तिला वैधव्याचा डाग लावून गेले खरे, परंतु त्याचा मोबदला मात्र त्यांनीं तिला भरपूर दिला आहे. माधवरावांची बरीच मोठी इस्टेट होती आणि त्या एवढ्या मोठ्या इस्टेटीला दुसरें कोणीहि वारस नसल्यामुळें हंसाबाईच त्याची मालकीण बनली आहे. हंसाबाईनें चार वर्षें वैधव्यांत घालवून ती आतां या गांवीं आली आहे. पुनर्विवाह करण्याचा तिचा मानस आहे अशी गांवांत दाट वदंता पसरली आहे. खरोखर अशा सुंदर, तरुण, सुशिक्षित, धनवान् स्त्रीनें पुनर्विवाह करून सुखी होणें हेंच उत्तम होय. गुप्तपणें नानाप्रकारचीं पापाचरणें करणाऱ्या स्त्रीपुरुषांला, समाज धुतल्या तांदुळासारखीं स्वच्छ मानून हंसाबाईसारख्या रूपवती

तरुणीनें पुनर्विवाह करून पवित्राचरणानें वागण्याचें मनांत आणिल्यास त्या गोष्टीस नाक मुरडतो, हें आश्चर्य नव्हे काय? आश्चर्य कसलें, मीतर हा निवळ जुलूम समजतों! हंसाबाई जर खरोखरच पुनर्विवाह करण्यास तयार असेल तर तिचें पाणिग्रहण करण्यास माझी एका पायावर तयारी आहे. आणि आमच्या बिघडलेल्या प्रेमाची घडी पुनः जमून यावी ह्मणूनतर असें घडलें नसेल कशावरून? आमच्या काकासाहेबांनीं आम्हांला कफल्लक करून सोडलेंच आहे, तेव्हां माधवरावांचा पैसा घेऊन हंसाबाईनें यावें व आम्हांला वरून आमचें दारिद्र्य दूर करावें, असाच परमेश्वरी संकेत दिसतो. पण मीं हे मनांतल्या मनांत मांडे खाऊन काय फळ? मी जसा तिच्या प्राप्तीविषयीं उत्सुक आहें तशीच तीहि माझ्यासाठीं उत्सुक असेल तरच ह्या सर्व गोष्टी घडून येणार आहेत. याचा कायतो एकदा सोक्षमोक्ष करून घेतलाच पाहिजे. तिची आपण समक्ष गांठ घेऊन एकदा याचा कायतो निकाल करावा असें किती दिवसांपासूनतरी मी मनामध्यें योजित आहें. छे, आतां नाहींच स्वस्थ बसून उपयोग. पहिल्यानें तिला एक पत्र पाठवून तिची भेट घेण्याची आपली इच्छा आहे अशी विनंति करावी. त्या पत्राचा अनुकूळ जबाब आला तर पुढील व्यवस्था कशी काय करावयाची तें पहातां येईल. परंतु तिनें माझ्या पत्राला धुडकावून लाविलें तर? परंतु अशा कुशंका काढित बसून कांहीं वळावयाचें नाहीं. परमेश्वरावर भरंवसा ठेवून उद्योगालातर लागावें. पुढें नशिबीं असेल तें होईल.

[पत्र लिहिण्यासाठीं खोलींत जातो.

प्रवेश ३ रा.

[**स्थल**—निंबाजीरावांचें घर. वृद्ध निंबाजीराव चष्मा लावून लोडाशीं टेंकून बसला आहे. एका बैठ्या टेबलापाशीं कारकून जमाखर्चाच्या वह्या वगैरे लिहित आहे असा प्रवेश.]

निंबाजीराव—(नाकांत तपकिरीच्या एकदोन चिमुटा कोंबून उपरण्यानें नाक पुशितपुशित) अहो गोपीनाथपंत! आपण हें काय आरंभिलें आहे? मघांपासून मी पहात आहें, तुम्हीं कितीतरी लेखण्या तासून व्यर्थ घालविल्या. मला वाटतें, अशानें तुह्मी आमचें लवकरच दिवाळें काढणार! त्या येशानेंतर माझा पैसा कसा पाण्यासारखा उधळून टाकिला. बरें झालें, माझे डोळे लवकरच उघडले!—काय हो गोपीनाथपंत, त्याची तुमची हल्लीं कुठें गांठ पडली होती का?

गोपीनाथ—होय, परवां त्यांनां मीं त्या सुधारकांच्या सभेंत पाहिलें होतें. हल्लींच्या सुधारक चळवळींत ते अगदीं गढून गेले आहेत.

निंबाजीराव—बरें, त्याच्याबरोबर आणखी कोण कोण होते ?

गोपीनाथ—रावबहादुर पर्वतरावांचे ह्मणे ते अगदीं जीवश्च कंठश्च बनले आहेत. ती स्वारी अगदीं पाण्यासारखा पैसा खर्चित आहे! आणखी ऐकलेंत का यजमानसाहेब—

निंबाजीराव—पण गोपीनाथपंत! तुह्मी मजबरोबर बोलत आहां तोंपर्यंत ती समई उगाच जळत ठेवूं नका. पुन: लिहूं लागलेत म्हणजे खुशाल पेटवा. अशा या फुकट तेल जाळण्यानें दिवाळें निघायचें, समजलेत? (गोपीनाथ समई मालवतो.) हं, आतां चालूंद्या. सांगा पाहूं त्या कारट्यासंबंधानें काय ऐकिलेंत तें.

गोपीनाथ—त्या सुधारकांच्या नादीं लागून बाळासाहेब ह्मणे एका विधवेशीं पाट लावणार आहेत, अशी गांवांत दाट वदंता पसरली आहे.

निंबाजीराव—काय म्हटलेंत ? विधवेबरोबर पाट लावणार! अशी विधवा तरी कोणती ?

गोपीनाथ—त्या आप्पासाहेब सतकळांची बालविधवा सून हंसाबाई आहे ती—

निंबाजीराव—(संतापानें) ह्या कारट्यानें आमच्या कुळाला अगदींच बट्टा लाविला किहो !

गोपीनाथ—हंसाबाईजवळ म्हणे पुष्कळ दौलत आहे. तिच्याशीं पाट लाविल्यानें बाळासाहेबांनां पाहिजे तशी चैन मारायला मिळेल. मला वाटतें, आपण त्यांनां दूर केल्यामुळेंच बाळासाहेबांनीं हा मार्ग स्वीकारिला असावा.

(इतक्यांत सदोबा आचारी आंतून येतो.)

निंबाजीराव—काय सदोबा, तुझें इथें काय काम ?

सदोबा—आज दोनप्रहरीं ते गंगापुरचे पाहुणे इथें येणार तेव्हां त्यांचेसाठीं भोजनाचा बेत कसा काय करायचा ? पक्वान्नें वगैरे कायकाय करायचीं तें समजलें म्हणजे त्याप्रमाणें व्यवस्था करण्यास ठीक पडेल.

निंबाजीराव—(कारकुन समई पेटवितो; त्यावेळेस एका मागून एक पांचसहा काड्या व्यर्थ गेल्या असें पाहून तोंडावर हात ठेवून) अरे गोपीनाथ ! तूंतर बुवा माझें दिवाळेंच काढायला निघालास. अरे, तूं जर अशा काड्या नासूं लागलास तर मग आह्मांला भिक्षा मागण्याची पाळी लवकरच यायची ! (स्वगत)

मीं माझ्या जिवापेक्षां जास्त जपून इतका पैसा जमविला त्यांत आणखी हे शिंचे पाहुणे येऊन त्रास देतात.

सदोबा—मग यजमानसाहेब, आपली काय आज्ञा होत आहे?

निंबाजीराव–तिला सांग कीं, पडवींत शालू वगैरे उंची कपडे वाळत ठेव. (स्वगत) आपल्या घरीं उंची कपडा असा थोडाच आहे! परंतु जो आहे त्याचेंच होऊंद्या प्रदर्शन, ह्मणजे आपले इथें असले कपडे रोज वापरतात असा पाहुण्यांस भास होईल.

सदोबा—पण धनीसाहेब, भोजनाचा बेत काय करायचा त्याचा कांहींच खुलासा झाला नाहीं.

निंबाजीराव—हें पहा, तुम्हां आचाऱ्यांकडे पाहिलें ह्मणजे माझ्या तळपायाची आग मस्तकाला पोंचते. आचारी ह्मटले ह्मणजे उधळपट्टीचे जणूं मूर्तिमंत पर्वतच!

सदोबा—मग यजमानांनीं मला नोकरीवर कां ठेविलें? माझें कसब पूर्णपणें दाखविण्यास मला आपण संधी द्याल तेव्हां ना? ऐकूनतर घ्या अगोदर, मी असातसा आचारी नव्हें! वैद्याला सामील होऊन सडलेलें गवत व पानें ह्यांच्या भाज्या व चटण्या किंवा उंची सागोती ऐवजीं रोगट सागोतीचे व कुत्र्याच्या शेंपटीचे सुर्वे आपल्या धन्यास पाजून त्याला आजारी पाडणारांपैकीं हा सदोबा आचारी नव्हे बरें! मीं कधीं पिठांत माती मिसळून तसल्या पुऱ्या माझ्या धन्यास घातल्याचें मला आठवत नाहीं. आपल्यासारख्या यजमानांसहि मी आपल्या हस्तकौशल्यानें थक्क करित आहें. मला जे जे मसाले माहीत आहेत ते कुणासहि माहीत नसतील! असले मसाले देवादिकांच्या कधीं स्वप्नींसुद्धां आलेले नसतील. मीं जें जें तयार करितों त्याची नुसती याद केली तर अगदीं कृपणाच्याहि तोंडाला पाणी सुटेल! माझ्या हातचीं तऱ्हतऱ्हेचीं सांभारीं, स्वादिष्ट तळलेले मासे, सागुतीचे प्रकार, मसालेदार सुर्वे, यांची एकदा ओळख झाली ह्मणजे शंभर जन्मपर्यंत खाणाराच्या जिभेला विसर पडणार नाहीं—

निंबाजीराव--आग लागोरे त्या तुझ्या बातांना आणि तुझ्या तोंडाला!

सदोबा—काय भलतेंच बोलतां हें तुह्मी यजमान साहेब? मीं मेल्यावर मग मोठमोठ्या देवादिकांससुद्धां उपास काढावे लागतील उपास!

निंबाजीराव—(हंसून) एकूण देवादिकांससुद्धां तूं जेवावयास घालतोस तर!

सदोबा—होय महाराज! जेव्हां मी चुलीवरून फोडणीचे पात्राचें झांकण काढितों, तेव्हां वाफेबरोबर त्या पक्कान्नाचा मसालेदार घमघमाट जो बाहेर जातो त्यावरच देवादिकांचें पोट भरतें व आपल्या इथेंदेखील मला त्याच घमघमाटावर आपली क्षुधा शांत करावी लागते.

निंबाजीराव—परंतु ज्या दिवशीं उपास असतो त्या दिवशीं तुझ्या देवांचें कसें पोट भरतें?

सदोबा—त्या दिवशीं त्या बापड्यांनां उपोषणें करावीं लागतात. पण जेव्हां ते मला स्वप्नांत येऊन दर्शन देतात तेव्हां त्यांचीं तीं कृश झालेलीं शरीरें पाहून मला फारच कींव येते, व ज्या शास्त्रकारांनीं हे उपास शोधून काढिले त्यांनां शिव्या दिल्याशिवाय माझ्यानें रहावत नाहीं.

निंबाजीराव—बरें, पण ह्या तुझ्या बाता संपणारतरी केव्हां?

सदोबा—महाराज, आणखी थोडेंसें सांगायचें राहिलें. धाकट्या यजमानांनीं तर आपली गांवांत फारच कुचेष्टा आरंभिली आहे.

निंबाजीराव—(मोठ्या अधीरतेनें) काय, काय म्हणतोस? येशानें?

सदोबा—होय महाराज! त्यांचा तो दोस्त विश्वासराव नव्हे का, त्यांचा नोकर पांग्या मला परवां भेटला होता. तो आपण इतके उदार व दानशूर असून आपण अगदीं कवडीचुंबक आहांत ह्मणून मजजवळ आपली एकसारखी निंदा करित होता!

निंबाजीराव—हरामखोर! पाजी!! तो आणखी काय ह्मणत होता?

सदोबा—ज्याअर्थीं तुह्मी मला इतकें खोदूनखोदून विचारतां त्याअर्थीं मला सांगणें भागच आहे; ऐका तर मग. तुमच्या नांवानें दगड फोडल्याशिवाय बाळासाहेबांनां मुळींच चैन पडत नाहीं.पांग्या ह्मणत होता, आपण जोशीबुवांजवळून असें पंचांग तयार करविलें आहे कीं, त्यांत प्रदोष, एकादशा इत्यादि उपोषणांच्या दिवसांचा सुकाळ; व आपण मोटे कर्मठ व धर्मनिष्ठ असल्यामुळें स्वतः उपास करून घरांतील सर्व मनुष्यांस उपास करण्यास भाग पाडितां; व ह्याप्रमाणें महिन्यांतून पंधरा दिवस उपोषणांत गेल्यामुळें आपले पैसे वांचतात. आणखी दुसरें तो असें सांगत होता कीं, दिवाळी, शिमगा वगैरे सण जवळ आले ह्मणजे आपण कांहींतरी कुरापती काढून नोकरमाणसांवर ताशेरा झाडतां व ह्या युक्तीनें त्यांनां पोस्त वगैरे देण्याचा खर्च सहजरीत्या वांचिवतां. तो आणखी ह्मणत होता कीं,आपण घराच्या भिंतीस मोठें छिद्र पाडिलें आहे व त्यामुळें

रस्त्यावरील कंदिलाचा सर्व उजेड फुकट मिळून दिवावत्तीचा खर्च आपणांस मुळींच पडत नाहीं! तो ह्मणाला, एकदा स्वताच्या घोड्यासाठीं आणलेले चणे आपण तबेल्यांत जाऊन रात्रीस चोरून खात असतांना तुमच्या घोडेवाल्यानें तुह्मांस यथेच्छ चोपलें! एकदा शेजारणीच्या मांजरानें आपले इथील पोळी चोरून नेली म्हणून आपण कोतवालापाशीं तिच्याविरुद्ध फिर्याद नोंदविलीत! तो आणखी असें ह्मणत होता कीं, आपल्यास कधीं लांबच्या पल्ल्यावर पायीं जावयाचा प्रसंग पडला ह्मणजे आपण आपल्या जोड्यांची कींव करून त्यांचे तळवे झिजूं नयेत ह्मणून ते काढून घेऊन बगलेंत मारतां व अनवाणीच चालतां! सर्वच सांगूं लागलों तर मोठें रामायण होईल. आपणांस मारवाडी, चिकू, कवडीचुंबक इत्यादि अनेक विशेषणें दिल्याशिवाय बाळासाहेबांचा एकहि दिवस जात नाहीं—

निंबाजीराव—(रागानें लाल होऊन) चूप रहा! बस्स बस्स, पुरे कर! त्या हरामखोरास आज चांगलाच हात दाखवीन, तरच नांवाचा निंबाजीराव! परंतु नीचा! हरामखोरा! तुला हें सर्व सांगण्यास लाज कशी वाटली नाहीं?

[सदोबाला मारावयाला जातो. परंतु सदोबा त्याचे हातीं न लागतां पळतो. निंबाजी राव त्याला शिव्या देत त्याचा पाठलाग करित त्याचे मागून धावत जातो.

प्रवेश ४ था.

[स्थल—हंसाबाईच्या घराचा दिवाणखाना. हंसाबाई व तिच्या दोघी मैत्रिणी गजराबाई आणि ताराबाई बोलत बसल्या आहेत असा प्रवेश.]

गजराबाई—कायग, कालचा सुधारक तूं वाचलास का?

हंसाबाई—नाहीं गडे! कां बरं?

गजराबाई—तूंतरी बाई मला अगदीं वेडीच दिसतेस! ह्मणे कां? अग, तुझ्यासारख्या तरुण, सुस्वरूप, श्रीमंत विधवेनं सुधारकाचा कोनाकोंपरादिखील धुंडाळला पाहिजे, समजलीस? कसं तारा, मी ह्मणतें तें खरं कीं नाहीं?

ताराबाई—हेंग काय विचारतेस! मीदिखील आतां तेंच सुचिवणार होतें. पण तूंच गोष्ट काढलीस हें बरं झालं.

गजराबाई—मगतर जमलंच! कालच्या सुधारकांत 'पुनर्विवाहास तयार' अशी एक जाहिरात आहे. आपल्याजवळ एक उमेदवार त्या जागेला तयार आहेच! मग द्यायचा का हिच्या नांवानं अर्ज पाठवून?

ताराबाई—हो हो, बेलाशक! पण पुनर्विवाहास तयार असलेले गृहस्थ कसे आहेत, काय आहेत, तें पहिल्यानं कळलं तर जरा—

गजराबाई—अं: ! त्यांत आणखी कळायचं काय आहे. आणि खरं ह्मणशील तर ह्मातारा नवरा करणंच चांगलं ! शारदेंतील पदांत ह्मटल्याप्रमाणं

जरठास तरुण हो स्त्री जरी ! ती नवरा ! तो स्त्री परी—

हंसाबाई—(रागाचा आविर्भाव आणून) चला, तुह्मी दोघीहि अगदींच चहाटळ आहां ! असल्या तऱ्हेचं हिडीस बोलणं बोलाल असं मला बाई नव्हतं वाटलं !

ताराबाई—(हंसून) हं हं ! आतां आलं माझ्या ध्यानांत ! ऐकलं का गजरा, हिला तें पद नाहीं रुचत. तर 'सांवळा वर बरा गौर वधुला !' हेंच हिच्या मोठ्या आवडीचं आहे. (हंसाबाईस) खरंना ? कसं मीं अगदीं बरोब्बर ओळखलं ?

गजराबाई—हं हं ! अस्सं काय ? तेंहि कांहीं वाईट नाहीं ह्मणा ! आपले ते नवीन रावबहादुर शामसुंदर आहेत खरे—

हंसाबाई—हें पहा, मला तुमच्या ह्या असल्या पोरकट चेष्टा मुळींच आवडत नाहींत. अगोदरच वैधव्याच्या डागानं माझं अंतःकरण पोळून गेलं आहे नि त्यांत तुह्मी असं हें कुजकं भाषण करून आणखी डागण्या कां बरं देतां ?

ताराबाई—मग, तूं आजन्म असं हें वैधव्याचं दुःखच भोगित रहाणार आहेस वाटतं !

(इतक्यांत पिल्या प्रवेश करितो.)

हंसाबाई—(पिल्यास) कायरे, तूं कुणाकडून आलास ?

पिल्या—जी, त्ये आमच धनीसाब यसवंतराव जगताप न्हव का, त्येनीं ह्यो कागूद—

हंसाबाई—(चपापल्यासारखी होते व एकदम उठून पिल्याकडून पत्र घेऊन तें पदराखालीं लपविते.) जा बरं तूं. [पिल्या जातो.

गजराबाई—कायग, हें काय गौडबंगाल आहे ?

हंसाबाई—खरंच बाई ! ही काय भानगड आहे आपल्यालाहि ठाऊक नाहीं !

ताराबाई—गजरा ! तूंतरी बाई फारच चौकस दिसतेस ! अग, कांहीं का असेना, आपल्याला कशाला त्याची पंचाईत ? (कानाशीं लागते.) चल बाई उशीर फार झाला. चल जाऊं आतां आपण घरीं.

हंसाबाई—अग जाल ! एवढी घाई कसली आली आहे ? बसा अमळ. तसं कांहीं यांत गुप्त नाहीं. पण–पण–

गजराबाई—आलं, आलं बरं आमच्या लक्ष्यांत! बरं येतों आतां आम्ही. उद्यां येऊं मग सावकाशीनं बोलायला. [उभयतां जातात.

हंसाबाई—बरं झालं. गेल्या एकदाच्या धिंडका लौकर! त्यांच्याकडून आलेलं पत्र कधीं वाचीनसं मला झालं आहे. (घाईघाईनें पत्र उघडून वाचल्यावर.) अहाहा! किती पण गोड लिहिलं आहे पत्र! खरोखर, या स्वारीचं लग्न झालं असतं ह्मणजे माझ्या मनांतच हा पुनर्विवाहाचा विचार येताना! मी तो विचार मनांतून दूर करण्याचा पुष्कळ यत्न करतें, परंतु ह्या स्वारीची मूर्ति कांहींकेल्या अंतःकरणांतून ह्मणून ढळत नाहीं! नि पत्रांत काय बाई पुनर्विवाहाचं मंडण केलं आहे अन् माझं मन वळविण्याचा प्रयत्न केला आहे! यांच्या या आजच्या पत्रानं मला लहानपणची सर्व आठवण होऊन मन कसं उचंबळून येतं. किती गोड स्वभाव होता तेव्हां! नि अद्यापीहि स्वारी आपल्या मोहक वाणीनं आणि मिठ्या स्वभावानं प्रत्येकाला भुरळ घातल्याशिवाय रहात नाहीं! उगीच नाहीं, जो तो स्वारीची इतकी मनधरणी करित असतो तो! मावशी त्यांनां नाहींनाहीं तीं दूषणं देते, त्यांची निंदा करते, परंतु मावशीला हा सुमार नाहीं कीं, तिकडच्या मनाची अशी चमत्कारिक अवस्था झाल्यावर त्यांनीं बहकूं नये तर काय करावं? त्यांच्या त्या भिकारड्या चुलत्यानं दुष्टपणानं त्यांची नि माझी ताटातूट केल्या दिवसापासून त्यांची अगदींच वेड्यासारखी स्थिति होऊन गेली आहे. एकदातर ह्मणे विष पिऊन आत्महत्याहि करण्याच्या प्रयत्नांत स्वारी होती! किती हें तिकडचं मजवर निस्सीम प्रेम! या पत्रांततर स्वारीनं आपलं सारं हृद्गत ओतलं आहे. पण इकडे मी त्यांच्यासाठीं कशी सारखी झुरत राहिलें आहें, हें त्यांनां काय माहीत! परमेश्वरा! तूंच माझं मनोगत जाणत आहेस. तिकडे दारूचं अति व्यसन जडलं आहे, कर्जबाजारी झाले आहेत, हा सारा त्यांच्या मनाला जें दुःसह विरहदुःख भोगावं लागत आहे त्याचाच परिणाम होय. हीं व्यसनं दूर करून त्यांनां पूर्ववत् चांगल्या स्थितींत आणण्यास मला कितीसा उशीर लागणार—

सारजा—(प्रवेश करून) अवो बाईसाव, मावशीबाय देवास जायच्या खोटी हैती. तुमाली बलावल्यात. चला बिगी बिगी.

[दोघीही जातात.

[पडदा पडतो.]

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

[**स्थल**—रावबहादुरांची लायब्ररी. एका टेबलासमोर खुर्चीवर एक जंगी पुस्तक हातांत घेऊन रावबहादुर बसले आहेत इतक्यांत शास्त्रीबोवा प्रवेश करितात.]

शास्त्रीबोवा—रावबहादुर, आपण अगदीं अभ्यासांत गढून गेलां आहां वाटतें ?

रावबहादुर—कालच विकत घेतलेल्या ह्या 'डिक्शनरीचीं' पानें फाडित होतों. ह्या पुस्तकांत फार सुंदर गोष्टी आहेत असें त्या गणपतराव वकिलांनीं मला सांगितलें आहे. तीस—तीस रुपये पडले याला. आमच्यासारख्यांच्या लायब्ररींत असलें गोष्टींचें पुस्तक असलेंच पाहिजे, असें ते ह्मणाले. पण शास्त्रीबोवा, काल आपणास मार मिळाला, त्याबद्दल मला फारच वाईट वाटतें.

शास्त्रीबोवा—आपण विषयांतर करित आहां ! त्या गर्दभाच्या नादीं कुणीं लागावें ? म्हटलें आहे:—

अहो दुर्जनसंसर्गात् मानहानिः पदे पदे ।
पावको लोहसंगेन मुद्गरैरभिहन्यते ॥

रावबहादुर—बरें तें राहूंद्या. मला माझ्या आईबापांनीं सर्व शास्त्रें पढविलीं नाहींत. नाहींतर ह्या पृथ्वीच्या पाठीवर जेवढें ह्मणून ज्ञान आहे तेवढें सर्व मिळविण्याची मला अत्यंत इच्छा होती.

शास्त्रीबोवा—अशी इच्छा आणि ती आपल्यासारख्याच्याठिकाणीं उत्पन्न होणें हें सुदैवच होय. यांत तिलप्राय संशय नाहीं. ह्मटलें आहे—

आहारनिद्रा भयमैथुनंच । सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् ।
ज्ञानं हि तेषामधिको विशेषो । ज्ञानेन हीनः पशुभिः समानः ॥

ठीक आहे, आह्मी आपली इच्छा पूर्ण करूं.

रावबहादुर—पण मी अगदींच अज्ञान आहें.

शास्त्रीबोवा—ज्यास ज्ञान नाहीं तो पशूच ह्मटला पाहिजे! कारण—

साहित्यसंगीतकलाविहीनः । साक्षात् पशुःपुच्छविषाणहीनः ।
तृणं न खादन्नपि जीवमानः । तद्भागधेयं परमं पशूनाम् ॥

अशी भर्तृहरीची उक्ति आहे.

रावबहादुर—आपलें प्राकृत अगदीं रास्त आहे.

शास्त्रीबोवा—ज्ञान प्राप्त करून घेण्यास आपण बहुत उत्सुक दिसतां; पण आपला कुठपर्यंत अभ्यास झाला आहे याची आह्मांला पहिल्यानें थोडीशी कल्पना झाली पाहिजे. (कपाटाकडे बोट दाखवून) हे सर्व ग्रंथ आपण वाचले असतीलच ?

रावबहादुर—(डोकें खाजवून) अभ्यास ह्मटला तर मला लिहितांवाचतां येतें. आमचे विद्वान् मित्र ते रविवारपेठेंतले गणपतराव वकील नव्हेतका त्यांनीं ह्या नवीन पुस्तकाचीं पानें नीट फाडून ठेवण्यास मला सांगितलें आहे. ते तीं वाचून मग मला त्यांतील वाचावयाजोगते भाग निवडून देणार आहेत. उगाच डोळेफोड करून कोण घेतो. आम्हीं मोठ्या माणसांनीं प्रत्येक पुस्तक वाचलें तर मग आमचें मोठेपण काय कामाचें ? तथापि आह्मांला थोरपणासाठीं मोठमोठीं पुस्तकें विकत घ्यावीं लागतात. पुस्तकें विकत घेऊन आह्मी तीं या कपाटांत भरून ठेवितों. नंतर तीं आह्मी आमच्या स्नेह्यांनां वाचायाला देतों—

शास्त्रीबोवा—आपलें ह्मणणें अगदीं यथार्थ आहे. अस्तु. आतां आपणास कोणत्या विषयाच्या अध्ययनास प्रारंभ कर्तव्य आहे ? तर्कशास्त्रपारंगत होण्याची आपली इच्छा आहे काय ?

रावबहादुर—काय तर्कटशास्त्र ? वाः शास्त्रीबोवा ! कमाल केलीत ! आह्मांला तर्कटें करण्याची विद्या शिकवून तुरुंगांत पाठविण्याचा आपला मनसुबा आहे वाटतें.

शास्त्रीबोवा—अहो तर्कटशास्त्र नव्हे, तर्कशास्त्र तर्कशास्त्र ! ह्या शास्त्राच्या साह्यानें शास्त्रीय पद्धतीनें वादविवाद करून प्रतिपक्षाचें खंडन करितां येतें व विचारशक्ति बहुत प्रज्वलित होते.

रावबहादुर—नको नको, तें शास्त्र आह्मांला पसंत नाहीं ! आम्हांला दुसरी एखादी रावबहादुरांच्या योग्यतेला साजेल अशी विद्या शिकवा.

शास्त्रीबोवा—रावबहादुरांची मर्जी असल्यास नीतिशास्त्राचे पाठ देण्यास मी सिद्ध आहें.

रावबहादुर—काय चमत्कार आहे ! मला तुम्ही नीतिशास्त्र शिकविणार ? अहो, मजसारख्यांनां नीति ती अधिक काय शिकविणार ? मी काय अनीति करितों ? शास्त्रीबोवा, तुह्मीं माझी थट्टा मांडली आहे असें मला खास वाटतें. मला तुमचें नीतिबीतीचें शास्त्र नको !

शास्त्रीबोवा—मग आपली वेदांतविषयाचें अध्ययन करण्याची इच्छा आहे?

रावबहादुर—(आश्चर्यकारक मुद्रेनें) वेदांत ह्मणजे काय आहे ? त्यांत काय सांगितलें आहे शास्त्रीबोवा, सांगा पाहूं.

शास्त्रीबोवा—त्यांत सच्चिदानंदस्वरूप ब्रह्माचें विवेचन केलेलें असून एकमेवाद्वितीयं ब्रह्म असें प्रतिपादन केलें आहे. जीवात्मा ह्मणजे आपला आत्मा आणि परमात्मा ह्मणजे परब्रह्म हे कांहीं भिन्न नाहींत, परंतु एकच आहेत. ह्मणजे त्यांचें पूर्ण व सार्वकालिक तादात्म्य आहे असें वेदांतांत सिद्ध केलें आहे. माया ह्मणजे काय ? उपाधि ह्मणजे काय ? सत् ह्मणजे काय ? असत् ह्मणजे काय ? ह्या सर्व गोष्टींचा विचार त्यांत केला आहे. जग मिथ्या असून आपल्या अज्ञानानेंच केवळ तें सत्य भासत आहे; सत्यज्ञान ह्मणजे ब्रह्म, इत्यादि इत्यादि यच्चयावत् ब्रह्मज्ञान त्यांत सांगितलें आहे–

रावबहादुर—जळो तें ज्ञान–आग लागो त्याला ! तें ब्रम्हज्ञान नव्हे तर तो ब्रह्मघोंटाळा आहे.

शास्त्रीबोवा—मग रावबहादुर, आपणाला मी काय शिकवूं ?

रावबहादुर—खरोखर सांगूं, मला पत्रें लिहिण्यास शिकवा.

शास्त्रीबोवा—फार उत्तम आहे. जशी रावबहादुरांची आज्ञा. आपल्यास पत्रें लिहिण्यास शिकविण्यापूर्वी आपल्याला शुद्धलेखनाविषयीं चांगलें ज्ञान झालें पाहिजे व तें करून देण्यासाठीं पहिल्यानें मला आपणास वर्णविचारांविषयीं थोडक्यांत सांगितलें पाहिजे. वर्णविचारांत वर्णांचा व त्यापासून होणाऱ्या अक्षरांचा विचार सांगितला असतो. वर्ण म्हणजे अपासून ज्ञपर्यंत जे भाषेंतील साधे ध्वनि ते. वर्णांमध्यें दोन भेद आहेत–स्वर आणि व्यंजनें. ज्यांच्या साह्यानें अक्षर सिद्ध होतें ते स्वर. स्वरावांचून ज्यांचा पूर्ण उच्चार होत नाहीं तीं व्यंजनें. स्वर सोळा आहेत. अपासून अः पर्यंत. यांत अ इ उ ऋ ऌ हे ऱ्हस्व स्वर. आ ई ऊ ॠ ॡ हे दीर्घ स्वर. ए ऐ ओ औ हे संयुक्त स्वर. अं हा अनुस्वार आणि अः हा विसर्ग. व्यंजनें कोणतीं तें रावसाहेब जाणत असतीलच–

रावबहादुर—(उतावळीनें) क, ख, ग—

शास्त्रीबोवा—वः, आतां आपण फारच उत्तम उत्तर दिलें. तर मग आतां स्थानविचाराकडे थोडेसे वळूंया. मुखाच्या ह्मणजे तोंडाच्या ज्या स्थानापासून जो वर्ण निघतो तें त्या वर्णाचें स्थान होय. आतां रावबहादुर क्, ख्, ग्, म्हणा पाहूं.

रावबहादुर—क, ख, ग, घ, ङ, च, छ ज, झ, ञ, ट, ठ, ड, ढ–

शास्त्रीबोवा—अहो पुरे पुरे! आतां हे उच्चार कुठून निघाले सांगा पाहूं?

रावबहादुर—कानाच्या खालून. (मानेजवळ बोट दाखवितो.)

शास्त्रीबोवा—पण त्या अवयवास काय म्हणतात?

रावबहादुर—मान.

शास्त्रीबोवा—ह्मणजे कंठ. आणि हे उच्चार त्या भागांतून निघाले ह्मणून त्यांचें कंठस्थान समजावें. आतां रावबहादुर प् फ् ब् ह्मणा पाहूं.

रावबहादुर—प, फ, ब, भ, म, य, र, ल, व, श—

शास्त्रीबोवा—बस बस!! यांचे उच्चार कुठून निघाले सांगा पाहूं?

रावबहादुर—(मिशांजवळ बोट दाखवून) मिशांतून.

शास्त्रीबोवा—ह्मणजे ओंठांतून आणि ह्मणूनच त्यांचें ओष्ठस्थान ह्मटलें आहे?

रावबहादुर—होय माझ्या लक्ष्यांत आलें. तोंडांतून उच्चार आला खरा! (स्वगत) शुद्धलेखनविद्या शिकण्यांत खरोखर मोठी मजा आहे!

शास्त्रीबोवा—रावबहादुर, आतां आपण ओ औचा उच्चार करा पाहूं.

रावबहादुर—(मोठ्यानें) ओ औ अं अः क ख ग घ ङ च छ–

शास्त्रीबोवा—छे बुवा!! बरें, ह्याचें स्थान कोणचें असावें बरें?

रावबहादुर—(तोंड वेडेंवांकडें करून) तोंडाच्या पोकळींतून.

शास्त्रीबोवा—ह्याला कंठौष्ठस्थान ह्मणतात, समजलांत? कारण ह्यांचा उच्चार कंठ व ओष्ठ ह्यांच्या साह्यानें सिद्ध होतो.

रावबहादुर—धन्य, धन्य! आज मला कितीतरी ज्ञानप्राप्ति झाली आहे!

शास्त्रीबोवा—आज आपण इथेंच थांबू या. उद्यां तालुस्थान, दंतस्थान व नासिकास्थान यांविषयीं विचार करूं.

रावबहादुर—पण तीं शिकण्यांत आजच्यासारखीच मजा आहे का?

शास्त्रीबोवा—(उपरणें सांवरित जाण्याच्या तयारीनें) तें काय विचारतां! ह्याहूनहि अधिक गम्मत वाटेल.

रावबहादुर—माझे आईबाप कितीतरी मूर्ख, गाढव, बैल हो! मला इतका मोठा केला, पण हें शिकविलें नाहीं! बरें शास्त्रीबोवा, आपण घरीं जाण्याचे आधीं माझें एक नाजुक काम करायचें आहे—

शास्त्रीबोवा—कसलें इतकें नाजुक काम ?

रावबहादुर—(बाजूस नेऊन) मी एका सुंदरीवर मोहित झालों तिला एक पत्र लिहायचें आहे.

शास्त्रीबोवा—हंहं ! मग प्रेमपत्रिका लिहून पाहिजे होय ?

रावबहादुर—परंतु ती फारच सुरेख उतरली पाहिजे !

शास्त्रीबोवा—ठीक आहे. परंतु ती गद्यांत पाहिजे कीं पद्यांत ?

रावबहादुर—काय ह्मटलेंत ? गद्या पद्या तें काय ? आपल्याला बुवा तें कळत नाहीं. तुह्मी आपली कागदावरच लिहून द्या कशी !

शास्त्रीबोवा—अहो लिहून देणार कागदावरच ! पण ती गद्यरूपानें कीं पद्यरूपानें असावी, तें विचारतों.

रावबहादुर—तुह्मीतरी कसले मनुष्य हो ! मीं तुह्मांला एकदा सांगित कीं मला तुमचा तो गद्याहि नको आणि पद्याहि नको ह्मणून !

शास्त्रीबोवा—गद्यांतहि नको आणि पद्यांतहि नको ह्मणजे आव मग कांहीं लिहायलाच नको ह्मणाना ? (जाऊं लागतो.)

रावबहादुर—असे रागावतां कां शास्त्रीबुवा ? गद्या ह्मणजे काय ह्मणजे काय तें मला पहिल्यानें सांगातर खरें.

शास्त्रीबोवा—अहो गद्या पद्या नव्हे गद्य पद्य ! जें गद्य नव्हे तें पद्य नव्हे तें गद्य !

रावबहादुर—गद्य नव्हे तें पद्य आणि पद्य नव्हे तें गद्य ! (मोठ्यानें शास्त्रीबोवा, अशी लटपटपंची करूं नका. काय तें नीट समजावून सांगा


शास्त्रीबोवा—अहो आपण व्यवहारांत जें भाषण करतों त्याला गद्य

रावबहादुर—काय आश्चर्य आहे पहा ! आज माझी चाळिशी उल व इतके दिवस मी बोलत होतों तें सर्व गद्यांत असून मला गद्य म्हण हें अजूनपर्यंत कळलें नव्हतें ! बरें आतां पद्य ह्मणजे काय तें सांगा पाहूं

शास्त्रीबोवा—

आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला,
झाला तशांत जरि वृश्चिकदंश त्याला,
झाली तयास तदनंतर भूतबाधा,
चेष्टा किती मग वदुं कपिच्या अगाधा !

हें पद्य, समजलांत ?



[illegible]—अहो गद्यापद्या नव्हे, गद्यपद्य! जें गद्य नव्हे तें पद्य व पद्य नव्हे तें गद्य![अंक ३ रा, प्रवेश १ ला, पत्र ४४.]

रावबहादुर—बरें तर, मला पद्यांतच लिहून द्या. परंतु तें असें उत्तम लिहून द्याल कीं, तें वाचून तिच्या काळजाचे तुकडेतुकडेच झाले पाहिजेत!

शास्त्रीबोवा—परंतु त्याचा आरंभ कसा करूं ? हे मृगनयने, तुझ्या नेत्रकटाक्षांनीं मला अगदीं जर्जर करून टाकिलें—

रावबहादुर—छेछे! तसलें कांहींएक लिहूं नका हो! मला दांडपट्टा खेळतां येतो हें तुह्मी विसरलांत वाटतें ! आतां मला जर्जर करण्याची कुणाची प्राज्ञा आहे ?

शास्त्रीबोवा—फार उत्तम आहे ! उद्यां मी लिहून घेऊन येतों. ती पसंत पडल्यास पाठवावी.

रावबहादुर—ठीक आहे. पण ती पद्यांत पाहिजे पद्यांत, बरें !

शास्त्रीबोवा—बरें आहे. आतां येतों मी.

[जातो.

रावबहादुर—कोण आहेरे तिकडे ? दौलू ?

दौलत्या—(प्रवेश करून) जी.

रावबहादुर—अरे तो शिंपी माझे नवे कपडे घेऊन आला काय ?

दौलत्या—जी व्हय. तो भाईर वाढुळ बसलाया. आपुन पंतोजीजवळ लिवायला गुतला व्हतां ह्मनुनशान् त्येला आंतमंदी येऊं न्है दिलं पगा.

रावबहादुर—येऊंद्या त्याला इकडे. (दौलू जातो. शिंपी हातांत कपड्यांचें बोचकें घेऊन प्रवेश करितो. त्याचे बरोबर त्याचा लहान मुलगाहि येतो.)

शिंपी—रामराम रावभादुरसाब!

रावबहादुर—कायरे लेका, कपडे शिवायला इतके दिवस कां लावलेस ?

शिंपी—नाहीं सरकार! पंचवीस णोकर भाज्याणें लाउणशेनी आपल काम झपाटल. काम कस पर–णामी काम झालय अक्षी! णुसत पघत न्हाव !!

रावबहादुर—ती परवां तुमान पाठविलीस ती कितीतरी घट्ट! माझे पाय आंत शिरेनात ह्मणून ती फाडून आंत पाय घालावे लागले. तसेंच तें पैरण पहा, त्याचा गळा मला फाडावा लागला इतका अरुंद.

शिंपी—इची भन! म्यां ती किती पन सैल ठिवली व्हती !! रावभादुरांची सवारी इक्त्यामंदी छातीमंदी तटाट भरली अक्षी! (हंसतो.)

रावबहादुर—पण ह्या गुंड्या पहा किती वांकड्या लाविल्या आहेस त्या ! आणि ही फीत आंतल्या बाजूस कां म्हणून लाविलीस ?

शिंपी—म्हाराज, मोटमोट रावसायेब, रावभादुर अशाच तऱ्हेण फीत लाउनशेनी घ्येत्यात. अलीकड अशीच फासण निगालिया.

रावबहादुर—(शिंप्याच्या अंगाजवळ जाऊन त्याचा कवजा धरतो.) अरे लेका ! पण हा कपडा तूं माझ्यांतून खास चोरला असावास ! माझाच तो माझाच. बोल, चोरलास कीं नाहीं? चोर हरामखोर!

शिंपी—ह्यो कपडा इतका उंची आन् ब्येस दिसला की, माज मन त्यावर अक्शी बसल. मी रावभादुरांचा शिंपी आन् मंग मला नग का असल भपकदार कपड वापरायला?

रावबहादुर—बरें, माझे नवे कपडे घालून पाहूंदे.

शिंपी—हंहं, रावभादुर ह्ये काय? आपल्यासारक्या थोर मानसांणीं अस सवता कपडे चढवाव? ह्ये सोभत का? गड्यांणा हांक मारा की !

रावबहादुर—पांड्, अरे पांड्! (पांड्र भपक्याच्या पोषाखांत येतो.)

शिंपी—(पांडूस) मी म्हाराजांस पोश्याक चढवितों. चल तूंबी हात लाव. (शिंपी व पांडू रावबहादुरांस पोषाख चढवितात.)

शिंप्याचा मुलगा—सरदारभादुर, तुमी लय ब्येस दिसतां पगा ! (लवून मुजरा करितो.)

रावबहादुर—(स्वगत) काय! मला यानें सरदारबहादुर म्हटलें? पहा, पोषाखाचा काय महिमा आहे तो! जर मी असें न करितों तर मग मला कोणीतरी सरदारबहादुर म्हणतें काय? (उघड) हें घे बक्षीस! (रुपया फेंकतो.)

शिंप्याचा मुलगा—शिरीमंत, लई लई उपकार झाले–

रावबहादुर—हे घे आणखी! (दोन रुपये फेंकतो.)

शिंप्याचा मुलगा—शिरीमंत सरकार अक्षी दयाळु हैती!

रावबहादुर—ही घे आणखी चिरीमिरी. (पांच रुपयांची नोट फेंकतो.) (स्वगत) आतां मात्र फजितीची वेळ आली. जरका ह्या मुलानें आतां राजाधिराज म्हटलें तर याला मी काय देऊं? द्याला द्यावयाला आतां माझ्या खिशांत कांहीं उरलें नाहीं.

[शिंपी व त्याचा मुलगा मोठ्या अदबीनें लवून मुजरा करून जातात व दुसऱ्या बाजूनें रावबहादुर व त्यांचा नोकर पांड्या हे उभयतां जातात.]

प्रवेश २ रा.

[स्थल—रावबहादुरांच्या घराची मागीलदारची पडवी. दौलत्या प्रवेश करतो.]

दौलत्या—पोर पन् पोर हाय् ! अशी नक्रबाज आन् गुल्जार पोर बाच्यान् आपुनतर समद्या जल्मांतबी पगीतली न्है ! अग बाय—बाय ! काय बिजलीवानी चमकतिया ! (मिशांवर हात फिरवून) ह्यो पट्या ती आवा खास पटकावनार. आन् माज फुईकड वाइळ जान्याच कारनतरी काय हाये ? जरा रडत ग्येलो आन् म्हंगालो 'फुई, आतां न्है आपुन तुजसंग ऱ्हानार !' म्हंजी ती म्हंगनारच की दगडीसंग तुज लगीन ब्येगीनशेनी करून घेतो म्हुन. कशी ब्येस काडलीया युगूत ! ह्या युगुतीपरमानं फुई व्हय तर झंगाली–पन् त्या पोरीच डोक्स न्है दिसत थाऱ्यावर. तिच समद ध्येन त्या मेल्या पांग्यावर गुतलस दिसतया. काय त्यो ल्योकाचा वानर–पांग्या आन् ही येडी पोर त्येचवर कशापाई इक्ती भाळलिया ! (खिशांतून आरशीची डबी काढतो व तींत तोंड पाहून) त्यो का माज्यासारका मरदतरी दिसतुया व्हय ? शीः ! त्यो काय माकडतोंड्या माज्यासारका दिसनार ! (मिशांला पिळ देतो) वाः ! माजा कसा ह्यो काळभ्वार पानीदार च्हेरा आन् त्यो ल्योकाचा घुबडावानी असूद कसा वंगाळ दिसतुया! येडीर येडी पोर! माज्यासारका दाना टाकुनशेनी त्यो माकड तिला गमतो व्हय ? रातदिस मी तिच्या संगसंगच ऱ्हातो, ग्वाडग्वाड बोलूनशेनी तिची मनधरनीबी करतों, पर मस्नी पगीतलर पगीतल की ती रांड डाकीन जसी कुत्र्यावानी वस्कन् अंगावर येतीया ! आन् त्यो पांग्या आला झंजे मंग ! मंग कशी गालामदी अक्शी गुलुगुलु हसतीया. दगडे ! मी काय तुज घोड मारल हाय व्हय ? ती रांड हीं समदीं सोंग करतिया सोंग ! खर म्हंगाल, तर तिला मीच लइ प्यार हाये. अर घेवा घेवा ! त्ये दिसा तिच त्या मुरक्यान् आपुनतर ग्येलो–ग्येलो–अक्शी बेजार होऊनशान ग्येलो ! आन् फुइन पर परवा मस्नी सांगल हाय,की, दगडीसंगच तुज ब्येगीन लगन करूनशान घेतो म्हुन. आता ह्यो पट्या दगडीचा घरधनी व्हनार ! आन् आता ती फटाकडी दिसलीर दिसली की आपुन तिला घट्ट दाबूनशेनी धरनार ! शीः, आतां आपल्या बाच्यान्‌बी निंगायचा नाय दम! (किंचित् विचार करून) कस कस ?–ती आलीर आली की डवोळयांत कायबी ग्येल्याच ढवांग करूनशान जाव तिच्याकड हळूहळू आन् हूं काय ! (समोर कोणी येत आहे असें पाहून) अर आलीर आली ! (पटकन् डोळे चोळूं लागतो. समोरून पांग्या येतो त्यास दगडी समजून घट्ट पकडतो.)

पांग्या—अर, मल्ली कोन समजला हैस? मी काय तुजी बाईलबिईल हाय, व्हय?

दौलत्या—अग नसलीस म्हुनशेनी काय झाल? व्हशील दो दिसांनीं.

पांग्या—(स्वगत) ह्यो ल्योकाचा त्या दगडीवर आसक होऊनशेनी मलाच दगडी समजतुया. (चोरआवाजानें उघड.) पन ह्ये काय! कुनी पगीलबिगील तर थुकल की त्वांडावर! मेली मणांची नसली तरी जणांची–(घाबरल्यासारख्या आवाजानें) अव–अव–फुये आल–फुये! अव–पला पला—

(दौलत्या घाबरून चटकन् डोळे उघडतो. तों हंसत असलेला पांग्या त्याच्या दृष्टीस पडतो. त्याबरोबर ओशाळतो.)

दौलत्या—(हंसण्याचा आविर्भाव करून) कशी क्येली गम्मत!

पांग्या—ल्योका तूं क्येली की म्यां? ल्योकाला वर नाक करूनशेनी बोलायाची सरम वाटत न्है! घरांत चाकर मानसांसंगतीं असल ढंग करित असतोस व्हय?

दौलत्या—(रागावून) ल्योकाची मिजास पगा मिजास! कस ढंग क्येलर? आन् क्येल म्हुन तुज्या बाच काय ग्येल? मुस्काट फोडूनशान ध्येशील लय बोलशील तर. तुज्या बाच काय भय हाय व्हय?

(दोघे हातघाईवर येतात. पांग्या दौलत्याला खालीं पाडतो. इतक्यांत रावबहादुरांची 'दौलू दौलू' अशी हांक ऐकूं येते त्याबरोबर दौलू रागारागानें निघून जातो.)

पांग्या—(आपल्याशींच) ल्योका, त्या दगडीच आजपुन नावतर काड मंजी दावतो तुला कसा काय हाय माजा कचका!

दगडी—(प्रवेश करून) ह्योर कोन हृत! चोरीबिरीतर करायाचा मनसुबा न्है ना?

पांग्या—(हंसून) अग व्हे व्हे, चोरीच कराया आलुया. (दगडीचा हात धरून) तुला चोरूनशान न्हेयाची हाय ना, म्हुनतर आलोय हृत. बर योक—

दगडी—असला चाठालपना मल्ली न्है खपायचा! त्ये पगा रावभादुर येत्यात. आटपा आटपा लौकर. ह्यो कागद मंजुलाबायसायबांनीं त्या तुमच्या इस्वासरावासनी दिलाया; हा घ्या, आन् दौडा लौकर.

[उभयतां जातात.

प्रवेश ३ रा.

[**स्थल**–रावबहादुरांचा दिवाणखाना. रावबहादुर पार्टीस जाण्याचा फॅशनेबल ड्रेस करून तोंडांतील चिरूटाचे धुराचे लोळ टाकित दिवाणखान्यांत ऐटीनें पदक्षेप करित आहेत असा प्रवेश.]

रावबहादुर.—(स्वगत) कांहीं करा, ज्यांतत्यांत हिची आपली लुडबुड आहेच! ही ब्याद इथून तोंड काळें करती, ह्मणजे सुटलों असतों एकदाचा या त्रासांतून! काल मावशीकडे जायची तीसुद्धां गेली नाहीं. आतां म्हणे आपण कधींच माहेरीं जाणार नाहीं, इथेंच मरणार–पण शिंची लवकर मरतहि नाहीं! गांवांत प्लेग, महामारीनें शेंकडो लोक मरतात पण ह्या शिंचीला प्लेगहि होत नाहीं नि पटकीहि नेत नाहीं—

ह्माळसाबाई—(प्रवेश करून) कां, कसला विचार चालला आहे? हौस फिटली नाहीं वाटतं अजून? आपल्या या अशा ढंगांनीं घरदार धुळीस मिळाल्याविना नाहीं रहायचं बरं! काय ह्मणे रावबहादुर! रावबहादुर म्हणण्यापेक्षां ढंगबहादुर ह्मणणंच आपल्याला जास्त शोभेल—

रावबहादुर—काय त्रास पहा! तूं इकडे आलीसतरी कशाला? कुणीं बोलावलें होतें तुला? जा जा, चालती हो पाहूं घरांत; मला या वेळीं फार राग आला आहे!

ह्माळसाबाई—अबबब! केवढा पण राग? त्या रागाची दाखवा जा कुणाला हवी त्याला भीति! माझ्या समोर असलीं सोंगं नाहीं खपायचीं बरं! ह्मणे इथून चालती हो? कां जाईन मी! आणखी कुणी मेले लफंगे डोकीवरून हात फिरवायला यायचे असतील वाटतं! द्या, खुशाल त्यांनां घरदार लुटून द्या नि मग वडिलांचा दोरी वळण्याचा अगर हेलपाटीचा धंदा करित स्वस्थ बसा.

रावबहादुर—तूं आतां तोंड आटपतेस कीं नाहीं! का तुला–चूप–चूप! ते पहा यशवंतराव येताहेत—

ह्माळसाबाई—(त्याच्याकडे पाहून हंसून) आपले मित्र यशवंतराव दिवाळखोर नव्हेत हो ते! नीट पहा, ते विश्वासराव येत आहेत.

रावबहादुर—कोण, विश्वासराव का तो? ही पिडा कशाला आली? (ऐटींत उभा रहातो. इतक्यांत विश्वासराव आंत येऊन रामराम करतो.)

विश्वासराव—रामराम रावबहादुर! आपल्याला रावबहादुरीची पदवी मिळाल्याचें ऐकून मला फार आनंद होत आहे. या आनंदकारक गोष्टीबद्दल आपलें अभिनंदन करण्याला आणि—

रावबहादुर—आणि काय? बोला झटपट्, मला जरूरीचें काम आहे.

विश्वासराव—आणि-आणि आपल्या चरणांपाशीं एक नम्र विनंति करायला मी आलों आहें.

रावबहादुर—माझ्या चरणांपाशीं विनंति करायला आलां आहां? ठीक आहे. (पाय पुढें करितो.) करा काय विनंति करायची ती त्यांच्यापुढें.

ह्माळसाबाई—(रावबहादुरांस एकीकडे) हें काय? शुद्धीवर आहां कीं नाहीं आज? ते काय म्हणतात तें ऐकून घ्याल कीं नाहीं!

विश्वासराव—आतां जी गोष्ट मी बोलणार आहें ती थोडीशी संकोचाची तर खरीच-वास्तविक हें बोलणें माझ्या वतीनें दुसऱ्या कुणीतरी करावयास पाहिजे होतें. परंतु गोष्ट निकरावर आली असल्यामुळें या वेळीं संकोच, लाज, भीड वगैरे सोडून वागावें लागत आहे, याबद्दल मला क्षमा असावी. मीं दोन वर्षांपूर्वीच तिऱ्हाइताकडून मंजुळाबाईला मागणी घातली असून माझ्या त्या विनंतीला आपण मान दिला, व आमच्या लग्नाचा वाङ्निश्चयहि केला हे आपले मजवर मोठे उपकार आहेत. आपल्यासारख्या रावबहादुरांचे जामात होणें हें मी एक मोठें भूषण समजतों आणि माझ्यासारखा जांवई मिळविण्यांत आपल्यालाहि आनंद वाटला पाहिजे असें मला वाटतें. आह्मां उभयतांचें परस्परांवर केवढें प्रेम जडलें आहे ही गोष्टहि आपल्यापासून गुप्त नसेल. एवढ्या सर्व गोष्टी जमून आल्या असतां व आमच्या लग्नाचें ठाम ठरल्याचें सर्वतोमुखीं झालें असतां, आपण आपला पूर्वीचा ठराव रद्द करून त्या भिकारड्या यशवंतरावाला जांवई करण्याच्या विचारांत असल्याची अमंगळ बातमी माझ्या कानीं आली आहे, आणि म्हणूनच आज मी सर्व लाजलज्जा गुंडाळून आपला खराखरा विचार काय आहे तें समजून घेण्यासाठीं आलों आहें. वास्तविक पाहूं गेलें असतां वाङ्निश्चय आणि लग्न यांत मोठासा फरक नाहीं. एकदा वाङ्निश्चय झाला असतां तसेंच कांहीं विशेष कारण असल्याविना लग्न मोडणें हें कोणालाहि शोभण्यासारखें नाहीं. माझ्यांत आपण कोणतें व्यंग पाहिलें आणि यशवंतरावांत काय अधिक पाहिलें कीं आज आह्मां उभयतांच्या जडून आलेल्या प्रेमांत हा असा अकल्पित बिघाड करित आहां? माझ्या हातून असा अपराधतरी कोणता घडला!

रावबहादुर—(ऐटीनें) बस, एकदा सांगितलें ना कीं मला तुमच्याजवळ जास्त बोलण्यास सध्या फुरसत नाहीं म्हणून? ज्याला पदवी मिळाली असेल, अगर जो सरदारघराण्यांत जन्मला असेल, त्यालाच मी आपली मुलगी देणार! तुमच्यासारख्या भिकारड्याला मी कधींहि आपला जांवई करणार नाहीं. व्हा पाहूं मुकाट्यानें इथून चालते? जास्त किटकिट करूं नका. सध्या मला वेळ नाहीं. त्या कचरपूरच्या नबाबाला पानसुपारी देण्यासाठीं आज सभा आहे तिकडे मला गेलें पाहिजे. (घड्याळ पहातो.)

विश्वासराव—रावबहादुर! पदवीच्या आणि सरदारघराण्याच्या खुळानें आपल्या डोक्याला भ्रम झाला आहे. अंगीं काडीची योग्यता नसतां हांजीहांजी करून आणि साहेबलोकांचे बूट पुसून पदवीचा बिल्ला छातीवर अडकविल्यानें लोकांत योग्यता रतीभरहि वाढत नसते! अशा शेंकडोंशें जरी पदव्या मिळविल्या तरी त्यांची किंमत कस्पटाहूनहि जास्त नाहीं, असें मी समजतों. गाढवाच्या पाठीवर साखरेच्या गोणींच्या गोणी लादल्या तरी त्या गाढवाला साखरेची रुची आणि किंमत थोडीच कळावयाची आहे! मोराचीं पिसें लावून एखादा डोमकावळा मोरासारखें नृत्य करीन ह्मणेल तर त्याला तें थोडेंच साध्य होणार आहे! या अशा पदवीनें त्या मनुष्याचें जास्त हंसूंच होत असतें. तेव्हां आपण आपल्या डोक्यांतून या विलक्षण वेडाला जितक्या लवकर घालवाल तितकें बरें. आतां सरदारघराण्यासंबंधींहि अशीच गोष्ट आहे. नांव सोनूबाई आणि हातीं कथलाचा वाळाहि नाहीं! अशींच सरदारघराणीं सांप्रत आपल्याला फार आढळून येतील. नांवामागें श्रीमंत ही पदवी लावून घ्यावयाची आणि पैशा दोन पैशांसाठीं एखाद्याची हांजी हांजी करून पोटाची खळगी भरावयाची, असे सरदार मीं कितीतरी पाहिले आहेत. माझ्या नांवामागें रावसाहेब, रावबहादुर वगैरे पदवी लावायला नाहीं खरी, त्याचप्रमाणें श्रीमंत किंवा सरदार वगैरे ह्मणविण्यास, सरदारघराण्यांतहि माझा जन्म झालेला नाहीं ही गोष्टहि खरी; तथापि मीं स्वकष्टानें आणि स्वताच्या कर्तबगारीनें आजची स्थिति प्राप्त करून घेतली आहे. गरीब खरा, परंतु कुलीन आणि जुनाट घराण्यांत माझा जन्म झाला आहे. मी आत्मप्रशंसा करतों असें कोणी ह्मणेल तर ह्मणो; पण मी स्पष्ट सांगतों कीं, माझ्यासारखा जांवई प्राप्त होण्याला आपली सबळ पुण्याई पाहिजे. आपण अशा हीन पदवीस आपला विचार बदलणें हें—

रावबहादुर—बस बस ! मी तुमचें पुराण ऐकूं इच्छित नाहीं. तुह्मांला पदवी मिळालेली नाहीं किंवा तुह्मी सरदारघराण्यांतील नाहीं, तेव्हां माझी मुलगी मी तुह्मांला साफ देणार नाहीं. तुम्ही आतां एक क्षणभरहि इथें राहूं नका. एकदम चालते व्हा! [विश्वासराव संतापून आणि खिन्न होऊन जातो.

ह्माळसाबाई—काय हें, तुह्मीं त्या गृहस्थाचा असा काय अपमान केला हा ! जरा कांहींतरी भीति बाळगायची होती ! नि तुम्हीतरी कुठं सरदार-घराण्यांतले आहांत, कीं, सरदारच जांवई करणार तो ! मामंजींनीं स्वकष्टानंच उदर-निर्वाह केला; माझ्या वडिलांनींहि पण स्वताच्या पराक्रमानं एवढी संपत्ति मिळवून माझ्यासह ती तुमच्या हवालीं केली. तुह्मी सरदारी मिळवायला कुठं दिवे लावायला गेलां होतां ! स्वतां कवडी मिळविली नाहीं ती नाहींच, नि आयत्या पिठावर रेघोट्या ओढण्याचीसुद्धां अंगीं अक्कल नाहीं !

रावबहादुर—चूप कर ! तुझा बाप हेलपाटी करित होता त्याचें लांछन तुला, मला काय त्याचें !

ह्माळसाबाई—मग हेलपाटीवाल्याचीच मुलगी बायको केलीतना ? तरी बरं, माझ्या वडिलांनीं पैसा कमवून तुमच्या घरांत ओतला म्हणून आज डोक्यावर ही अशी पगडी चढवायला मिळते आहे. नाहींतर आज इथं हेलाची पाटीच चढली असती !

रावबहादुर—बस बस, फाजीलपणा करूं नकोस, सांगून ठेवतों! चांभाराच्या देवाला खेटराचीच पूजा पाहिजे ! तुला मी ममतेनें वागवतों तें नाहीं कामाचें. तूं आपल्या कामाला चालती हो कशी ! आह्मी आमच्या योग्यतेप्रमाणें जांवई करणार ? तुला कुणीं मध्यें लुडबुड करायला सांगितलें. माझ्यासारख्या रावबहादुरांची मुलगी असल्या भिकाऱ्याच्या पदरीं बांधायची ! छत्, हें कदापिहि घडणार नाहीं !

ह्माळसाबाई—मला कुणीं लुडबुड करायला सांगितलं ? ह्मणजे माझा कांहींच अधिकार नाहीं वाटतं ? (वेडावून) म्हणे, कदापिहि ही गोष्ट घडायची नाहीं ! कशी नाहीं घडत ती मी पहातें ! मी तुमचं कांहींएक चालूं द्यायची नाहीं वरं ! माझ्या मंजुळेचं मी विश्वासरावाशींच लगीन करणार.

रावबहादुर—बायकांनीं आपली अक्कल चुलीपुढेंच चालवावी. व्यवहारांत त्यांनीं आपलें डोकें कधींहि खुपसूं नये, समजलीस ! त्या भिकाऱ्याला मुलगी देऊन त्याच्याबरोबर तिनेंहि भिक्षा मागत हिंडावें असेंच कीं नाहीं तुझें म्हणणें ?

मूर्ख नाहीं तर ! मी तिला सरदारघराण्यांतच देणार-श्रीमंत घराण्यांतच देणार- बस्स ठरला माझा निश्चय ! [झाळसाबाई पाय आपटित निघून जाते.

मंजुळा—(मघांपासून दाराआड उभी राहून लक्ष्य देऊन सर्व प्रकार ऐकत होती ती आतां पुढें येऊन बापाच्या पायांवर डोकी ठेवून) बाबा बाबा ! नकाहो तुह्मी असा हट्ट धरूं ! मला तुमची ती सरदारी नको, श्रीमंती नको, पदवी नको, कांहींएक नको! बाबा, माझी जर अशी विटंबना करायची होती, तर तुह्मीं मला एवढं शिक्षण कां बरं दिलं ! मला इतरांप्रमाणं मूर्खतरी ठेवायची होती ह्मणजे ज्याच्या गळ्यांत आपण बांधाल त्याच्याबरोबर मी मुकाट्यानं गेलें असतें. परंतु तुह्मीं मला शिक्षणाचा लाभ घेऊं दिला, लिहावाचायला शिकविलंत, बरं कोणतं, वाईट कोणतं तें समजण्याची पात्रता माझ्या अंगीं येऊं दिली नि आतां ढळढळीत जी गोष्ट भयंकर दिसते आहे ती माझ्याकरवीं करायला निष्ठुरपणानं कसे तयार होतां ? बाबा ! प्रेम एकदा एखाद्या ठिकाणीं जडलं ह्मणजे तिथून तें कधींहि ढळायचं नाहीं. प्रेमापुढं इतर सर्व सुखं, ऐश्वर्य तुच्छ आहेत. या प्रेमामुळं एखाद्या राजवाड्यांत संपूर्ण ऐश्वर्य, विलास भोगून जें सुख लाभायचं नाहीं तें एखाद्या यःकश्चित् झोंपडींत सदा दुःखक्लेश भोगावे लागले तरीसुद्धां प्राप्त होत असतं. माझं मन पूर्वींच विश्वासरावांवर जडलं आहे. आतां तें कांहीं केल्या तिथून ढळायचं नाहीं. माझ्या मनानं तर मीं त्यांनां वरून चुकलेंच आहें. मी आतां दुसऱ्या कुणालाहि वरणार नाहीं ! विश्वासरावांखेरीज इतर पुरुष मला तुमच्यासारखे आहेत. विश्वासरावांनीं माझे कितीहि हाल केले, त्यांचेबरोबर मला भीक मागावी लागली तरी मी तें सर्व सहन करीन. पण दुसऱ्या कुणाचं सुख व ऐश्वर्य मला नको. नि बाबा, आपण पूर्वीं त्यांनां जें वचन दिलं आहे तें आपलं वचन मोडूं नका. वचनभंगाचं पातक-

रावबहादुर—(रागानें) कारटे ! मला ब्रह्मज्ञान शिकवितेस काय? तुला इतके पैसे खर्चून शिकविलें त्याचा हाच परिणाम वाटतें ? निर्लज्ज होऊन मला प्रेमाच्या गोष्टी शिकवितेस ? मला अमुकच नवरा पाहिजे, मी अमक्यालाच वरणार असें सांगायला तुला शरम नाहीं वाटत ? त्या भिकारड्याबरोबर भीक मागणार होय ? चल नीच कारटे इथून ! दुसऱ्याला तूं वरणार नाहींस नव्हे ? तूं काय समजली आहेस ? त्या यशवंतरावाशींच मी तुझें लग्न करणार, मग तो तुला आवडो अगर न आवडो. तुझें कांहींएक ऐकणार नाहीं. बेशरम कारटी ! चल, चालती हो इथून !

[मंजुळेला लोटून देऊन निघून जातो.

प्रवेश ४ था.

[**स्थल**—मोतीबाग. एका बांकावर विश्वासराव
खिन्न मुद्रेनें बसला आहे असा प्रवेश.]

विश्वासराव—झालें, एकदाचा सर्व संशय फिटून गेला. आतां आशाहि उरली नाहीं नि उमेदहि पण राहिली नाहीं. अरेरे! तें सुंदर रत्न शेवटीं त्या माकडाच्या गळ्यांत बांधलें जाणार ना? पर्वतराव! ह्या पातकाचा परमेश्वरास तुह्मी काय जाब द्याल? तुमच्या डोळ्यांवर पदवीची धुंदी चढली आहे, सारासार-विचार, पात्रापात्रता यांचा गंधहि तुमच्या ठिकाणीं उरला नाहीं, तुम्ही मनसोक्त वर्तन आरंभिलें आहे, पैशांचा चकाचूर मांडला आहे; तुमचे हे मूर्खपणाचे ढंग खुशाल चालवा, त्याबद्दल माझें कांहींएक म्हणणें नाहीं; परंतु तुम्हीं आपल्या प्रत्यक्ष मुलीशीं जें कठोर आचरण आरंभिलें आहे तें मात्र महत्पाप होय. परमेश्वराचे घरीं या पापाचें भयंकर प्रायश्चित्त तुह्मांला भोगावें लागेलच लागेल! पण मीतरी वेड्यासारखें काय बरळतों आहें हें! बिचाऱ्या पर्वतरावाकडेतरी काय अपराध आहे? मी सुखी होऊं नये असेंच जर परमेश्वराच्या मनांतून असलें, मंजुळेचा आणि माझा संबंध घडून येऊं नये असेंच जर आह्मां उभयतांच्या दैवीं लिहिलेलें असलें, तर त्या मूर्ख पर्वतरावालातरी कुठून सुबुद्धि होईल! पण विधियोजनातरी केवढी विचित्र आहे पहा! ती लावण्याची खाण, सद्गुणांची पुतळी, प्रेमाचें निधान मंजुळा कोणीकडे आणि हा लुच्चा, लफंगा, दिवाळखोर, व्यसनी यशवंतराव कोणीकडे! हा पाजी यशवंतराव भलभलत्या थापा देऊन त्या पर्वतरावाला शेवटीं भिकेस लावणार! (इतक्यांत मंजुळा येते व विश्वासराव स्वतांशींच बोलत आहे असें पाहून त्याचें भाषण ऐकण्यासाठीं एका झाडाआड लपून रहाते.) यशवंतरावाला जांवई करण्यांत या मूर्खानें त्याच्यांत एवढें विशेष तें काय पाहिलें? आज इतके दिवस आम्हां उभयतांचें प्रेम वाढत आलेलें—परस्परांच्या आणाभाकाहि झालेल्या, ह्या सगळ्या गोष्टी याला माहीत असतां आणि आमच्या लग्नाबद्दल चारचौघांसमक्ष स्वता आपणहि संमति देऊन चुकला असतां आज हा आमच्या प्रेमाचा विघड करतो आहे व त्या यशवंतरावाच्या नादीं लागला आहे. कां, तर तो ह्मणे सरदारघराण्यांतला आहे! याच्या डोक्यांत हें सरदारीचें आणि पदवीचें जें विलक्षण वेड भरलें आहे त्यापुढें याला दुसरेंतिसरें कांहींएक सुचत नाहीं! बरें, त्या यशवंतरावाचेंतरी मंजुळेवर प्रेम आहे का?

त्याचें सारें लक्ष्य हंसाबाईच्या ठिकाणीं आहे असें ऐकतों. आणि त्याच्याशीं हा मंजुळेचें लग्न करणार ! अरेरे ! अशानें त्या बिचाऱ्या गरीब गाईची काय स्थिति होईल? पण त्याबद्दल मीं आतां कितीहि दुःख केलें तरी त्याचा काय उपयोग होणार आहे ? हा मूर्ख, हट्टी, दुष्ट पर्वतराव आपला हेका खरा केल्याविना कधींहि स्वस्थ बसणार नाहीं. त्या बिचारीला त्या माकडाच्या गळ्यांत बांधणारच बांधणार ! परमेश्वराच्या मनांतच जर मी सदा दुःखी रहावें असें असेल तर त्याला कोणाचा इलाज चालणार आहे ! माझ्या सुखाची सर्व आशा खुंटली–(इतक्यांत मंजुळा पुढें येते तिला पाहून) कोण ? प्रिये मंजुळे ! (एकमेकांस भेटतात.)

मंजुळा—(हास्यमुखानें) एवढ्या कसल्या गहन विचारांत स्वारी मग्न झाली होती ? मला सांगण्यासारखं नाहीं का ?

विश्वासराव—गहन विचार ! आतां कसला विचार आणि कसलें काय ? तुजवर प्रेम करण्यांत खरोखर मीं मोठी चूक केली ! असो परमेश्वराच्याच मनांतून जर अशी विटंबना करायची होती, तर त्याला तूंतरी काय करणार आणि तुझे वडीलतरी काय करतील. त्या यशवंतरावानें पूर्वजन्मीं सुकृत केलें होतें म्हणूनच आज–

मंजुळा—(कानांवर हात ठेविते) नका नका, तें अमंगळ शब्द मुखावाटे उच्चारूंहि नका ! मीं एकदा या चरणांस वरिलें आहे, तो माझा निश्चय या कुडींत जीव असेपर्यंत तरी बदलणार नाहीं. आपल्याविना सर्व पुरुष मला बाबांसारखे आहेत. बाबांनीं काय हवा तो जरी बेत केला, तरी मीं माझा निर्धार प्राणांतींहि बदलणार नाहीं. शिवाय यशवंतरावांविषयीं बाबांचा बेत अगदींच व्यर्थ आहे. त्यांचं सारं लक्ष्य त्या हंसाबाईवर आहे एवढंच नव्हे, तर त्यांच्या लग्नाचंहि नक्की झालं आहे. ही गोष्ट मला खुद्द हंसाबाईच्या घरांतूनच कळली आहे. हंसाबाईची भाची हिरी ही माझी शाळेंतील सोबतीण असून परम मैत्रीण आहे व तिनं मला त्यांच्या बेताची सर्व हकीगत सांगितली आहे. (कानाशीं लागते.) बाबांचा हेतु कधींहि तडीस जायचा नाहीं. आपण असे निराश होऊं नका.

विश्वासराव—(आनंदानें) काय ह्मणतेस ? खरेंच का पण हें ? अहाहा ! परमेश्वरा, तूं केवढा दयाळू आहेस ! बरें, तूं आतां जा, मी यशवंतरावाला भेटून पुढील उद्योगास लागतों.

[मंजुळा जाते.

विश्वासराव—(तलावाचे कांठावर येरझाऱ्या करितो.) यशवंतराव ! आतांपर्यंत मी तुझा तिरस्कार करित होतों, तुला शत्रूसारखा समजत होतों, परंतु आतांपासून पुनः तूं माझा दोस्त झालास. त्या मूर्ख पर्वतरावास हुलकावणी दाखवून त्याचेकडून यथास्थित पैसे उपटून शेवटीं त्याला तोंडघशीं पाडण्याचा जो तूं बेत केला आहेस, तो वास्तविक निंद्य जरी असला, तरी आतां त्याबद्दल मी तुला मुळींच दोष देणार नाहीं. तुझ्या या युक्तीनें तूं आपला कार्यभाग साधून अनायासें माझी इच्छा सफळ होण्याचा मार्ग सुलभ केला आहेस, त्या तुझ्या युक्तींत तुला यश येओ, असें मी परमेश्वरापाशीं प्रार्थितों. या मूर्ख, अक्कलशून्य पर्वतरावाला असेंच तोंडघशीं पाडून याची पुरी फजितीच केली पाहिजे ! यशवंतरावाची ही युक्तितर नामी आहे—

पांग्या—(प्रवेश करून) आन् माजी युगूत ऐकाल तर—

विश्वासराव—(आश्चर्यानें) तूं केव्हां आलास ? गाढवा, माझें भाषण ऐकिलेंस वाटतें ?

पांग्या—व्हय व्हय ! पर त्या मंजुलाबाईसाव आपल्या कानामंदीं जी गोष्ट सांगत व्हत्या, ती मातर न्है आपनास्नी बरोबर ऐकाया गवासली.

विश्वासराव—अरे गाढवा ! तरमग तूं लपून आमचें भाषण ऐकत होतास होय ? (त्याला मारावयास जातो.)

पांग्या—मला हकड येऊनशेनी वाढूळ झालाया. पर म्हंगलो, दोगांच हितगुज चाललया, त्येच्यामंदी आपुन जाऊनशेनी इन्न कशापाई करा ! धनीसाव, माजी युगूततर आयका. माजी युगुत ऐकाल तवा म्हंगाल 'पांग्या आता काम फत्ते झाल.'

विश्वासराव—बोलबोल कसलीरे तुझी युक्ति ? ऐकूं दे तर खरी !

पांग्या—युगूत पर युगूत हाय ! (इतक्यांत यशवंतराव येऊन एका झाडा-आड लपून रहातो.) म्हंजे मी असा मनसुवा रचला हाय, की या रावभादुराच त्येन चांगल दात पडाव ! ह्यो ल्योकाचा मोटा मिजासी झालाया. त्येवां त्येची मिजास त्येच्याच मापान मापूनशेनी उतरून टाकायाची. धनीसाव, आपनास्नी ठाव असलच की, आपनापाशी नोकरीला ऱ्हान्यापुरईं मी त्या मोगलाई हैदराबादमंदी त्या धनाजीराव म्होइत्यांकड पांचसा वर्स नोकरीला व्होतो. मला तकडली वागनुक चांगली ठाव असूनशेनी तकडली बोलीबी लइ व्येस येतिया. त्येवां या येड्या रावभादुराच्या डोळ्यांमंदी धूळ टाकाया केवडा वकत लागनार ! त्यो सणवार पेठत पिऱ्या भौरुपी ऱ्हातो न्हव का, त्येची आन् माजी म्वाप दोस्ती हाय.

त्या त्योकाला खुलवूनशेनी घ्येतो माजासा करून आन् त्याचपास्नी पोश्याक्बिश्याक आनूनशेनी येतो तुमाल्ली. आन् मंग तुमी बना मोगलाइतल सरदार फक्कड आन् करूनशान् टाका या येड्या रावभादुरांची गुंग अक्कल !

(इतक्यांत यशवंतराव पुढें येतो. त्याला पाहून विश्वासराव व पांग्या चपापतात.)

यशवंतराव—दोस्त ! आपली युक्तितर मोठी नामी आहे. (ते अधिकच चपापतात.) तुह्मी असे घाबरूं नका. तुमच्या या युक्तीमध्यें मी तुम्हांला मनापासून साह्य करीन. या गाढवाला असेंच फसविलें पाहिजे. विश्वासराव, येत्या रविवारीं तुह्मी हंसाबाईच्या घरीं या; आपण तिथें जमून यासंबंधींचा सर्व बेत नक्की करूं. आपल्याला पैशांसंबंधीं लागेल तेवढें साह्य हंसाबाईकडून मिळेल असें मी तुह्मांला वचन देतों. तुह्मी सरदार बना, रावबहादुरांपाशीं मी अशी सोळा आणे बतावणी करतों कीं, ज्याचें नांव तें !

विश्वासराव—यशवंतराव, या आपल्या उपकारांबद्दल मी आपला आजन्म ऋणी राहीन. आपण मला साह्य करा आणि मीहि आपला कार्यभाग साधण्याचे कामीं मजकडून होणारें सर्व साह्य मोठ्या आनंदानें करीन. मात्र आपली ही युक्ति अगदीं गुप्त राहील असें करा.

यशवंतराव—त्याची नको तुह्मांला काळजी. बरें चला, काळोख होत आला; चला, आतां घरीं जाऊं.

[सर्व जातात.

[पडदा पडतो.]

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

[**स्थल**—रावबहादुरांची खोली. रावबहादुर आरशासमोर बसून मिशांस कलफ लावित आहेत इतक्यांत गडबडीनें दगडी मोलकरीण प्रवेश करिते.]

दगडी—शेट, मस्नी तुमी बलावल व्हय ? त्यो म्येला पांज्या-शेट बलावत्यात म्हुनशेनी सांगत व्हता. हीः हीः हीः ! (हंसूं लागते.)

रावबहादुर—हां ! तोंड संभाळून बोल ! मी कोण आहें, मला कोणती पदवी मिळाली आहे, तुला ठाऊक नाहीं वाटतें ? मला रावबहादुर म्हणून हांक मारिली नाहींस, तर बत्तीशीच रंगवून टाकीन !

दगडी—(हंसत) शेट, आपन म्होट रावसाव, व्हयना ?

रावबहादुर—(रागानें) उद्धट कुठली ! अग ए गध्दे ! मी शेट नाहीं, रावसाहेब नाहीं, रावबहादुर आहें रावबहादुर ! समजलीस ?

दगडी—(हंसून हात जोडते.) अव रावभादुर, काय हुकुम हाये सांगा कीं ब्येगीन ! न्हैतर तकड बाईसाब माज्या नावान आरड आरड आरडत्याल की ! घरांत मायंदळ काम करायच पडल हायना ! हीः हीः हीः ! (हंसते.)

रावबहादुर—अशी दांत काय काढतेस ? गाढव नाहींतर !

दगडी—(अधिकच हंसून) अस काय वो शेटजी करत्याशी ? मी आपली उगाच हासतिया.

रावबहादुर—(रागानें तिला मारायला धावतो.) फिरून तेंच ? शेटजी ? पाजी, वेशरम कुठली !

दगडी—(मागें सरून हात जोडून हंसें दावित) माप करा रावसाब अन्याव (एकीकडे) शेटकडे पगीतल कीं आपल हसूच येतया ! (मोठ्यानें हंसते.) रावसाब, आपुन ह्मोट मजेच दिसता पगा !

रावबहादुर—दगडे ! तुझी जिभली फारच लवलव करूं लागली बरेंका ! मी शेट नाहीं, रावसाहेब नाहीं, रावबहादुर आहें रावबहादुर ! (रागानें पहातो.)

दगडी—(एकीकडे) रावसायबाच डोळ कस गटगटीत घुबडाच्या डोळ्यावानी दिसत्याती. (मोठ्यानें हंसते.) रावसाव, मला व्हावतर हाना-मारा पर आपुल्यापुन हांसल्याबगर व्हावत न्हाय पगा. ह्ये पगा रावसाब, माजा अगदीं नाविलाज हाये. आपला हा पोश्याक आन् आपला हा थाट पघूनशेनी मस्नी लईलई गम्मत वाटतिया काय पुन थाट आन् काय झगझगाट ! काय, हुकुम काय हाये आपला शेटसाब ?

रावबहादुर—अरे? पुन: शेटसाहेब? तुझी अक्कल गेलीतरी कुठें! मी रावबहादुर आहें रावबहादुर, समजलीस? ऐक; हा दिवाणखाना नीट झाडून साफसूफ करून ठेव. माझी कांहीं बडी मित्रमंडळी आज इथें येणार आहे.

दगडी—काय रावसाब—न्हव रावभादुर! आपली मित्तरमंडली येनार व्हय! मंग माज नशीब फुटल ह्मंगायच. समद्या घरभर घानच घान करूनशेनी टाकतील.

झाळसा—(प्रवेश करून) हें काय? हें तुह्मीं आरंभिलं आहेतरी काय? लोकांच्या नादीं लागून असे भलभलते ढंग करायचे! छे, छे, छे! साऱ्या जगांत आपलं हंसू होत आहे, याची कांहींतरी लाज धरा.

रावबहादुर—चूप! मोठी आली आहे मला शहाणपण शिकवायला! ह्मणे-लोक हंसतात. हंसतील तर त्यांचे दांत दिसतील!

झाळसा—इतके दिवस मी गप राह्यलें होतें, पण आतां पहातें तों आपल्या शहाणपणाचा अगदीं कळसच झाला! हा असा वेड्यासारखा पोषाख काय करतां? आ-आ-ईई-करून गायला काय शिकतां? त्या धटिंगणाबरोबर भलतेसलते चाळे काय करितां? अहाहा! जसं काय शिमग्यांतलं सोंगच! आपल्या या ढंगांनीं शेजाऱ्यापाजाऱ्यांनां तोंड दाखवायचीदिखील मला मेली लाज वाटूं लागली आहे—

दगडी—खरच बाईसाब! आन् शेटना लुबाडाया अक्शी कितीतरी मायंदळ लोक येत्याती. कुट जरा झाडून ठिवायाची खोटी कीं झालीच पुना घान!

रावबहादुर—दगडे! खबरदार जास्तकमी बोललीस तर! बेशरम कुठली?

झाळसा—हें काय हें! तिच्यावर काय ह्मणून रागावायचं? तिचं म्हणणं खोटं का आहे! बरं, पण मी असं विचारितें कीं, ह्या इतक्या वयांत आपण गाणं शिकून करणारतरी काय?

दगडी—आन् त्या धटिंगनासंग दांडपट्टा खेलूनशेनी काय मिलनार हाय? त्या मेल्याला पगितल कीं माजतर डोकच फिरूनशेनी जात. आलार आला कीं आपल्या लट्टूलट्टू (वेडावून दाखविते.) जोड्यांनीं समदी वटी उकरूनशेनी टाकतो.

रावबहादुर—अरे अरे अरे! तुह्मांला पाहून मला तुमची कींव येते. तुह्मी अगदीं अज्ञान आहांत अज्ञान! तुह्मांला त्यांतली खुबी काय समजणार आहे?

झाळसा—खरंच, आह्मांला त्यांतलं कांहींच कळत नाहीं! आपली स्वारी गाणं शिकून नाटकांत नाचायला जाणार वाटतं? अन् दांडपट्टा शिकून मारामारी कुणाबरोवर करायचा बेत आहे? आपण किनई आतां हे चाळे अगदीं सोडून द्या. संसारांतील गोष्टींकडे लक्ष्य द्यायचें तें न देतां हें असं भलतंसलतं करित बसतां, हें बरं दिसतं का?

दगडी—आन् बाईसाब ! आजपुन् एक बामनबुवा धनीसायबांनीं कायस लिवाय शिकवाया ठिवलाया.

रावबहादुर—मग त्यांत काय आहे ? माझ्यासारख्या पदवी मिळविलेल्या माणसानें शास्त्रीबुवांपासून धडे न घ्यावे तर कुणाजवळून घ्यावे ?

म्हाळसा—मग असं कशाला? त्या नाना पंतोजीच्या शाळेंत शिकायला जात जा, म्हणजे ह्या वयांत घोडीवर कसं चढतात त्याचा अनुभव घ्यायला सांपडेल—

रावबहादुर—चला निघा ! तुमच्यासारख्या मूर्खांच्या तोंडीं लागावें कुणीं ? तुझ्यासारख्या अडाणी वायकोमुळेंतर मला जिथेंतिथें मान खालीं घालावी लागते. मला मूर्ख समजून तूं स्वताला मोठी हुषार म्हणून डौल मिरवितेस नाहीं का ? तूं हुषार आहेस तर मघांपासून तूं जें काय बोललीस तें काय बोललीस सांग पाहूं ?

म्हाळसा—आपण आपलं वर्तन सुधारून चांगल्या तऱ्हेनं वागावं, एवढंच सांगितलं. आपल्याला मी दुसरं काय सांगणार ?

रावबहादुर—तसें नव्हे ! तूं आतां जें काय बोललीस तें काय, तें सांग पाहूं?

म्हाळसा—(चकित होऊन) म्हणजे? आपण सुधारावं म्हणून बोललें, दुसरं काय?

रावबहादुर—(मध्येंच) छे, छे ! काय गाढव पहा ! अग मी कशांत म्हणालों, तेंतरी सांग ?

म्हाळसा—हें काय बाई भलतंच वेड्यासारखं कांहींतरी बडबडायचं !

रावबहादुर—गाढव रे गाढव ! निव्वळ शंख ! (मोठ्यानें) अग आपण दोघेंजण जें बोललों त्याला काय म्हणतात—

म्हाळसा—त्याला का, त्याला किनई म्हणतात नवराबायकोचं शहाणपण !


रावबहादुर—अरे, अरे, अरे ! काय हें अज्ञान ! अग पण त्याला आणखी काय म्हणतात ?

म्हाळसा—(त्रासून) आणखी काय म्हणतात ? माझं नशीब म्हणतात हो !

रावबहादुर—गाढवरे गाढव ! (मोठ्यानें) अग त्याला गद्य म्हणतात गद्य, समजलीस ?

म्हाळसा—(आश्चर्यानें) काय म्हणतात ?

रावबहादुर—(त्रासून) कोण गाढव पहा ! त्याला गद्य म्हणतात गद्य ! जें पद्य नाहीं तें गद्य व जें गद्य नाहीं तें पद्य ! शास्त्रीबुवांकडून जें काय शिकावें लागतें तें हेंच, समजलीस? (दगडीकडे वळून) ए फत्तर ! नांव म्हणे काय दगडी !



रावबहादुर— तूंतर नांवाप्रमाणें दगडच आहेस. आतां मी ओ ह्मणतों माझ्या तोंडाकडे पहा. ओऽऽऽऽ! [अंक ४ था, प्रवेश १ ला, पृष्ठ ६१.]

CHITROTTEJUCK. P. BOMBAY

तूंतर खरोखरच दगड आहेस. पण ओचा उच्चार करते वेळीं काय करावें लागतें, सांग पाहूं ?

दगडी—(उत्सुकतेनें) काय ह्मगतां ? वचा उव्हचार म्हंजी काय ?

रावबहादुर—अग ए गाढवे, ओ म्हणतांना तूं काय करतेस ?

दगडी—मी व्हय ? हें पघा, बाइसाबांनीं मन्नी हटकल तर मी त्येस्नी ओ ह्मनूनशान साद देत्यें. (हंसूं लागते.)

रावबहादुर—अँः ! तुमच्यासारख्या गांवढळ बायकांना काय समजणार ? तूंतर नांवाप्रमाणें शुद्ध दगडच आहेस. आतां मी ओ ह्मणतों, माझ्या तोंडाकडे पहा. (तोंडाकडे बोट दाखवून) ओऽऽऽऽ! हा उच्चार कसा घशांतून व ओंठांतून येत आहे. यामुळें याचें कंठौष्ठस्थान असें नांव असल्याचें शास्त्रीबुवांनीं सांगितलें आहे. मीं तें एकसारखें घोंकूनघोंकून कसें तोंडपाठ करून टाकिलें आहे !

दगडी—(हंसत) काय ह्मगाला ? कंठोथान ! कंठोथान का अंगुथान त्ये मन्नी काय ठाव ?

रावबहादुर—मूर्ख नाहींतर ! गाढवाला गुळाची चव काय होय ? तुला गांवढळाला त्यांतील खुबी काय ठाऊक! त्याला कंठौष्ठस्थान ह्मणतात कंठौष्ठस्थान ! नीट ध्यानांत ठेव.

म्हाळसा—वहावा वहावा ! फारच हुषारी दाखविलीत ! (हात ओंवाळून) दिवे ओंवाळावे दिवे !

रावबहादुर—(चिडून) मूर्ख, गांवढळ, अडाणी ! चला, व्हा इथून चालत्या ! तुमच्यासारख्या अक्षरशत्रु माणसांबरोबर बोलत बसण्याला मला रिकामपण नाहीं. करा इथून तोंड काळें !

म्हाळसा—एवढं संतापायला नको कांहीं ! हे असले ढंगबरीक सोडून द्या आणि त्या मेल्या थुंकी झेलणारांनां इकडे येण्याची बंदी करा—

दगडी—(मध्येंच) आन् त्यो म्येला मिसाळ परदेसी येतो न्हव का, त्या म्येल्याला अदूगर बंद करा. त्येन लई लईच तरास करून सोडलाया अक्शी.

रावबहादुर—(वेडावून) 'तरास करून सोडलाया अक्शी ?' थांब, तुलाच हाकलून देतों प्रथम. तूं काय समजली आहेस ? (म्हाळसाबाईस लडिवाळपणानें) अहाहा ! तुला काय सांगूं प्रिये—

म्हाळसा—(आश्चर्यानें) त्या पिकलेल्या केंसांकडेतरी पहा ! मनाची नाहींतर नाहीं पण मेली जनाचीतरी—

रावबहादुर—अः ! वेडी रे वेडी ! अग पण मी काय ह्मणतों तेंतर ऐक—

म्हाळसा—(कानांवर हात ठेवून) अं हं ! मी कांहींएक ऐकायची नाहीं. त्या मेल्या बड्या लोकांत शिरून असले भिकार चोचले करायला शिकलां वाटतं ? मला नाहीं खपणार हा असा फाजीलपणा—

रावबहादुर—त्या बड्या लोकांत मीं मिसळूं नये तर काय लंगोटी लावून त्या तुझ्या गांवढळ कुणबटांत शिरूं होय ? मी या बड्या लोकांत मिळूंमिसळूं लागल्यापासून माझे कायकाय फायदे झाले आहेत याची तुझ्यासारख्या खेडवळ बायकोला कुठून कल्पना होणार आहे ?

म्हाळसा—हो, मला त्याची पुरी कल्पना होऊन चुकली आहे बरं ! ते मेले तुह्मांला पैसे जवळ आहेत तोंवर घट्ट चिकटून बसतील अन् रावबहादुर रावबहादुर ह्मणून हरभऱ्याचे झाडावर चढवितील. पण पैसे संपल्यावर कुणी ढुंकूनदिखील बघायचे नाहींत बरं ! तो मेला दिवाळखोर यशवंतराव—मेल्याचं तळपट होओ, त्या मेल्याची आणखी भर करा ! मेला इकडे आलारेआला कीं अशी भुरळ घालून सोडतो कीं, त्याला काय द्यावं आणि काय देऊं नये, असं इकडे होऊन जातं. मेल्याचं कध्धीं–कध्धीं बरं व्हायचं नाहीं—

रावबहादुर—हां हां खबरदार ! माझ्या मित्रांनां शिव्या दिलेल्या मला खपायचें नाहीं, मी तुला साफ सांगतों. तुझ्या तोंडून हें असलें घाणेरडें भाषण निघावें, हें पाहून मला मोठें आश्चर्य वाटतें ! तूं हें कुणाविषयीं बोलते आहेस याची तुला कांहीं कल्पनातरी आहे का ? यशवंतराव आतां आपला जांवई होणार आहे जांवई, नि त्याला तूं असे श्राप देतेस ? मूर्ख कुठली ! आज लोकांत जिकडेतिकडे जो मला मान मिळत आहे, मोठमोठ्या लोकांशीं बरोबरीच्या नात्यानें वागायला मिळत आहे, हें सारें त्या यशवंतरावामुळेंच होत आहे, समजलीस ? तो आपल्या घरीं येतो हे त्याचे आपल्यावर मोठे उपकारच ह्मटले पाहिजेत ! त्याच्या मुळेंचतर मोठमोठ्या सभांत मला मोठमोठ्या लोकांबरोबर खुर्ची मिळते—

म्हाळसा—ह्मणे खुर्ची मिळते ! मग बसा त्याला डोकीवर घेऊन, नको कोण ह्मणतंय ? पण त्याला घरदार लुटून देतांना कांहींतरी सुमार—

रावबहादुर—वेडीरे वेडी ! तुझ्या डोक्यांत तें कुठलें शिरायला ? अग, मी त्याला पैसे देतों ते फुकट का देतों ? तो मजकडून उसनी रकम घेत असतो;

आणि अशा थोर माणसानें मजकडून कर्जाऊ पैसे घेणें ह्यांत मला मोठें भूषण आहे. अग, हा व्यवहार आह्मीं पुरुषांनींच करावा. समजलीस तुह्मां बायकांनां काय कळणार आहे यांत ?

म्हाळसा—खरंच, आह्मांला यांत कांहींएक कळणार नाहीं ! कळतं तर असं कां होतं ? बरं, पण मी असं विचारतें कीं, त्याला जे खोऱ्यावारीं पैसे उपसून देतां, ते कशाच्या तारणावर ? नि त्याच्याकडून पैसे घेतल्याबद्दल कागदतरी लिहून घेतां का ?

रावबहादुर—छे छे छे ! अगदींच वेडी ! अग, बडे लोक परस्परांशीं कधीं कागदपत्रांचा व्यवहार करतात का ? मग बडे लोक आणि साधारण लोक यांत काय तफावत राहिली ? यशवंतरावांचें ह्मणणें आहे कीं, बड्या लोकांचे व्यवहार अगदीं गुपचूप झाले पाहिजेत. या कानाची खबर त्या कानाला लागतां नये. आणि तें अगदीं खरें आहे—

दगडी—पर शेट—

रावबहादुर—पुनः ? निर्लज्ज कुठची ! तूं आत्तांच्या आत्तां इथून चालती हो पाहूं ! आमच्या घरांत असलीं बेमुरवत माणसें नकोत. फिरून या घराचा उंबरठा चढलीस तर तंगडीच मोडून टाकीन !

म्हाळसा—पण तिच्यावर रागावायला एवढं काय झालं ! उगीच एखाद्याला असं टाकून बोलायचं ह्मणजे ? (दगडीस) जाग तूं आंत—

रावबहादुर—कां, फारशी जीभ लांबत चालली ? मी माझ्या घरांत काय लागेल तें करीन. तूं कोण नको म्हणणार ? आणि तूं काय समजली आहेस ! जास्त गडबड करशील तर तुलासुद्धां हाकलून देईन. (दगडीस रागानें) चल निघ आत्तांच्याआत्तां ! खबरदार पुनः इकडे पाय टाकलास तर.

[दगडीच्या अंगावर जातो. ती पळते, तिच्या मागोमाग धावतो.

म्हाळसा—आतांतर शर्थच झाली बाई ! यांनीं वेडेपणा करूं नये, रीतीनं वागावं ह्मणून जों जों प्रयत्न करायला जावं, तों तों यांचं वेड अधिकच वाढतं. मेला जीव तुटतो म्हणून बोलावंसं वाटतं, पण त्यानं हे सुधरायचे बाजूलाच राहून उलट विपरीतच घडून येतं. नशीबींच जर असे अब्रूचे धिंडवडे निघावे असं लिहिलं असेल, तर तें कसं चुकेल !

[जाते.

प्रवेश २ रा.

[स्थल–हंसाबाईचें घर. हंसाबाई दिवाणखान्यांत एका आरामखुर्चीवर पुस्तक वाचित पडली आहे. दिवाणखान्याच्या दरवाजाचें पुढील दार किंचित् उघडें असून पांग्या दाराशीं कानोसा घेत उभा आहे असा प्रवेश.]

पांग्या—(स्वगत) अदुगर यसवंतरावांनीं त्यो दिलेला कागूद ह्ये स्वारीस्नी देऊनशेनी मग जाऊं मंजुलाबायकड. मंजुलाबायचा कागूद धनीसायबांनां आन् धनीसायबांचा कागूद मंजुलाबायनां अशी आताशा कागुदांची गर्दी उडालिया अक्षी ? ह्ये गर्दीमंदी ह्यो पट्ट्या सवताचाबी मनसुबा साधून घ्येनार ! ह्यो पट्ट्याची आन् दगडीची गट्टी होऊनशेनी समदा आनंदीआनंद व्होनार ! मंग–परत्येका पांग्या, त्या तुज्या आनंदामंदी असा उंगीच्याउंगीच वकत गमावित बसलास तर धनीसायबांनीं अर्धा घंट्यामंदी मागारी बोलावला हाय तो कसा जाशील ? त्योका हो फुड, आटप काम झटपट आन् चल बिगीबिगी तुज्या फटाकडीकड. गेल्या दो दिसांत भेटला न्हैस म्हूनशेनी ती दगडी तुजी पूंजा करील पूंजा. त्ये है का ध्येनांत ? चल, आटप बिगीबिगी ! (डाव्या खिशांतून लखोटा काढतो.) इचीभन् ! त्ये दगडीच नादामंदीं मी भुललो की त्ये ! (उजव्या खिशांतून दुसरा लखोटा काढून) ह्यो का ह्यो ? व्हय व्हय, ह्योच यसवंतरावांनीं दिला व्हता. (अमळ विचार करून) पर आमच्य धनीसायबांनीं दिला व्हता त्योच न्हवका ह्यो ? धनीसायबांनीं दिलेला उजव्या खिशांत–अर न्हव न्हव डाव्या–अर इचभन–अगदीच इसरलो की ? आता काय कराव ? (दोन्ही लखोटे पुन:पुन: उलटे सुलटे, खालींवर करून आठवण करतो.) छे, त्या काळतोंड दगडीनच ह्यो समदा घोटाला केला. (लखोट्यांकडे पाहून) अर बोलार ? तुमी कुनाकुनाचे हैसा त्ये ? (दरवाजाशीं येतो. तों आंत हंसाबाईचा शब्द ऐकून) पर, अर विठ्या, आंत काय तमासा चालला है, त्येंतर ऐक अदूगर. काय कराव ? दुसऱ्याच्या गोष्टी ऐकायची ह्री मस्नी लईच वंगाळ खोड लागलीया. माज कान असल दुवाड हैती, की माज कायबी विलाज चालत न्है त्यैच्या पुड. जे न्है ऐकाव त्येबी ऐकत्याती. कंदी कंदी गप्प ऱ्हातम्हून न्हैती. पर मी काय करूं ? माज कान फोडूनशान घेऊन भैरा का व्होवूं ? (दाराशीं कान लावून उभा रहातो.)

हंसाबाई—(कादंबरींतील पुढील भाग वाचते.) पण हा दुष्ट, कृपण थेरडा एकदाचा लौकर मरत नाहीं. छे, तें कांहीं नाहीं ? या वेळीं मनामध्यें दयेमायेला थाराहि देतां कामा नये. कसेंहि करून ह्या थेरड्याचा कांटा एकदा उपटून

काढलाच पाहिजे. हो ठरला बेत. त्या स्वयंपाक्याला वश करून घेऊन त्याला विष घालून मारून टाकूं. मग सर्व संपत्तीचे मालक आपणच होऊं—

पांग्या—(स्वगत) इची भन्! ही आवा असी उलव्या कालजाचीबी है तर? आन् कुनाचा बर खून करन्याचा ह्यो जखनीचा मनसुबा है? आल, समद ध्येनांत आल. त्या यसवंतरावांचा काका तो निंबाजीराव न्हव का, त्येलाच ईस दिऊनशेनी मारन्याचा ह्यो डाकनीचा ब्येत दिसतोया. (दरवाजा लोटून एकदम आंत शिरतो व मोठ्यानें ओरडतो.) निंबाजीरावांना इस देऊन मारन्याचा मनसुबा केला हैसा व्हय? तुमी काय समजला हैसा? ह्यो पगा आताचआत्ता चाललो चावडीवर आन् ध्येतो कोतवालाल्ही समदी वर्दी तुमचे ह्ये बेताची. असल दुवाड काम कराया तुमास्नी कायपुन भे वाटत न्है? ध्येवाधरमाला तुमी—

हंसाबाई—(दचकते, व पुस्तकाकडे पाहून हंसून) मूर्खा, अक्कलशून्या! दुसऱ्याच्या गोष्टी छपून ऐकण्याची तुला वाईट सवय लागली आहे नाहीं? थांब तुझी चांगलीच खोड मोडवितें. मी गोष्टीचं पुस्तक वाचित असतां तूं मला दम भरायला आलास नव्हे? तुलाच अगोदर पोलिसच्या ताब्यांत दिलं पाहिजे–

पांग्या—(ओशाळून पायां पडतो.) बाईसाब, मी ती वाईच गम्मत केली, माप करा.

हंसाबाई—(हंसून) गाढवा, आतां फिरतोस का असा? घे पाहूं कान पिळून आणि काढ पाहूं दहा उठाबशा.

पांग्या—बाईसाब, आजपून मी अस वंगाळ काम कदीबी करनार न्है पगा. ही चोरून ऐकन्याची मला लईच लई वंगाळ खोड लागलीया. (मंजुळेच्या नांवचें पत्र हंसाबाईला देतो व कान पकडून उठाबशा काढतो.)

हंसाबाई—(हंसून) बस, पुरे कर, पिसाट कुठला! अरे हें पत्र माझं नव्हे. हें मंजुळाबाईचं आहे.

पांग्या—इची भन्! या त्ये हकड. ह्ये पगा. (दुसरें पत्र देतो व पुनः उठाबशा काढतो.)

हंसाबाई—(पांग्यास) बस, आतां जास्त चहाटळपणा नको करूंस! जा आपल्या कामाला.

[पांग्या लवून मुजरा करून जातो.

हंसाबाई—(पत्र वाचून) जेव्हां पहावं तेव्हां आपली स्वारी त्या रावबहादुरांच्या पाठीशीं बिलगलेली. काय म्हणे परवां रात्रीं त्यांनां मानपत्र देण्याचं ठरलं आहे. अन् त्या गडबडींत गुंतल्यामुळं इकडे यायला फुरसत झाली नाहीं.

रोज कांहींना कांहीं आपली सबब आहेच ! आणि पुढं काय लिहितात (पत्र पुनः वाचते.) 'मला काल व आज आपल्या दर्शनाला यायला सवड झाली नाहीं व आणखीहि दोन दिवस येतां येणार नाहीं, याबद्दल मला फारफार वाईट वाटतें व आपल्यालाहि याचा फार राग आला असेल; परंतु त्याचा सारा वचपा भरून काढलेला पाहून आपला रोष दूर होईल अशी दृढ आशा आहे. येत्या शनिवारीं आनंदसागर थिएटरांत नांवाजलेलें 'सुंदरीविलास' नाटक व्हावयाचें असून त्या नाटकाचीं बाक्सचीं सहा तिकीटें मी आत्तांच रिझर्व करून ठेविलीं आहेत. शनिवारीं आपण येण्याची कृपा करालच. मी सात साडेसातांच्या सुमारें तिकडे येईन. रावबहादुर पर्वतरावांच्या घरची मंडळीहि नाटकाला जावयाची आहे. तेव्हां आपण सर्व मंडळी मिळून बरोबरच जाऊं.' वाः ! काय पण माझा राग शांत करण्याची युक्ति काढली आहे ही ! आमच्या हिरेची ती मैत्रीण मंजुळा–तिची ओळख करून घ्यावी अशी माझी फार दिवसांपासून इच्छा आहे. तिला एकदा मीं इकडे बलावलेंहि होतें परंतु ती कांहीं आली नाहीं. तेव्हां या नाटकाच्या निमित्तानं अनायासंच तो योग जुळून येईल ह्मणा. आतांशा माझं मन संतुष्ट करण्यासाठीं काय पण बाई श्रम घ्यायचे हे ! असुक एक वस्तु मला आवडते असं समजलं पुरे, कीं ती आलीच संध्याकाळीं माझ्याकडे. असा उगीच पैसा खर्च करूं नये, हात राखून वागावं, ह्मणून मी किती सांगून पहातें, पण छे ! 'सुंदरीविलास' नाटक एकवार पाहिलं पाहिजे असें मी आपली त्या दिवशीं सहज बोललें होतें, तों स्वारी तिकिटंसुद्धां घेऊन पार ! केवढं हें प्रेम ! परवां मला प्रेमाची खूण ह्मणून ही आंगठी दिली (हातांतील हिऱ्याच्या आंगठीकडे पहाते.) ही चांगली दीडदोन हजारांचीतरी असेल. एवढ्या मोठ्या किंमतीची कशाला करविली म्हणून मीं म्हटलें तों ह्मणतात 'तुझ्यापुढं मला दोन हजार काय पण दोन लाखांचीहि पर्वा नाहीं !' छे बाई ! असा हा उधळ्या स्वभाव फार वाईट. (घड्याळाकडे पाहून)अं! काय पांच वाजले ? अन् अजून त्या गजरा नि तारा कां बरं आल्या नाहींत ? खरं म्हटलं तर त्या केव्हांच यायच्या. पण त्या येऊन माझ्या हातांत पत्र पाहून खोलींत लपूनबिपूनतर बसल्या नसतीलना ? आहेतच तशा त्या थट्टेखोर ! पहावं खोलींत जाऊन·

[जाते·

प्रवेश ३ रा.

[**स्थल**—रावबहादुरांची लायब्ररी. रावबहादुर टेबलापाशीं हातांत कागद घेऊन बसले आहेत व मानपत्राचें उत्तर तोंडपाठ करण्यासाठीं तें पुनःपुनः वाचित आहेत असा प्रवेश.]

रावबहादुर—(वाचतो.) प्रिय बंधु आणि भगिनी हो ! आपण बडेबडे शेटसावकार, नामांकित वकीलॅबरीस्टर, प्रख्यात डाक्टर, लोकप्रिय सरकारी अधिकारी, सुप्रसिद्ध वर्तमानपत्रकार, वगैरेवगैरे मोठमोठी मंडळी जमून व पुष्कळ पैसे खर्च करून आह्मांला मेजवानी दिलीत व आमचा मोठा गौरव केला, याबद्दल आम्हांला जें कांहीं पराकाष्ठेचें समाधान होत आहे तें व्यक्त करण्यास आमच्या देशभाषेंत शब्दहि सांपडावयाचे नाहींत. यावरूनच आह्मांला किती आनंद झाला आहे याची आपण कल्पना करा. (स्वगत) या समारंभासाठीं एक हजार रुपयांची रकमतर मींच माझ्या पदरची दिली आहे. (पुढें वाचतो.) आणि आजच्या या आनंददायक प्रसंगाच्या स्मरणार्थ श्रीजाखमाताप्रासादिक निराश्रित नाटक मंडळींतल्या सुस्वरूप मुलांनीं सुस्वरांत ज्या मनोहर कविता गाऊन दाखविल्या त्या ऐकूनतर आह्मी अगदीं तल्लीन होऊन गेलों. (स्वगत) या कविता रचून घेण्यासाठीं त्या केशवरावांची मला कोण मनधरणी करावी लागली ? तो लेकाचा कवितांबद्दल शंभर रुपये घेईन ह्मणून हट्ट धरून बसला होता. काय करतां, अशा समारंभाला कवितातर पाहिजेतच. आणि तो लेकाचातर हालेचना. तेव्हां टाकले त्याच्या तोंडावर शंभर रुपये. (पुढें वाचतो.) ज्या मोहरेदार कागदावर मनोहर अक्षरांत सोनेरी शाईनें छापलेल्या सुंदर मजकुरांत आमचे गुण वर्णन करून आपण बड्याबड्या लोकांनीं आह्मांला मोठ्या सन्मानानें मानपत्र दिलें, त्याचा आह्मी आनंदपूर्वक स्वीकार करतों. आणि आतां लवकरच आम्हांला याहूनहि जास्त मोठ्या मानाची पदवी मिळेल तेव्हां आपण आजच्याहूनहि अधिक उत्साहानें आणि पुष्कळसे पैसे खर्चून आम्हांला मानपत्र आणि मेजवानी देऊन आमचा आजच्यापेक्षांहि जास्त गौरव कराल अशी दृढ आशा बाळगून आमच्या प्रिय बंधु व भगिनी हो ! आह्मी आपली रजा घेतों. (स्वगत) किती छानदार आहे हें उत्तर. आज आठ दिवस मी हें सारखें तोंडपाठ करित आहें. हेंदेखील लिहून मिळवितांना कोण पंचाईत पडली व कितीजणांची पायधरणी करावी लागली, तें माझें मलाच ठाऊक ! उद्यां रात्रीं बारा वाजतां त्या स्वदेशोद्धारक मंडळी—काय बरें त्या मंडळीस ‘ दुंदुभी ’ वर्तमानपत्रांत नांव दिलें आहे—हो हो (आठवण करून)

वरी आठवण झाली. यशवंतरावांच्या सांगणीवरून मीं आपल्या डायरींत तें नांव नोंदून ठेविलें आहे. (खिशांतून डायरी काढून वाचतो.) अबबब ! काय हें नांव ! 'अहो रूप–महोध्वनि–परस्परसहायक मंडळी' याचा अर्थतरी काय असावा ? तो कांहींतरी गहन असला पाहिजे. बरें आतां त्याचा विचार राहूंद्या. उद्यां शास्त्रीबुवा येतीलच त्यांनां विचारला म्हणजे कळेल—त्या मंडळीमार्फत श्रीमंत रावबहादुर भाऊसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं भरणाऱ्या सभेंत आह्मांला मानपत्र द्यावयाचें ठरलें आहे. ही सभा फक्त वरील मंडळीच्या नांवाखालींच व्हावयाची आहे, सारी व्यवस्था, खर्च वगैरे माझ्या वतीनें आमचे परम दोस्त यशवंतरावच करित आहेत. परंतु असें केल्याविना आह्मांला लोक मोठे असें कसें समजतील. मोठ्या लोकांनां असेंच वागावें—

(इतक्यांत यशवंतराव येतो.)

यशवंतराव—(प्रवेश करून) रावबहादुर, उद्यां मानपत्र घ्यायला जाण्याचा हा पोषाख केला आहे वाटतें ? खरोखर आपण ह्या पोषाखांत फारच छान दिसतां बुवा ! आणि या वेळीं आपली अशी कांहीं प्रसन्न मुद्रा दिसते आहे कीं, आपण जर हंसाबाईच्या दृष्टीस पडाल तर तिच्याचसे काय—तिच्याहिपेक्षां जास्त रूपवती तरुणींच्या हृदयांत तीरासारखे शिरून जाल !

रावबहादुर—(आनंदानें फुगतो व मिशीवर ताव देऊन) अं ! तरी मीं तो इस्प्रिंकचा चष्मा अजून चढिवला नाहीं. (चष्मा लावतो, तो खालीं पडतो. पुनः लावतो, पुनः खालीं पडतो.) अरे हा बसत कां नाहीं ? उलटा लाविला कीं काय ? (उलटा लावितो.) अरे अजून बसत नाहीं ! (यशवंतराव तो लावण्यास मदत करतो.) हें पहा, काल मी त्या दीनानाथ बारीस्टरबरोबर कापांत गेलों होतों. त्यांनीं एक चष्मा विकत घेतला व मला ह्मणाले कीं, आजकाल चारचौघांत मोठें म्हणवून घेणें असेल त्यानें चष्मा हा लाविलाच पाहिजे. मलाहि त्यांचें हें ह्मणणें खरें वाटलें व इतक्यांत चष्मेवाल्या कंपनीच्या गोऱ्या म्यानेजरानें एक सुंदर सोन्याचे फ्रेमीचा चष्मा बांधून माझ्या हातांत दिला. बील अजून नाहीं हो पाठविलें. पाठवील सावकाशीनें. चष्मेवाल्या कंपनीच्या त्या गोऱ्या साहेबानें मला जर एवढा मान दिला तर त्यांचा शब्द मोडायचा का आहे ? घेऊन आलों तो. पडेल अशा प्रसंगीं उपयोगीं.

यशवंतराव—बॅरीस्टरसाहेबांनीं खरोखरच आपल्याला चांगली सल्ला दिली. कारण, मनुष्याची दृष्टि शाबूत असतांना आजकाल चष्मे वापरण्याची

फॅशन आहे; आणि चष्मे वापरल्यानें लवकरच दृष्टि बिघडावयाची, व ती बिघडली म्हणजे चष्मा हा नेहमीं वापरावयास पाहिजेच! (स्वगत) या वेड्या पिराला फॅशनचें नांव सांगून हवें त्यानें खुशाल लुबाडावें. या फॅशनचें याच्या डोक्यांत एवढें वेड भरलें आहे कीं, बस सारा दिवस फॅशन फॅशन फॅशन! फॅशनशिवाय दुसरेंतिसरें कांहींएक याला दिसतच नाहीं. बाकी ही गोष्ट आपल्या पथ्यावरच आहे ह्मणा. असल्या खुळसटांच्या डोक्यांत अशीं कांहींतरी वेडें भरल्याशिवाय आमच्यासारख्यांचा जगांत निभाव लागणें कठीण आहे. आजतर मला दोनशें रुपयांची फारच निकट आहे. कसेंहि करून त्या नौल्या मारवाड्याच्या दांतांवर दोनशें रुपये टिचलेच पाहिजेत. आणि या स्वारीपासून तेवढी रकम उपटायलाच तर मी आज इकडे आलों आहें. प्रसंगहि मोठा छान आला आहे. हं द्यावा बार भरून. (उघड) रावबहादुर, तें असो. पण आजपर्यंत आपली रकमतरी किती झाली?

रावबहादुर—कांहो? त्याची आज एवढी काय घाई झाली?

यशवंतराव—तसें नव्हे. पण ह्मटलें, मनुष्यानें व्यवहारांत चोख असलेलें बरें. हो, आज आपलें व माझें मित्रत्व आहे. पण समजा, उद्यां आपणा उभयतांचें पटलें नाहीं, तर मागाहून उगीच नसत्या भानगडी करित रहायचें कीं नाहीं? ह्मणून ह्मणतों, व्यवहारांत मनुष्यानें कसें चक्क असावें. माझ्या हातचा आपल्यापाशीं थोडासा लेख असणें चांगलें.

रावबहादुर—हें काय भलतेंच बोलतां हो तुम्ही यशवंतराव! तुमचें आणि माझें वांकडें येईल! स्वप्नांतसुद्धां आणायला नकोत त्या गोष्टी. छट्, मी तुमच्या पासून कधींहि लेख घेणार नाहीं. माझा तुमच्यावर विश्वास नाहीं कीं काय?

यशवंतराव—पण तुह्मीं कुठेंतरी कागदपत्रावर लिहून ठेवलेलें बरें. मला हा तोंडातोंडीचा व्यवहार नाहीं पसंत.

रावबहादुर—(डौलानें) मग तुम्ही मला कच्चेच समजतां तर? मी नाहीं हो तसा लेचापेचा व्यवहार करणारा मनुष्य! हें पहा (रोजनिशी दाखवितो.) मीं माझ्या रोजनिशींत सारें लिहून ठेविलें आहे.

यशवंतराव—(वाचून स्वगत) लेका, तुझ्या या दीडदमडीच्या रोजनिशीला कोण कुत्रा विचारणार आहे? तूं खुशाल लागेल तेवढें लिही, मी त्याची मुळींच पर्वा करित नाहीं. (उघड) पण रावबहादुर, आपण मजकरितां त्या सर ड्र नाथिंग साहेबांच्या स्मारकफंडास दिलेले तीनशें रुपये यांत लिहिलेले कुठें दिसत नाहींत ते! तेवढे अगोदर लिहा पाहूं.

रावबहादुर—अं ? खरेंच कीं विसरलों ! (लिहितो.) अहो, मी विसरलों म्हणून काय झालें, तुम्हींतर नाहींना विसरलेत. खऱ्या सचोटीच्या माणसांचें असेंच असतें.

यशवंतराव—आपल्याला कुणाची अधर्मानें पैहि नको ! तशी दानत ठेविली असती तर तुम्हीं मला एवढी रकम धीरलीतरी असतीत ? काय म्हणतों मी, खरें सांगा, तोंडापुरतें बोलणारा मनुष्य नव्हें मी.

रावबहादुर—तुमच्यासारखा सचोटीचा मनुष्य माझ्या पहाण्यांत नाहीं, हें मी शपथपूर्वक तुम्हांला सांगतों.

यशवंतराव—बरें, काय ह्मणत होतों मीं (आठवण केल्यासारखें दाखवून) एकूण आजपर्यंत मीं आपल्याकडून पंचाण्णवदशें रुपये घेतले नव्हे ? बघाबघा, नीट बेरीज करून बघा बरें. माझी आठवण आपली अशीतशीच आहे ! (हंसतो.)

रावबहादुर—(बेरीज करून) छे हो ! फक्त व्याण्णवदशें आणि पन्नास रुपयेच झाले. पंचाण्णवशें कांहीं नाहींत—

यशवंतराव—आरेच्या ! पाहिलेंत ? ही माझी विसर जिथेंतिथें माझी अशी फजिती करते ! अरेरे ! माझें नोटबूक कुठें गेलें ? (खिसा चाचपतो.) छे ! तें नाहीं उपयोगी. तेव्हां असें करा,काय ह्मणतों मी, कीं हे व्याण्णवशें पन्नास म्हणजे किती सवानऊ हजार झाले नव्हे,–तेव्हां असेंच कराना–पाउण हजार रुपये द्या ह्मणजे बरोबर दहा हजारांची रकम झाली. होय, मग हिशेबांत भानगड नको. तुह्मांलाहि चांगलें व मला ध्यानांत ठेवायलाहि चांगलें. (कानांत सांगतो.) त्या फंडाला मला आजच पांचशें रुपये भरले पाहिजेत; आणि आपणहि त्याला हजारपांचशें रुपये भरल्यास इकडेच नव्हे तर विलायतेंतदेखील आपलें नांव होईल. हं, कागद लेखणी द्या पाहूं इकडे. एक आण्याचें पावतीचें तिकीट असेलच आपल्यापाशीं. दहा हजारांची प्रामिसरी नोट लिहून देतों झालें. नि आज जरा जेवूनबिवून लौकरच तयार असा हां. कारण उद्यां समारंभाला हजर रहाण्यासाठीं कित्येक मंडळीच्या घरीं गाडी घेऊन आमंत्रण करण्यासाठीं स्वतां गेलें पाहिजे. मी सातांच्या आंत आलोंच ह्मणून समजा.—हो, ऐकलेंत काय रावबहादुर ! आपल्या गांवांत दहीपूर संस्थानच्या महाराजांचे चिरंजीव ते ठकारासिंगजी कुमारसाहेब आले आहेत. त्यांच्या दिवाणजींची नि माझी छान ओळख आहे. सवडीनुसार रावबहादुर, आपणांस महाराजांच्या भेटीस गेलेंच पाहिजे !

रावबहादुर—फार उत्तम आहे. जरूर जरूर! मला तुम्ही केव्हां महाराजांच्या बंगल्यावर न्याल बरें? लवकरच बेत करा. (पेटी उघडून दोन हजारांच्या नोटी काढतो.) हे घ्या पैसे. सुटे नाहींत. ह्या हजार हजारांच्या दोन नोटी आहेत. यांतले पाऊण हजार तुम्ही घ्या, एक हजार माझ्या नांवें त्या फंडाला पाठवा—पण मला किताब मिळेल असें तुम्हांला खात्रीपूर्वक वाटतें ना?—बाकीचे अडीचशें उद्यां मला आणून द्या. उद्यांच नाहीं दिलेत तरी चालेल. घाई नाहीं कांहीं. आणि प्रामिसरी नोटबीट लिहिण्याचें कांहींएक कारण नाहीं, समजलें. तुमच्यावर माझा विश्वास नाहीं कीं काय? (हळूच) पण आपल्या त्या कामाचें काय झालें?

यशवंतराव—(नोटा खिशांत घालतो.) अंः! तें ना! (रावबहादुरांचा हात घेऊन टाळी वाजवून) काम फत्ते! मी जिथें जाईन तिथें काम फत्ते केल्याविना परत येईन असें का तुम्हांला वाटतें? पण पर्वतराव, काय सांगूं, फारच प्रयास पडले बुवा! शेवटीं एकदाची स्वारीनें मान्यता दिली. आपली मुद्रिका अन् पत्रिका मीं मोठ्या खुबीनें आणि युक्तीनें त्यांनां दिली. त्यांनीं आंगठी मोठ्या प्रेमानें उचलून घेऊन आपली पुष्कळशी स्तुति करून लगेच हातांत घातली व पत्रिकाहि प्रेमानें वाचून मजकडे पहात हंसूं लागल्या. यावरून आपलें काम बहुतेक फत्ते झालेंच असें समजा.

रावबहादुर—(आनंदानें) काय ह्मणतां? माझी प्रेमपत्रिका वाचिली आणि आंगठीहि बोटांत घातली? अहाहा! आतां माझ्यासारखा दैववान् प्राणी जगांत कोण असेल? ती मनहरणी आतां आम्हांला खास माळ घालणार. (गर्वानें) उघडच आहे, अहो, आमच्यासारख्या रावबहादुरांचें कुटुंब होण्यांत (मिशांवर ताव देतो.) तिला भूषणच वाटलें पाहिजे. मीं हंसाबाईशीं पुनर्विवाह केल्यावर मग माझ्या ह्या गांवढळ बायकोजवळ भाषणसुद्धां करणार नाहीं. त्या सटवीला नेहमीं गांवढ्यावरच ठेवीन. पण तिची माझी भेट करविण्यासंबंधीं काय केलेंत?

यशवंतराव—मीं पुष्कळ खटपट केली परंतु आढेवेढे घेऊं लागल्या. अहो, उघडच आहे, एकदम भेट घेण्यास त्या कशा बरें कबूल होतील. परंतु मी कसला वस्ताद! त्यांनां येत्या शनिवारीं रात्रीं आठ वाजतां इकडे घेऊन येण्याचें नक्की करून आलों आहें. आपण मात्र सर्व गोष्टी कशा युक्तिप्रयुक्तीनें केल्या पाहिजेत. उगीच घाई करायची नाहीं बरें. त्यांचें मन आपल्यावरच जडलें आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे; परंतु त्या तें एकदम बोलून दाखविणार नाहींत. तेव्हां

सर्व कार्यभाग कसा युक्तिप्रयुक्तीनेंच केला पाहिजे. (हळूच) पण आपल्या कुटुंबाचें कसें काय? त्यांनांतर हें करणें आवडणार नाहीं. त्या वेळीं त्या इकडे नसतील तर ठीक होईल. नि मंजुळाबाईहि नसाव्या.

रावबहादुर—अहो, हा रावबहादूर बचा नहीं है कचा! मी त्याची व्यवस्था पूर्वींच करून चुकलों आहें. आमचा तो चुलत भाऊ त्या गुरुवारपेठेंत रहातो तो हो, त्याला करायचा आहे सत्यनारायण. त्याला तो बेत शनिवारींच करायला सांगतों. माझी आज्ञा तो शिरसावंद्य करील. लेकाला परवांच दहा रुपये उसने दिले आहेत! त्याच्याइकडे सत्यनारायणाचा शनिवारीं बेत करून या सटवीला मंजुळेसह देतों लावून तिकडे! तिला तेथें जाणें भागच आहे. नि रात्रीं तिकडेच रहाण्याची व्यवस्था करतों. हो, पूजा, जेवणखाण वगैरे आटपेपर्यंत रात्रीचे एकदोन हे वाजायचेच; मग एवढ्या लांब ती कसची येते!

यशवंतराव—ही युक्तितर मोठी सुरेख काढलीत बोवा. मात्र शनिवारची गोष्ट विसरूं नका हो! बेतबात असा नामी ठेवाल कीं कोणी म्हणेल शाबास! बरें येतों आतां मी.

[जातो.

रावबहादुर—(मिशांवर ताव देतो.) शेवटीं सर्व गोष्टी एकदाच्या जुळून आल्या. खरोखर, यशवंतरावाचे माझ्यावर हे केवढेतरी उपकार आहेत! या स्वारीमुळेंचतर माझें हें काम झालें. नाहींतर आशाच नव्हती. बस, आतां मी रात्रंदिवस हंसा हंसा या नांवाचाच जप करित बसेन. प्रिये हंसे—

(इतक्यांत दगडी येते.)

दगडी—(मघांपासून दाराआड राहून सर्व भाषण ऐकत होती ती आतां प्रवेश करून) जी, मी आज मुल्काला चाललें. शेट—

रावबहादुर—(दचकून स्वगत) ह्या सटवीनें आमचें खलबत ऐकलेंतर नसेल ना? (उघड) कायग ए डाकिणी! चोरून दुसऱ्याच्या गोष्टी ऐकतेस होय?

दगडी—अं! मन्नी न्हैबा असली वंगाळ खोड. मी मुल्काला जाते तवा पगार मांगाया आल्यें.

रावबहादुर—(स्वगत) एकून हिनें ऐकलें नाहीं तर. (उघड.) पुनः शेट म्हणालीस नाहीं का? हा घे पगार—

[दगडीच्या कानशिलांत मारतो. ती ओरडत आंत जाते. रावबहादुर तिच्या मागें धावतो.

प्रवेश ४ था.

[**स्थल**-रावबहादुरांचा दिवाणखाना. कोच, गालिचा इत्यादिकांनीं दिवाणखाना शृंगारला आहे. एके बाजूस तंबूरा, बाजाची पेटी इत्यादि वाद्यें पडलीं आहेत. शाल पांघरलेल्या म्हाळसाबाई व मंजुळा इकडेतिकडे चोरट्यासारखें पहातपहात प्रवेश करितात.]

म्हाळसाबाई—(गडबडीनें) आपल्याला यायला उशीरतर नाहींना झाला मंजुळे? मोठ्या थाटमाटानं पानसुपारीला गेलेली स्वारी अद्यापि परत नाहीं आली वाटतं?

मंजुळा—नाहीं. (घड्याळाकडे पाहून) हंसाबाई आणि यशवंतराव यांनां इथं यायला अजून अर्ध्या तासाचा अवकाश आहे. पण बाबा इतक्यांत यावेत ह्मटलं तर!

म्हाळसाबाई—(हंसून) माझी दगडी खरोखरच इमानी आहे. बरं झालं कीं, त्यांचं हें सगळं खलबत तिनं आइून ऐकलं. काय ह्मणे ती सटवी हंसी त्या येशाबरोबर इथं येणार, अन् मग इथं कुणी चिटपाखरूंहि नसायचं तेव्हां तिजबरोबर हवेतसे रंगढंग करायला यांनां सहज फावणार! काय पण मेल्यांची मसलत? पूजेच्या निमित्तानं आमची दोघींची उचलबांगडी अगोदर करून मग स्वारी बाहेर पडली! बरं आहे म्हणावं, या तुमच्या ऐन रंगांत भंग करीन तरच नांवाची म्हाळसा होईन! तरी म्हटलं, त्या मेल्यायेशाबरोबर रोजरोज एवढीं कसलीं खलबतं चाललीं असतात! पहात्यें आतां कसं दुसरं लगीन करतात तें! झिंजोट्या धरून अगोदर त्या सटवीला घराच्या बाहेर काढतें. मंजुळे, तूं इथंच बसून रहा. आपण परत आलों हें कुणालाहि अजून समजलं नाहीं. मी या बाजूच्या खोलींत बसून रहातें. मंडळीची चाहूल ऐकतांच मला आंत येऊन कळीव, समजलीस?

[जाते.

मंजुळा—(स्वगत) हंसाबाईसंबंधीं बाबांचे विचार व्यर्थ आहेत. तिचं चित्त यशवंतरावांवरच जडलं आहे ह्मणून मीं आईला किती जरी सांगितलं तरी तिला कांहीं तें खरं ह्मणून वाटणार नाहीं. मत्सरानं तिला अंध करून टाकलं आहे, तेव्हां अशा स्थितींत तिची खात्री करून देणं अगदीं अशक्य आहे. (हंसून) आणखी एका घटकेनं इथं मोठ्या मौजेची चकमक उडणार आहे!

आणि आमच्या आईला अशीच संशयांत ठेवल्यानं तर या मौजेस जास्तच रंग येईल. मग खरा प्रकार उघडकीस आणण्याचा उद्योग एव्हांच कां करा? (इकडेतिकडे पाहिलेंसें करून पदराखालून पत्र बाहेर काढते.) अहाहा! माझ्या प्रियकराचं हें पत्र! शंभर वेळां वाचलं तरी कांहीं माझी तृप्ति ह्मणून होत नाहीं! माझ्या प्राप्तीसाठीं जें कांहीं करण्याचं योजिलं आहे, तें वाचून कुणाला बाई हंसू येणार नाहीं? यांतलं एक अक्षरसुद्धां आईच्या कानांवर जाऊं नये म्हणून मला पुनःपुन्हा निक्षून लिहिलं आहे; पण तें व्हावं कसं? (विचार केल्यासारखें करून) अरेरे! पदवीमुळं बेभान झालेल्या आमच्या भोळसट बाबांनां या कपटप्रयोगानं फसविणं हें पाप नव्हे का? पण माझ्या प्रियकरासाठीं तेंदिखील करण्यास मी आज प्रवृत्त झालें आहें. देवा! या पदवीच्या–या पोकळ मोठेपणाच्या नादीं आमच्या बाबांनां कां बरं लावलं आहेस? त्यांची चारचौघांत चाललेली ही अपेष्टा पाहून मला अतोनात दुःख होत आहे. यशवंतरावांचें लक्ष्य हंसाबाईवर आहे ह्मणून ठीक, नाहींपेक्षां माझे काय हाल झाले असते ते त्या देवालाच माहीत! प्रियकरा! यशवंतराव आणि हंसाबाई यांच्या साह्यानं बाबांनां फसवून तुह्मी आपला कार्यभाग उरकून घेणार एकूण? पण हा स्वयंवराचा नवीनच प्रकार नव्हे का? (हंसते.) असो, नाइलाजास्तव मलाहि या कपटप्रयोगांत सामील व्हावं लागलं आहे. पदवीमुळं बाबांच्या डोळ्यांवर जी झांपड आली आहे ती अशा कोणत्यातरी उपायानं उडविलीच पाहिजे; नाहींपेक्षां त्यांचा वेडेपणा यापुढं कोणच्या थरास जाईल सांगवत नाहीं. (विचार केल्यासारखें करून) तेव्हां एकंदरींत आईला ही सगळी मसलत न कळविण्यांतच जास्त मौज आहे. पुढील सर्व खेळास यामुळं अधिक रंग येणार आहे. (हातांतील पत्राकडे पाहून) पत्राचा शेवटतरी बाई किती गोड केला आहे! (पत्राचें चुंबन घेते व बाहेर कोणाची चाहूल ऐकल्यासारखा भास होऊन दचकते.) मंडळीची गाडी आली वाटतं! (बारींत डोकावून) हो, यशवंतराव आणि हंसाबाई तर येऊन थडकल्याच. पण बाबा कसे आले नाहींत अजून? चला, आंत जाऊन आईलातर सांगूं या.

[जाते.

(दुसऱ्या बाजूनें यशवंतराव आणि
हंसाबाई बोलतबोलत प्रवेश करितात.)

हंसाबाई—(कोचावर बसून) मी आपल्या नादीं लागून भलत्याच ठिकाणीं तर नाहींना आल्यें? तुमच्या स्नेह्याकडील अद्यापि कुणीच कसं बाहेर दिसत नाहीं?

यशवंतराव—छे, छे ! मी कधींतरी तुला भलत्याच्या घरीं आणीन का ? माझे परम मित्र रावबहादुर पर्वतराव यांनीं पराकाष्ठेचा आग्रह धरला, तेव्हां ह्मटलें जातांजातां उतरूं त्यांच्या इथें. पर्वतराव ह्मणजे मोठा लाख माणूस आहे, मित्रांचा अगदीं भुकेला—

हंसाबाई—आज आपल्याबरोबर यायला मला कितीतरी बाई संकोच वाटला ! मावशीजवळ कांहीं निराळीच बतावणी करावी लागली ! पण गडे, आज आपण असे उदासीन कां दिसतां ? प्रकृति तर ठीक आहे ना ?

यशवंतराव—उदासीन कसला ? माझी प्रकृतितर बुवा अगदीं ठीक आहे. मात्र मृत्युपंथाला लागलेल्या त्या आमच्या काकासाहेबांनां आज भेटायला गेलों होतों, पण माझी भेट घेण्याचें त्या हट्टी म्हाताऱ्यानें साफ नाकारलें त्यामुळें थोडेंसें वाईट वाटलें इतकेंच. तें राहूंदे, पण प्रिये ! तुला इथें मुद्दाम कां आणलें तेंतर अगोदर ऐकून घे. आपला कार्यभाग सिद्धीस जाण्याच्या कामीं या आमच्या रावबहादुरांची फार मदत आहे. तेव्हां आज अनायासें तुझा त्यांच्याशीं परिचय होणार आहे हें फार उत्तम आहे. पर्वतराव म्हणजे फार सज्जन मनुष्य. पण रावबहादुर झाल्या दिवसापासून त्याचें डोकें किंचित् ठिकाणावर नाहींसें झालें आहे इतकेंच. स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह इत्यादि सुधारणांत आपण पुढारी असावें अशी त्याला मोठी हांव आहे. आणि प्रिये ! एवढ्यासाठींच तुझी ओळख करून घेण्याला स्वारी इतकी उत्सुक झाली आहे ! हे पहा रावबहादुर आलेच—

(इतक्यांत गळ्यांत फुलांचे मोठमोठे हार घातलेले रावबहादुर व त्यांच्या मागून भपकेदार पोषाख केलेले व हातांत मोठाले तुरे घेतलेले पांडू व कहान प्रवेश करितात. हंसाबाईस तिघेहि लवून आठदहा वेळां मुजरा करितात.)

हंसाबाई—(आश्चर्यानें यशवंतरावास एकीकडे) हें काय बाई भलतंच ?

रावबहादुर—(आदरानें मान खालीं वांकवून) मंडळी, तुह्मी मला क्षमा कराल अशी आशा आहे. काय करावें ? त्या 'ढढ्ढाचार्य समूहा'नें मला आज पानसुपारी दिली तेथें थोडासा उशीर झाला. इतका उशीर होईल हें मला पूर्वीं समजतें तर मी तेथें आज साफ गेलों नसतों. (स्वगत) यांच्या आदरातिथ्यास्तव शास्त्रीबुवांजवळून मुद्दाम लिहवून घेतलेलें वाक्य बंदुकीच्या बाराप्रमाणें आतां देतों येथें सोडून. (मोठ्यानें-हंसाबाईस उद्देशून) श्रीमती हंसाबाई, आपल्या सारख्या अरण्यपंडितेनें आमच्या इथें येऊन आमचा हा बंगला आपल्या

चरणकमलाच्या धूलीनें आज पवित्र करून टाकला आहे ! आज मी आपल्याला धन्य समजतों. बाईसाहेब ! आपल्या उपकारसागरांत मला आज आपण अगदीं बुडवून टाकिलें आहे. मी आपला गुलाम आहें—दासानुदास आहें—

हंसाबाई—(लाजल्यासारखें करून) यांत मीं विशेष तें काय केलं ? आह्मीच उलट रावबहादुरांचीं आभारी आहों. रावबहादुरांनीं आज आह्मांला मोठाच मान दिला.

(हातांतील तुरे बाजूच्या टेबलावर ठेवून कहान व पांडू मुजरे करून जातात.)

रावबहादुर—असें कसें ह्मणतां हंसाबाई ? आपण म्हणजे सौंदर्याची खाण. आपलें मुखकमल—

(हंसाबाई ओशाळून यशवंतरावाकडे पहाते.)

यशवंतराव—(रावबहादुरांचें लक्ष्य उडविण्याच्या हेतूनें पेटीकडे बोट दाखवून) ओहो ! रावबहादुर ! आपणतर संगीताचेहि शोकी दिसतां !

रावबहादुर—(एकीकडे यशवंतरावास) या माझ्या प्रियकरणीचें मनरंजन करावें ह्मणून मीं आज गवयीबुवांस या वेळीं मुद्दाम बोलाविलें होतें. (घड्याळ पाहून) त्या बेट्याचा अद्यापि पत्ता नाहीं !

हंसाबाई—(रावबहादुरांस) आपल्यासारख्यांनां असला शोक असणं भूषणावहच समजलं पाहिजे. आपण मोठे विद्वान्, मार्मिक व रसिक आहांत असं मीं ऐकलं आहे.

रावबहादुर—(आनंदानें) असें कांहीं नाहीं, असें कांहीं नाहीं ! परंतु मला हा आपला थोडाबहुत नाद आहे झालें. आमच्यासारख्या मोठ्या लोकांना हें भूषणावह आहे म्हणूनतर त्या गवयाला मीं गाणें शिकविण्यास ठेवला आहे. त्याचप्रमाणें हंसाबाई, संगीतसमाजाचा मेंबरहि मी नुक्ताच झालों आहें. (हंसाबाईच्या हातांतील आंगठीकडे पाहून) अहाहा ! हंसाबाई ! आपले अवयव कितीतरी सुंदर आहेत ! आपलीं बोटेंतरी किती गोंडस ! ती पहा आपली करांगुली त्या मुद्रिकेनें कितीतरी शोभायमान दिसत आहे ! तिचा आपण स्वीकार—

यशवंतराव—(स्वगत) हा बेटा आतां माझी खास फजिती करणार. (हळूच रावबहादुरांस) अहो रावबहादुर, आपल्यासारखी मोठी पदवी मिळविलेलीं माणसें आपण बक्षीस दिलेल्या वस्तूचा नामनिर्देशहि करित नसतात. उलट ती आपण दिली नाहीं असेंच भासविण्याचा यत्न करितात. त्या आंगठीकडे आतां आपण अगदीं पाहूंच नका कसें !

रावबहादुर—(यशवंतरावास हळूच) हो हो ! हेंच बरोबर आहे. मी आतां मुळींच त्या आंगठीकडे पहाणार नाहीं. यशवंतराव, तुह्मीं मला हें अगोदर सुचविलें असतेंत तर ठीक झालें असतें. (हंसाबाईच्या हातांतील आंगठीकडे टक लावून) अरेरे ! त्या शिंच्या गवयानें ऐन वेळेस घोंटाळा केला.

हंसाबाई—रावबहादुर, आपलं सारं लक्ष्य माझ्या आंगठीकडे लागलं आहेसं दिसतं; आपणास ती आवडली असावी—

रावबहादुर—(गोंधळून यशवंतरावाकडे पहात) होय–होय. मला ती फार आवडली ह्मणूनच तर ती मी–नाहीं नाहीं—पण हंसाबाई ती फार मौल्यवान्—

यशवंतराव—(स्वगत) पुन्हा हा मूर्ख येरे माझ्या मागल्या करूं लागला ! (उडवाउडवी करून) रावबहादुर ! आपल्याला आतां उशीर होईल. चला, चला ! आटपा लवकर.

रावबहादुर—पण त्या गवयानें घोटाळा केला हो. (हळूच) शिंच्याचा अजून पत्ता नाहीं. (हंसाबाईस) बाईसाहेब ! आपल्यासाठीं हा आपला दासानुदास काय पाहिजे तें करण्यास सिद्ध आहे. आपण आपल्या अलौकिक सौंदर्यानें मला अगदीं वेडाच करून टाकिलें आहे. आपण आपल्या कृपाकटाक्षानें या दासाला पहाणार नाहीं तर कांहीं याची धडगत दिसत नाहीं. माझें प्रेम—

(इतक्यांत क्रुद्ध झालेली म्हाळसा पुढें येते. तिला पहातांच सर्व दचकतात.)

म्हाळसा—अहाहा ! काय पण प्रेमाला उत आलाय हो ! मेली माणसाला अगदींच कशी लाजलज्जा नाहीं ! या वयांत हे असले चाळे शोभतात तरी का? (हंसाबाईकडे वळून) आणि बाईसाहेब ! माझ्या घरीं येऊन माझ्या नवऱ्याला मोहनी घालून भुरळविणं हें आपल्यासारख्या शिकल्यासवरलेल्या स्त्रीला शोभतं का?

हंसाबाई—(ओशाळून यशवंतरावास) हें काय वरं ? इथं आणून आपण व्यर्थ माझी विटंबना मात्र करविलीत. या फटकळ बाईचं बोलणं मला निष्कारण ऐकून घ्यावं लागलं ? (रागानें निघून जाते. तिच्या मागोमाग यशवंतरावहि जाऊं लागतो.)

रावबहादुर—(खजील होऊन यशवंतरावास हात जोडून) अहो यशवंतरावजी, कृपा करून त्या हंसाबाईंची आपण समजूत घाला, व त्या मला क्षमा करतील असें करा. माझा (म्हाळसाबाईकडे बोट दाखवून) हिच्यापुढें अगदीं नाइलाज आहे ! (यशवंतराव गेलासें पाहून) अग ए चांडाळणी ! तूंतर अगदीं माझ्या राशीलाच बसली आहेस ! माझ्या पाहुण्यांचा असा अपमान करण्याला

तुला लाज कशी नाहीं वाटली, अवदसे! त्या हंसाबाईच्या खेटराची
येणार आहे? तूं काय समजली आहेस, मी जर नांवाचा रावबहादुर
तर तुला नाक घांसायला लावीन तिच्यापुढें !

म्हाळसा—अग बाई बाई ! मीतर अगदींच घाबरून
खेटर बसला आहे तिच्यापुढं नाक घासायला ! मसणांत का जाई


रावबहादुर—चूप रहा चांडाळणी ! तोंडास तोंड द्यायला
नाहीं वाटत ?

म्हाळसा—अहाहा ! दिवे ओवाळा दिवे !

रावबहादुर—चल चालती हो माझ्यासमोरून ! (तिला
गेली एकदाची पिडा ! ही ब्याद इतक्यांत परत आली कशी !
रंगांत कीहो भंग केला ! माझ्या त्या मनमोहिनीला मी आपलें प्रे
करून दाखविणार तोंच ही चांडाळीण कशी दत्त म्हणून उभी रा
नाहीं. आमचा बेत कुणींतरी हिला कळविला. तपास करतों आ

[रागारागा

[पडदा पडतो.]



रावबहादुर—चंपू रहा चांडाळणी !

रावबहादुर—काय शिंचे हे लोकतरी तर्कटखोर आहेत हो! ह्मणे, माझा बाप फेरीवाला होता! हरामखोरांनां प्रत्यक्ष आमच्या वडिलांविषयीं असें खोटें नाटें पिकविण्याला शरम कशी नाहीं वाटत?

पांग्या—तोबा! तोबा! बडी अफसोसकी बात है? आपके वालीदको कूचागश्त कहते हैं? हमारे दोस्तकी बदनामी करनेवालोंकी हम हड्डी तोड डालेंगे! वोह सौदागर बन गये इसमे इन लोगोंका क्या नुकसान हुवा?

रावबहादुर—ह्मातारे बावा, तुमची माझी ओळख झाली हें फार चांगलें झालें. आमचे वडील थोर सरदारकुळांतले होते याला आतां चांगलाच पुरावा मिळाला.

पांग्या—येह सब सच है. और हम तमाम दुनियाभरमे येही जाहीर करसक्ते हैं!

रावबहादुर—असें कराल तर आपले मजवर फार उपकार होतील. आपल्या भेटीनें मला फार आनंद झाला आहे.

पांग्या—अजी जनाब रावबहादुरसाहाब! आपके वालीद-क्या कहूं बडे नेक अशराफ शख्स थे. हमने बोहोत मुसाफरी कियी, मगर उसके काबील कोई शख्स हमने नहि देखा!

रावबहादुर—काय ह्मणतां? आपण पुष्कळ प्रवास केला आहे?

पांग्या—जी! बोहोत सफर कियी, तमाम हिंदुस्तान घूमे. (हळूच) आपको एक बात कहेनेकी है.

रावबहादुर—खरेंच कीं काय! सांगा, सांगा तर मग.

पांग्या—आपके गांवमें दहीपूर रियासतवाले हमारे महाराजके बडे शाहजादा कुमार ठकारसिंगजी तशरीफ ले आये हैं. वोह छत्रीय है, आप जानते होंगे.

रावबहादुर—होय, आमचे मित्र यशवंतरावजी यांचेकडून मला हें समजलें; आह्मीं उभयतां महाराजांच्या दर्शनाला येण्याचा बेत केला होता; इतक्यांत आपण इकडे येणार असल्याचें समजलें. पण आपण यशवंतरावांबरोबर इथें येणार होतां नाहींका?

पांग्या—(उडवाउडवी करण्याच्या हेतूनें) येह गांवमें तमाम लोग हमारे कुमारजीको चाहते हैं, और मिलनेकोभी आते हैं. हमारे छोटे महाराज बडे शान व शौकतसे मुसाफरी पर निकले हैं. आप जानते होंगे, हमभी उनके मुलाझीम खास हैं.

रावबहादुर—आपल्यासारख्या थोर मनुष्यांस इथें येण्याची तसदी पडली याची क्षमा करावी. आपण—

पांग्या—(हंसत) नहीं नहीं जनाब ! हम और मतलबसे आये हैं. आपको कोई खुबसूरत लडकी है ?

रावबहादुर—(आश्चर्यानें) होय, माझी मुलगी फार सुंदर आहे खरी; पण त्याचें काय ?

पांग्या—(डोळे मिचकावून व किंचित् हंसून) येही तो है ! आपके लडकीपर तो शाहजादासाहेब फरेफ्ता होरहे हैं. और आपका दामाद होने चाहते हैं !

रावबहादुर—काय ! दहीपूरच्या महाराजांचा पुत्र माझा जांवई होऊं इच्छितो ! खरेंच का पण आपण सांगतां हें ?

पांग्या—सुन लीजिये जनाब ! आज सुबोहको हम सब घोडेपर सवार होके शिकार करने गये थे. वहांसे लोटते वख्त कुमारसाहाब हमको फारसीमें कहने लगे "आँ दुख्तर बिसयार हसीन अस्त." हमारे साथ और एक शख्स थे उनको कुमारसाहाव कहने लगे, रावबहादुर पर्वतरावकी लडकी परीकी मिसाल है. "हूरे बिहिश्त अस्त," याने रंभा.

रावबहादुर—काय ! माझ्या मुलीला कुमारसाहेब रंभा ह्मणाले ?

पांग्या—बेषक ! उसी वख्त हमने कुमारसाहाबको कहाके रावबहादुर हमारे बडे दोस्त हैं. कुमारसाहाब बोले "मन ऊरा अझदिल् अझीझ मी दानम."

रावबहादुर—खरोखर फारसी भाषा फारच मजेची आहे ह्मणायची !

पांग्या—उर्दूसेभी बडी उमदा है. रावबाहादुर, सनसकुरत और दूसरी सब जबाने तो फारसीसे निकल पडी हैं. अझदिल् अझीझका मतलब हम दिलसे प्यार करते हैं.

रावबहादुर—ह्मणजे प्रियकरणी असाच अर्थ ना ?

पांग्या—जी! अब हमारे कुमारसाहाब सगाई करनेके पेश्तर आपको सरदार बनाने चाहते हैं. जब आप येह बडा खिताब 'राजा फतेहे धुडिमसंग बहादुर साद अलरिंद' का पा जायेंगे, तब कुमारसाहाबसे दरज्जेमे हमसरी हो जायगी, और उनको आपका दामाद होनेमे कुछ शर्मदामनगीर न होगी.

रावबहादुर—(आनंदानें आपल्याशींच) मी आपला या रावबहादुरीच्याच घमेंडींत होतों! आणि ही रावबहादुरी मिळविण्यालातरी मला केवढी यातायात करावी लागली! बरें, आतां पहा, देव द्यायला निघाला तों एवढी मोठी सरदारीची पदवी आपोआप घरीं चालत आली आहे!

पांग्या—'राजा फतेहे धुडिमसंग बाहादुर साद अलरिंद' येहे खिताब इतना बडा है, के उसके आगे आपके रावसाहाब और रावबहादुर वघैरा खिताब क्या चीज है! येहे आला दरज्जेका खिताब है. हमारे रियासतमें बडे बडे सरदारोमें फक्त दो या तीन शख्सको येह खिताब हांसील हुवा है.

रावबहादुर—तर महाराज, कृपा करून आपणच मला कुमारसाहेबांच्या दर्शनाला प्रथम घेऊन चला. मला ते एवढा मोठा मान देण्याला तयार झाले आहेत त्या अर्थी त्यांचे आभार नकोत का मानायला? (इतक्यांत यशवंतराव येतो व दिवाणजीस मुजरा करितो. त्याला पाहून) वाहवा! यशवंतरावजी, आपण फार लवकर आलां! पण या दिवाणजींची आणि आमची जुनीच ओळख निघाली! (हंसून) तुमची आह्मांला मुळीं जरूरच पडली नाहीं!

यशवंतराव—(स्वगत) बेट्या! तीतर आमचीच करामत. तूं अशीच फुशारकी मारित रहा. (उघड) रावबहादुर! आमचे काका नाशिकाकडे गेले आहेत हवा बदलण्याला, आपल्याला माहित आहेच; त्यांची प्रकृति जास्त बिघडल्याचें समजल्यावरून तार करायला जावें लागलें. त्यामुळें किंचित् उशीर झाला. आपल्या म्हणण्याप्रमाणें आपणच कुमारसाहेबांच्या बंगल्यावर त्यांच्या दर्शनाला जाऊं ह्मणजे तें बरें दिसेल. (पांग्याकडे पाहून हंसतो व लवून पुन्हा मुजरा करतो.)

पांग्या—आपके मुलाकातका हमारे शाहजादेको कमाल इश्तिआक है. अगर आप आपनी ख्वाहीश जाहिर करेंगे तो वो फौरन आपको 'राजा फतेहे धुडिमसंग बहादुर साद अलरिंद' को खितबासे सरफराझ करेंगे!

यशवंतराव—कुमारसाहेबांच्या औदार्याची आणि गुणग्राहकतेची प्रशंसा करावी तितकी थोडीच. पण त्याची इतकी घाई करण्याचें कारण नाहीं.

पांग्या—(नाखूष झाल्यासारखें दाखवून) एजी मेरे दोस्त जसवंतराम! ऐसा न कीजिये. कुमारसाहाब तो रावबहादुरके लडकीपर देखतेही आषक होगये हैं, और उसीके साथ शादी करनाही चाहते हैं. इसलिये तो रावबहादुरको

"राजा फत्तेहे धुडिमसंग बहादुर साद अलरिंद" बनाने मांगते है. इतना आला दरज्जेका खिताब मिलनेका दुनियाभरमे बडी मुष्कील होती है.

यशवंतराव—दिवाणजी, तें सगळें खरें; पण त्याबद्दल इतकी धांदल कशाला पाहिजे ? हळूहळू सर्व कांहीं होईल तें बरें.

रावबहादुर—(स्वगत) यशवंतराव, घाई न करण्याचें कारण मी समजलों! आपण मनांत मांडे खात आहां कीं माझी मंजुळा आपल्याला मिळेल म्हणून! पण गृहस्था, कुमारसाहेबांसारखा राजघराण्यांतील जांवई मिळत असतां मी तुझी डाळतरी शिजूं देईन का? (उघड) अरे पण एक लचांड आहे. ती पोरगी कुमारसाहेबांस पसंत करील काय? तिचें मन तर त्या भिकारड्या विश्वासरावावर बसलें आहे!

पांग्या—लाहोल वला कुव्वत! क्या केहते हो! हमारे कुमारसाहाब बडे खुबसूरत हैं. आपकी लडकी उनको देखतेही फौरन खुष होजायगी! क्या बडी मुष्कील है? (पडद्याकडे पाहून) ये देखिये अहेले दरबार अमीर व कबीर यहांही आते हैं. कुमारसाहाब रावबहादुरसाहाबको नझर और खिलाअत पेशकर चुके हैं, ऐसा हमको मालूम होता है. चलिये सब मिलके उनका इस्तिकबाल करेंगे!

[गडबडीनें सर्व जातात.

प्रवेश २ रा.

[**स्थल**–रावबहादुरांचें माजघर. झाळसाबाई
पोथी वाचित बसली आहे असा प्रवेश.]

दगडी—(धावत प्रवेश करून हंसतहंसत) बाईसाब बाईसाब, धनीसाब तर अक्शी भौरुप्यावानी स्वांग बनूनशी आल्याती तकड जरा पघाकी! यस्वंतराव आन् त्ये, त्या मेल्या लांब दाडिवाल्या मारवाडी शिलदारासंग कोना राजाच्या बंगल्यावर न्हवतका ग्येल? आन् पघाकी बाईसाब, आता कस स्वांग बनूनशी आल्याती ते!

झाळसाबाई—(त्रासल्यासारखें करून) काय मेलीनं वटवट लावली आहे तरी! चल जा इथून, चावट कुठली!

दगडी—न्हाई बाईसाब, देवाच्यान मी खोट न्हाई बोलत. धनीसायबानी कशी तरवार लटकावलिया,—अग बया! आन् धनीसाब सवताच हकड येत्याती न्हवका! त्ये पघा.

(डोकीस काठेवाडी मंदील, अंगांत काश्मिरी झगा व कमरेला तलवार लटकाविली आहे अशा वेषांत रावबहादुर प्रवेश करितात.)

झाळसाबाई—(विस्मित होऊन) हें आपण आतांशा मांडलं आहे तरी काय? हें काय आज नवंच सोंग आणलं आहे?

रावबहादुर—हं तोंड संभाळ, तोंड संभाळ! फटकळ कुठली! काय सांगूं, तूं माझी बायको पडलीस, नाहींतर माझ्यासारख्या वड्या उमरावाची अशी बेअदबी केल्याबद्दल काय प्रायश्चित्त भोगावें लागतें तें आतांच तुला दाखविलें असतें. (तरवार बाहेर काढून तिचें पान अजागळासारखा पहात उभा रहातो.)

झाळसाबाई—अग बाईग! काय ह्मणतां!

रावबहादुर—(मिशीवर ताव देत) मी आतां नुस्ता रावबहादुरच राहिलों नाहीं. तर 'राजा फत्तेहे धुडिमसंग बहादुर साद अलरिंद' झालों आहें, समजलीस? किताबाचें नुस्तें नांव ऐकूनच घाबरलीस वाटतें? मी कुमारसाहेबांच्या भेटीस गेलों होतों तेथें त्यांनीं अत्यंत आग्रहपूर्वक ही मोठी पदवी मला एनायत केली. आतां आलेंका तुझ्या ध्यानांत.

झाळसाबाई—नाहीं, माझ्या नाहीं तें ध्यानांत यायचं.

रावबहादुर—(ओरडून) अग आजपासून त्यांनीं 'राजा फत्तेहे धुडिमसंग बहादुर साद अलरिंद' बनवलें आहे. (नाचूं लागतो.)

झाळसाबाई—काय ह्मटलं? आपणाला त्यांनीं बनवलं? त्यांचा तरी त्यांत काय दोष? अलीकडे आपलं वर्तनच झालं आहे अशा प्रकारचं!

रावबहादुर—मूढ, गांवढळ, अडाणी कुठली! राजकुलांतील मंडळीच्या बरोबरीची पदवी आतांच मला त्या कुमारसाहेबांनीं आपल्या बंगल्यावर मोठ्या थाटानें दिली आणि तूं मला बनवलं ह्मणून म्हणतेस?

झाळसाबाई—हें काय बाई! आपणचना ह्मणायचं कीं त्यांनीं आपल्याला बनवलं ह्मणून?

रावबहादुर—(स्वगत) काय या शिंचीला करावें! (उघड) 'राजा फत्तेहे धुडिमसंग बहादुर साद अलरिंद' बनवलें. ह्मणजे मला मोठा सरदार केला, समजलीस? कुमारसाहेब इतकेंच करून राहिले नाहींत, तर आज संध्याकाळीं आपल्या सर्व इतमामासह ते स्वतः आपल्या घरीं येणार आहेत. आतां राहिलेंका तुझ्या ध्यानांत मी 'राजा फत्तेहे धुडिमसंग बहादुर साद अलरिंद' झालों आहे तें?

[नाचतनाचत पडद्यांत जातो.

म्हाळसाबाई—(कपाळावर हात मारून) देवा! यांना आतां खास वेड लागलं! यांना जाऊन अडिवलं पाहिजे, नाहींतर न जाणो एखादे वेळीं रस्त्यांत जाऊन कांहीं भलतंच करायचे!

[धावत जाते.

प्रवेश ३ रा.

[**स्थल**—रावबहादुरांचा शृंगारून सुशोभित केलेला दिवाणखाना. एके बाजूस जरीच्या बैठकीचें उंच आसन तयार केलें असून समोरच एका टेबलावर एका मोठ्या तवकांत हारतुरे ठेविले आहेत; दुसऱ्या एका तवकांत अत्तरदाणी, गुलाबदाणी इत्यादि ठेविलीं आहेत. भपकेदार पोषाख चढवून एके बाजूस पांडू व एके बाजूस कहान उभे आहेत. इतक्यांत हंसाबाई व यशवंतराव बोलतबोलत प्रवेश करितात.]

यशवंतराव—वारे वा! रावबहादुरांनींतर मोठा थाट उडवून दिला आहे. प्रिये! माझा परम मित्र विश्वासराव याला साह्य करण्याचें वचन दिल्यामुळें आपणा उभयतांस या वेळीं इथें येणें भाग पडलें; त्या दिवशीं मजकरितां आणि माझ्या मित्राकरितां तूं जो अपमान सहन केलास त्याबद्दल आह्मी दोघेहि तुझे अत्यंत आभारी आहों. इतकें केल्यासारखें हें सोंग एकदा शेवटास जाओ आणि विश्वासराव नि मंजुळा यांच्यावर एकदाच्या निर्विघ्नपणें अक्षता पडोत, म्हणजे जिंकलें. हाः हाः हाः!! कालचें स्मरण झालें ह्मणजे हंसतांहंसतां नकोसें होतें. विश्वासरावानें काल बहार करून सोडली! आणि त्याचा नोकर तो पांग्या, त्यानें तर कमालच केली! त्या बेट्यानें दिवाणजीचें सोंग इतकें कांहीं बेमालूम केलें कीं, कांहीं विचारू नकोस! रावबहादुरांचें भाषण विश्वासरावास फारसी भाषेंत समजावून देण्याचा तर त्यानें मोठा फार्सच केला. पण हेंतर कांहींच नाहीं. रावबहादुरांना 'राजा फत्तेहे धुडिमसंग बहादुर साद अलरिंद'ची पदवी देण्याचा समारंभ केला तेव्हांतर मोठीच मौज उडाली! मोठी थोरली दाढी लावलेला तो पांग्या एका हातांत मोर्चेल आणि एका हातांत धुपाटणें घेऊन गंभीर मुद्रेनें पर्वतरावांभोंवतीं नाचला काय, तोंडानें पुटपुटला काय, छे छे! फारच मौज उडविली त्यानें! शेवटीं विश्वासराव ऊर्फ नामधारी कुमारसाहेब यांनीं पर्वतरावांस पांच वेळां आपल्या तरवारीनें स्पर्श केला व आपला काठेवाडी मंदील त्यांच्या मस्तकावर ठेविला. हा एकंदर फार्स पाहून हंसें दाबून धरतां धरतां मला नकोसें झालें. फारसी

भाषेंत बोलण्याची विश्वासरावानें जी क्लृप्ति काढली आहे तीमुळें ही सर्व बतावणी बेमालूम होत आहे. (समोर पाहून) अरे, पण हे रावबहादुर आलेच ! तर प्रिये, आतां फारच जपून एकंदर बतावणी केली पाहिजे. नाहींतर एकंदर व्यूह ढांसळून भलताच परिणाम व्हावयाचा.

हंसाबाई—आपल्याला त्याची आतां काळजी नको. या कामीं आपणास मदत करण्याचा मीं पक्का निश्चय केला आहे.

(राजा फत्तेहे धुडिमसंग बहादुरच्या भपकेदार पोषाखांत रावबहादुर प्रवेश करितात.)

रावबहादुर—(स्वगत) ही एवढी मोठी पदवी मला प्राप्त झाली आहे तेव्हां आतां माझ्या योग्यतेनेंच मला वागलें पाहिजे. नाहींतर त्या पदवीचा उपयोग तो काय ? इतक्या दिवसांची गोष्ट निराळी होती; पण आतां या यशवंतरावासारख्यांजवळ सलगी ठेवणें मला योग्य होणार नाहीं.

(हंसाबाई व यशवंतराव यांस पाहून दचकतो व लवून नमन करितो. यशवंतराव त्यास आठदहा वेळां नमन करितो.)

यशवंतराव—रावबहादुर आपणास 'राजा फत्तेहे धुडिमसंग बहादुर साद अलरिंद' ही मोठी पदवी मिळाल्याबद्दल व आपली प्रिय कन्या मंजुळाबाई हिचा हिज हायनेस कुमार ठकारसिंग यांजबरोबर विवाह जुळल्याबद्दल आपलें अभिनंदन करावें या हेतूनें आम्ही उभयतां आज इथें मुद्दाम आलों आहों.

रावबहादुर—(दोन्ही हात वर करून) आपणां उभयतांस माझा आशीर्वाद आहे ! (हंसाबाईस) बाईसाहेब, मी आपला फार आभारी आहें. माझ्या त्या भांडखोर बायकोनें मागील खेपेस आपला अपमान केला त्याबद्दल मी अत्यंत दिलगीर आहें. आपण मला क्षमा करावी. मीं पाठविलेली प्रेमपत्रिका—

यशवंतराव—(मध्येंच उडवाउडवी करून) रावबहादुर, आपले भावी जामात कुमार ठकारसिंगजी यांनां यायला अद्यापि कितीसा अवकाश आहे ?

रावबहादुर—(समोर पाहून आनंदानें) ओहो ! कुमारसाहेबांनां शंभर वर्षांचें आयुष्य आहे ! त्यांचें नांव काढायला आणि त्यांनां इथें यायला एकच गांठ पडली ! (कुमार ठकारसिंगाच्या रजपूत पोषाखांत विश्वासराव आपल्या दरबारी मंडळीसह प्रवेश करितो. त्याच्याकडे बोट दाखवून) हंसाबाई, पाहिलेंत का ? याच नरश्रेष्ठास माझ्या मंजुळेचें मी आज कन्यादान करणार आहें.

(रावबहादुर, यशवंतराव, पांडू, कहान इत्यादि सर्वजण विश्वासरावास मोठ्या अदबीनें मुजरे करितात.)

यशवंतराव—ठकारसिंग महाराजांचा जयजयकार असो ! महाराजसाहेब! आह्मी सर्व आपले बंदे नोकर आहोंत. (बाजूस पाहून हंसतो.)

रावबहादुर—(मोठ्या धांदलीनें) अरेरे ! ते वुद्ध दिवाणजी कसे कुठें दिसत नाहींत? कुमारसाहेबांस आमचें बोलणें आतां कोण समजावून सांगेल? कुमारसाहेबांनां फक्त फारसी भाषा नामी येते आणि आम्हांलातर त्यांतलें एक अक्षरहि ठाऊक नाहीं ! आतां कसें करावें ? (यशवंतराव व हंसाबाई यांच्याकडे बोट दाखवून) कुमारसाहेब, हे गृहस्थ मोठे विद्वान् आहेत, त्याचप्रमाणें या बाईहि मोठ्या सुंदर आणि विदुषी आहेत. (विश्वासराव कांहींच न समजल्यासारखें करून रावबहादुरांकडे पहात रहातो.) अरेरे ! दुसरा कुणी दुभाषाहि नाहीं. मोठीच पंचाईत झाली! कुमारसाहेब ! आपले ते दिवाणजी कुठें गेले ? (इतक्यांत दिवाणजीच्या वेशानें पांग्या दाढीवर हात फिरवितफिरवित प्रवेश करितो. त्यास पाहून) खांसाहेब ! दिवाणजी ! आपण होतांतरी कुठें ? आपण नसल्यामुळें आह्मांला भाषण करण्याची पंचाईत पडली आहे ! (यशवंतराव व हंसाबाई यांच्याकडे बोट दाखवून) कुमारसाहेबांस सांगा, ही आमच्या गांवांतील उमराव मंडळी महाराजांस मुजरा करण्याकरितां आली आहे. (पांग्या त्यांच्याकडे पाहून नम्रतेनें हंसल्यासारखें करितो.) दिवाणजी, कुमारसाहेबांला हें फारसी भाषेंत सांगण्याची मेहरबानी करा.

पांग्या—(विश्वासरावाकडे पाहून अदबीनें) इन कुफंनम शख्स व गुफंतम् बेगम् खुश शेहेर ये उमराव अश्ता गरशम् बेदशम् खुश अंदम् बदनम् !

विश्वासराव—मन बिस्यार खुश शुदाह अम् !

रावबहादुर—(यशवंतरावास) पाहिलेंत फारसी भाषा कशी गोड आहे ती ?

पांग्या—कुमारसाहाब की तमन्ना दिली है. के आपके और कुमारसाहाबके खानदानसे रिश्ते कराबतदारी पयदा हो !

रावबहादुर—अहाहा ! केवढें हें सौंदर्य या भाषेमध्यें ! माझी कसली कर्तबगारी ! छे ! हें सर्व यांचेच उपकारांचें फल होय.

यशवंतराव—खरोखरच !

पांग्या—कर्तबगारी नहीं जी ! कराबतगारी याने सगाइ—

[इतक्यांत जरीचा शालू नेसून मंजुळा लाजत लाजत प्रवेश करिते व हंसून खालीं मान घालून उभी राहते.)

रावबहादुर—ये, मंजुळे इकडे ये. अशी लाजतेस कां ? या कुमारसाहेबांजवळ उभी रहा. मला पाहूं दे कसा जोडा शोभतो तो ! हे तरुण कुमार-

साहेब रजपूत घराण्यांतील असून अस्सल क्षत्रिय आहेत. त्यांनीं तुला मागणी घातली आहे. यांच्याशीं शरीरसंबंध झाल्यानें आपल्या कुळासहि मोठेपणा येणार आहे. मुली, इतके दिवस तुला मीं अविवाहित ठेविली, पण आज त्याचें सार्थक्य झालें. तुझ्या योग्य पती आज तुला आपण होऊन शोधित आला!

विश्वासराव—(मंजुळेस) चे रूये जेबास्त! के माहे कमाल अझचेहेरे मुनव्वरश वसबब खिजालत हिलाल गरदिदाह!!!

रावबहादुर—(वेड्यासारखा पाहत) काय हिलाल मागवूं? मी ब्यान्ड, चौघडे वगैरे वाजंत्रीं मागविण्याच्या भानगडींत पडलों नाहीं. कारण मी सुधारक मंडळीमध्यें फिरतोंसवरतों, व ते मला नांवें ठेवितील ह्मणून भितों. पण कुमारसाहेबांची इच्छा असेल तर हिलाल मागवितों!

पांग्या—(मोठ्यानें हंसून) राजाफत्तेहेधुडिमसंगबहादुरसादअलरिंदराव-बहादुर पर्वतराव—आप समझे नहीं! कुमारसाहाब फरमातें है, के ये क्या अच्छी सूरत है के चौदमी रातका चांद उसके चेहेरेके हुस्नको देखकर शर्मसे घटकर हिलाल होगया, याने कम हुवा.

रावबहादुर—(ओशाळून स्वगत) कोण माझी फजिती ही! यापेक्षां मी बोललों नसतों तरी बरें झालें असतें. (उघड) असें, असें! मला फारशी शिकण्याकरितां एक मुनशी उद्यांपासून जरूर ठेवलाच पाहिजे.

पांग्या—रख लिजिए हमारे मुनशी मिरझाकुफंतकअबदुलगुफंतम नबाब बहादुर आपको अच्छी तअलीम देवेंगे.

रावबहादुर—फार उत्तम आहे. मीं तसेंच करीन. (हात जोडतो.)

पांग्या—(कुमारास) राव बहादुर अझ कुनशको तशरीफ गुरनवश मन बिसयार खुश आवरश मरा हफते गरश्त!

रावबहादुर—वा! रे वा! भाषा कशी मजेची आहे. नाहींतर आमची घमळू मराठी, अगदींच पचपचीत!

विश्वासराव—(रावबहादुरांस) रावबहादुरराजाफत्तेहेधुडीमसंगबहादुर सादअलरिंदबिसयारआकेलमंद अस्त. (मंजुळेकडे बोट दाखवून) इन दुख्तर बिसयार आकेलमंदअस्त.

पांग्या—कुमारसाहाब फरमाते है, के आपकी लडकी बोहोत आकेलमंद है. और आपभी बडेलायक है! (मंजुळा लाजल्यासारखें करून चोरट्या दृष्टीनें विश्वासरावाकडे पहाते.)

रावबहादुर—(हात जोडून) हीतर आपलीच मेहेरबानी ! (मंजुळेकडे पाहून) मुली, चल हो तयार ह्या कुमारसाहेबांस माळ घालण्यास—

मंजुळा—(मुरका मारून व हंसून) बाबा, मला क्षमा करा. अज्ञानामुळं मीं आजवर आपलं ऐकलं नाहीं, आपल्या मर्जीविरुद्ध वागल्यें, आतां त्याचा मला पश्चात्ताप होत आहे. तुम्ही माझे जन्मदाते, तुह्मी जें कराल तें माझ्या कल्याणाचंच असलं पाहिजे. यापुढं आपल्या आज्ञेबाहेर मी मुळींसुद्धां जाणार नाहीं.


हंसाबाई—शाबास, मंजुळाबाई, शाबास ! अशी आज्ञाधारक मुलगी मीं कधींच पाहिली नव्हती.

रावबहादुर—(मंजुळेला आनंदानें कुरवाळून) मंजुळे, तुझी ही आजची वृत्ति पाहून मला पराकाष्ठेचा आनंद होत आहे. ईश्वरानें तुझ्यासारखी आज्ञाधारक मुलगी मला दिली याबद्दल मी आपणास धन्य समजतों. चल ये लाडके ! आतां विलंब न लावितां मला कुमारसाहेबांच्या हातांत तुझा हात घालूंदे. (मंजुळेचा हात धरून तिला विश्वासरावाजवळ नेतो. तोंच म्हाळसाबाई कावऱ्याबावऱ्यासारखी प्रवेश करून मंजुळेच्या हातास हिसडा देते.)

म्हाळसाबाई—(संतापानें) हें आपण मांडलं आहे तरी काय ? अगबाई ! या भिकारड्या मारवाड्याला का तुम्ही ही माझी नक्षत्रासारखी पोरगी देणार ?

रावबहादुर—(स्वगत) ही पिडा इथें कशाला आली ? आतां मात्र धड गत दिसत नाहीं. (मोठ्यानें) अग ए चांडाळणी ! जीभ आटोप. तूं कुणापुढें हें बडबडत आहेस ? थोरांमोठ्यांपुढें कसें वागावें हेंतरी तुला समजतें का ? मंजुळेचें लगीन करा, मंजुळेचें लगीन करा, ह्मणून माझ्या कानींकपाळीं सारखी ओरडत होतीसना आजवर ? तर हा पहा तिच्यासाठीं कसा छानदार राजबिंडा नवरा आणला आहे शोधून ! हा संबंध घडून येण्याला मी लायक व्हावें म्हणूनतर महाराजांनीं मला 'राजाफत्तेहेधुडिमसंगबाहादुरसादअलरिंद' ही मोठी पदवी दिली आहे. आतां यांचा श्वशुर होण्याला मी सर्वथैव योग्य झालों आहें. (पांग्याकडे बोट दाखवून) हे वृद्ध गृहस्थ या राजपुत्राचे दिवाणजी आहेत. यांची माझी पूर्वीची ओळख निघाली. आमचे वाडवडील सरदार होते याबद्दल यांच्याजवळ भरपूर पुरावा आहे. आमच्या वडिलांचे हे मोठे दोस्त—

पांग्या—(दाढीवर हात फीरवून) इनशाल्ला ! बडे दोस्त. बेशक, हम सब जानत है के आप सरदारझादाह हैं.



रावबहादुर—चल ये लाडके ! आतां विलंब न लावितां, मला कुमारसाहेबांच्या हातांत तुझा हात घालूं दे. [अंक ५ वा, प्रवेश ३ रा,

CHITROTT3UK P. BOMBAY पृष्ठ १०]

रावबहादुर—या दिवाणजींनीं दुभाष्याचें काम केलें ह्मणूनतर मला कुमारसाहेबांबरोबर बोलतां आलें. नाहींतर मोठी मुष्कील पडली असती, मुष्कील! बरें, झालें तें झालें, आतांतरी यांच्या शिफारशीनें जांवईबुवांचा क्षेमसमाचार विचारून घे पाहूं? आतां तुलाच त्यांचें आदरातिथ्य केलें पाहिजे, समजलीस?

म्हाळसाबाई—करत्यें बरं! अहो दाढीवाले गारुडीबुवा! तुह्मांला मी साफ सांगत्यें कीं, प्राण गेला तरी या तुमच्या राजाला ह्मणून मी आपली मुलगी देऊं देणार नाहीं. इकडे लागलं आहे वेड; तुह्मी कांहीं यांच्या नादीं लागूं नका. या आपल्या राजेसाहेबांनां घेऊन इथून बऱ्या बोलानें जा कसे! (रावबहादुरांकडे तोंड फिरवून) तुमचं डोकं ठिकाणावर आहे का? मराठ्याची मुलगी या असल्या मारवाड्याला दिल्याचं आजवर कुणीं ऐकलंतरी आहे?

रावबहादुर—हो! मोठे मराठे मराठे घेऊन बसलीस! मी आहें सुधारक. मी असल्या मूर्खपणाला कधींहि जुमानणार नाहीं. क्षत्रिय रजपूत कुळांतील राजघराण्याशीं संबंध अनायासें जुळून येत असतां अशा क्षुल्लक अडचणी उभ्या करून तो फिस्कटवून टाकण्याइतका मी मूर्ख नाहीं, समजलीस?

यशवंतराव—म्हाळसाबाई, हा असा राजघराण्यांतील जांवई आपण होऊन घरीं चालत आला असतां तुम्ही अशा दुराग्रहानें त्याचा अव्हेर कां बरें करतां?

हंसाबाई—आपल्या कन्येला जर हा पति पसंत आहे तर मग आपणच व्यर्थ आड कां येतां? असा सुंदर व तरुण राजपुत्र नवरा कुणाला आवडणार नाहीं? आजकालच्या मुलींनां ह्या गोष्टी शिकवायला नकोत बरं म्हाळसाबाई!

म्हाळसाबाई—(संतापानें मंजुळेकडे पाहून) काय ह्मणतां? या मारवाड्या-बरोबर लगीन करण्याला माझी मंजुळा कबूल आहे? मला वाटतं, मीं आपलं बोलणं बरोबर ऐकलं नसावं? माझे कान फुटलेतर नाहींतना?

यशवंतराव—म्हाळसाबाई, अशा निष्कारण रागावूं नका. पर्वतरावजींनीं जेव्हां फारच आग्रह धरिला व जेव्हां कुमार ठकारसिंगजी यांस मंजुळेनें खुद्द पाहिलें, तेव्हां ती वडिलांची आज्ञा मान्य करण्यास एकदम सिद्ध झाली यांत फारसें नवल नाहीं.

हंसाबाई—(हंसून) आणि म्हाळसाबाई, आईबापांची आज्ञा पाळणं हें मुलांचं कर्तव्यच आहे, तशांतून ती चांगली शिकली सवरलेली आहे. तिला सारं कळत असलंच पाहिजे!

म्हाळसाबाई—(चवताळून मंजुळेच्या अंगावर जाते.) कायग ए कारटे ! तूंहि पण यांच्या नादाला लागलीस का? त्या विश्वासरावावरचं प्रेम इतक्यांतच मावळलं वाटतं! कायतरी बाई चमत्कार! अलीकडच्या या शाळेंत जाणाऱ्या पोरींनीं अगदींच ताळ सोडला! बाई! बाई! शर्थ झाली!!

यशवंतराव—या ठकारसिंगजीसारख्या राजकुमाराच्या प्रेमापुढें त्या भिकारड्या विश्वासरावाच्या प्रेमाची काय मातब्बरी आली आहे! संस्थानिकांचें ऐश्वर्य कुणीकडेस आणि तो कफल्लक विश्वासराव कुणीकडे!—भलतेंच— ?

म्हाळसाबाई—(रागानें) नाहीं, नाहीं, वचनसुपारी देऊन चुकलों असतांना मी त्या बिचाऱ्या विश्वासरावाचा अशा रीतीनें विश्वासघात करूं देणार नाहीं!

रावबहादुर—(स्वगत) काय शिंचीनें वटवट लावली आहे! (मोठ्यानें) अग ए! त्या जिभेला आतां जरा विसांवा दे! प्रत्यक्ष ब्रह्मदेवाच्यानेंहि आतां हें लग्न मोडवणार नाहीं, मग तूं उगाच तडफडतेस कशाला?

म्हाळसाबाई—(मोठ्यानें) अस्सं का! मीहिपण सांगत्यें कीं, प्रत्यक्ष ब्रह्मदेव आला तरीदिखील हें लग्न मी होऊं देणार नाहीं. कायग ए पोरटे! तूं बऱ्या बोलानं इथून आंत जाते आहेस कीं नाहीं?

मंजुळा—(भीतीनें) आई, पण—

म्हाळसाबाई— पण नाहीं नि बीण नाहीं! तूं इथून चालती हो! तूं आपलं तोंड दाखवूं नकोस मला. द्वाड, अवलक्षण कारटी कुठली!

रावबहादुर—तूं कोण तिला जा किंवा रहा म्हणून सांगणार? तुला पाहिजे असेल तर तूं इथून खुशाल काळें कर.

म्हाळसाबाई—(संतापून) कां बरं? मी कोण म्हणजे? मी तिची आई.

पांग्या—(पुढें जाऊन अदबीनें) बाईसाहाब, नहीनही अब रानीसाहाब आपकू—

म्हाळसाबाई—मेल्या लुबऱ्या! दाढीवाला बोकड मेला! तूं रे कशाला मधीं येतोस?

पांग्या—राजाफत्तेहेधुडिमसंगबाहादूरसादअलरिंदरावबहादुरकेरानीसाहाब आपको कुछ मुझे तन हायीमे राझ झाहेर करता है.

म्हाळसाबाई—मेल्या, मला तुझं साफ ऐकायला नको. यांनीं ऐकलं तेवढं पुरे झालं. तुझ्यामुळंतर मेल्या हा सगळा सत्यनाश होत आहे! जळलं मेल्याचं लक्षण. चल, इथून चालता हो.

पांग्या—(रावबहादुरांस) रानीसाहाब, अगर एक बात मेरी सुनकर आप कबूल करेंगे तो सब मरहले तय हो जायेंगें.

म्हाळसाबाई—पण मला करायचं आहे काय तुझं ऐकून?

पांग्या—(जरा जवळ जाऊन) एजी सरकार, जरा बंदेको सुन तो लिजीए!

रावबहादुर—(पाय आपटून) अग ए चांडाळणी! हे वृद्ध दिवाणजी काय सांगतात तें ऐक? ऐकायला तुझें काय गेलें? शुद्ध त्राटिका जशी!

पांग्या—(म्हाळसाबाईच्या अगदीं जवळ जाऊन) बाईसाहाब! जरतन हायेमे तशरीफ लायीये इस्का राझ तो सूनिए.

म्हाळसाबाई—(त्रासून) मेल्यानं जसं कांहीं कपाळ उठिवलं आहे! चल, सांग पाहूं काय एकदा सांगतोस तें?

[किंचित् बाजूला जातात.

पांग्या—(हलक्या स्वरानें) आवो म्हाळसाबाई, असं येड्याबानी का करत्याशी? इक्ता येळ मीं डोळ्यानं खुनावल पर तुमच अक्षी ध्येनच न्हे! मल्ली अजूनबी वळकलं न्हे? कसल राज आन् कसल दिवानजी घेऊनशेनी बसल्याशी! यजमानाच मन वळवाया या पांग्यान ही युगुत काढली युगुत! जरा न्ह्याळून पगा की कोन हायेत कुमार त्ये!

म्हाळसाबाई—(कुमारसाहेबांकडे न्याहाळून पहाते व हंसते) अस्सं काय? तरी म्हटलं हें काय गौडबंगाल आहे! आतां आलं माझ्या ध्यानांत.

पांग्या—इश्वासरावांची पटली का आतां वळक? पन बाईसाब, रावभादुरांस्नी कळल तर समद बिनसून जाईल पगा. द्या, रुकार द्या की मंजुळाबायच्या लग्नास्नी आतां!

म्हाळसाबाई—(यशवंतरावाजवळ जाऊन मोठ्यानें) यशवंतराव, तुम्हीच सांगा, एकवार त्या विश्वासरावाला वचन देऊन चुकल्यावर आतां मी या कार्याला संमती कशी बरं देऊं? लोक मला म्हणतीलतरी काय? नाहीं, मी नाहीं ऐकायाची—

रावबहादुर—(गयांवयां करून हलक्या आवाजानें) हें पहा, मी पाहिजेतर तुझ्या पायां पडतों, पण माझी अशी ऐन वेळीं फजिती करूं नकोस.

ह्माळसाबाई—पण विश्वासरावांची समजूत कशी करतां येईल? हे तुमचे यशवंतराव त्या विश्वासरावाची समजूत घालायचं कबूल करित असतील तर मग मी कांहीं हरकत घेणार नाहीं. तुमच्यापुढं माझा अगदीं नाइलाज झाला.

यशवंतराव—होय तें मजकडे लागलें! त्यांची समजूत करण्याचें काम माझें. त्याची म्हाळसाबाई तुम्हांला मुळींच काळजी नको!

ह्माळसाबाई—मग माझी हरकत नाही.

रावबहादुर—(आनंदानें) शाबास! आज तूं माझी अब्रू राखलीस. (पांग्याकडे बोट दाखवून) हे वृद्ध दिवाणजी तुझी तेव्हांच समजूत घालतील अशी मला खात्रीच होती. (गडबडीनें) हं, यशवंतराव! मग आतां विलंब कां? उपाध्येबुवांनां बोलवा. हा आजचाच सुमुहूर्त साधला पाहिजे. आपल्या योग्यतेप्रमाणें जांवईबुवांनां फूल नाहीं पण फुलाची पाकळीतरी दिलीच पाहिजे. यशवंतराव, पण हें सगळें मागाहून केलें तरी चालण्यासारखें आहे, नाहीं का?

यशवंतराव—त्यांत काय आहे मोठेंसें! अगोदर कार्यंतर उरकून घ्या. (ह्माळसाबाईस) असे राजघराण्यांतील जांवयी नेहमीं मिळत नसतात! पण म्हाळसाबाई, आम्हां उभयतांविषयीं व विशेषतः हंसाबाईसंबंधीं जो कुतर्क आपल्या मनांत वागत आहे, तो समूळ निघून जावा म्हणून आम्हीदेखील त्याच उपाध्येबुवांकडून याच सुमुहूर्तावर विवाह करून घेतों.

ह्माळसाबाई—(आनंदानें) यालाहि माझी पूर्ण अनुमति आहे. ईश्वर तुम्हांला उदंड आयुष्य देओ!

रावबहादुर—(यशवंतरावास एकीकडे) वः! या भोळसट बायकोला फसविण्याला ही नामी युक्ति काढलीत यशवंतराव! खरोखर, आपली समयसूचकता जबर आहे!

यशवंतराव—अहो रावबहादुर, असें केल्याखेरीज हें कार्य निर्विघ्नपणें सिद्धीस जावयाचें नाहीं. तेव्हां घातली त्यांची समजूत झालें!

रावबहादुर—ठीक आहे. आतां इथें मीच सर्वांत वडील असल्यामुळें या तरुण जोडप्यांचें हस्तमेलन करितों.

(विश्वासराव आणि मंजुळा व यशवंतराव आणि हंसाबाई यांचे हातांतहात घालून त्यांनां आशीर्वाद देतो व कुमारसाहेबांजवळ जाऊन प्रेमानें उभा रहातो. पर्वतराव पाठमोरा उभा आहे असें पाहून म्हाळसाबाई दगडीच्या कानाशीं लागते व तिला पुढें आणून पांग्याच्या हातांत तिचा हात घालते. दगडी दाढीवाल्या पांग्याकडे घाबरल्यासारखें करून पहाते व हंसते.)

पांग्या—(हंसतहंसत दाढीवरून हात फिरवून) रानीसाहाब आप ये लडकी क्या दियी? मुज्को बारे एहस्सानसे हमेशाके वास्ते सर झुका दिया!!

रावबहादुर—(एकीकडे) मंजुळेप्रमाणें मला माझ्या या बायकोचीहि व्यवस्था लावितां येईल तर काय मौज होईल!

म्हाळसाबाई—(गडबडीनें) मंडळीहो! चला चला, आंत फराळाची ताटें केव्हांचीं थंड होत आहेत.

[सर्व जातात.

प्रवेश ४ था.

[**स्थल**—रावबाहादुरांची लायब्ररी.]

दौलू—(स्वगत) अर इचीभन! इक्त्यादिस व्हय व्हय बोलूनशेनी अखेरीस फुयीन दगा दिला अं! दगडी माज्या हातापुन निसाटलीच! बरं (मिशीवर ताव देऊन) ल्योका पांग्या! मला नायतर नाय, पर तूबी बसलास बोंबा मारीत! दगडीच्या पाठीपाठीशी ग्वोंडा घोलित व्हतास न्हव का? दिल्यानका न्हाई आता तुज्या हातावर तुरी! त्यो ल्योकाचा दाडीवाला बोकड त्या वाघ्री राजासंग कुठूनशी आला पघाकी! इचीभन, आन् त्या दगडीलाबी त्यो थेरडाच अक्षी गमला! हे झालतरी कस? (विचार केल्यासारखें करितो) ल्योका पांग्या! शिकार गमावलीसर गमावलीस! आता बस रडत! आन् इचीभन, हे पन ब्येस झाल. येज्या दौलू! बिट्या तुलातर दगडी न्हाईच कामाची! अर तू रावभादूरचा सगा आन् ल्योका त्येच्याच बटकुरीशी लगीन करनार व्हय? थू तुज्या जिनगानीवर! समदी दुनया थुकलकी तुज्या तोंडावर! अर पर हा फुया हकडच आला की! तर चल ल्योका, कर पोबारा.

(निघून जातो. दुसऱ्या बाजूनें रावबहादुर प्रवेश करितो.)

रावबहादुर—(स्वगत) अखेरीस माझा हेतु एकदाचा सिद्धीस गेला. मंजुळेचें लग्न दहीपूरचे राजकुमार ठकारसिंगजी यांच्याबरोबर निर्विघ्नपणें पार पडलें.

दहीपुरच्या महाराजांचा मी आतां व्याही झालों. माझ्या योग्यतेचा माणूस आतां या शहरांततरी कुणीहि राहिला नाहीं. पण या गडबडींत एक गोष्ट मात्र वाईट झाली. यशवंतरावानें या धामधुमींत हंसाबाईजवळ खरोखरच विवाह करून घेतला कीहो! माझ्या हातावर शेवटीं वाटाण्याच्या अक्षता ! ही सगळी त्या यशवंतरावाची लबाडी आहे. बरें आहे ह्मणावें, (मिशीवर ताव देऊन) पाहून घेईन! या दुःखांत समाधानाला ह्मणून इतकीच जागा आहे कीं, माझ्या मनासारखा मला जांवई मिळाला. माझ्या मंजुळेला योग्य पती मिळाला, तिचें जन्माचें कल्याण झालें. हुंडा, अहेर वगैरे आतांपर्यंत मीं कांहीं दिलें नाहीं ह्मणून ते ह्मातारे दिवाणजी वगैरे मंडळी नाकें मुरडित आहेत. मुरडोत बापडे. आतां मंजुळा आपल्या पतीसह माझा निरोप घ्यायला आली ह्मणजे तिला हे पंचवीस हजार रुपये बक्षीस देऊन आमचें घराणेंदेखील मोठें श्रीमंत आहे, असें जांवईबुवांच्या आणि त्यांच्या दरबारी मंडळीच्या प्रत्ययास आणून देतों. (हंसाबाई व यशवंतराव प्रवेश करितात त्यांस पाहून) यावें, यावें, यशवंतरावजी ! आपण एकंदरींत खरोखरच चतुर्भुज झालांत ! असो; तें राहो; पण माझी मंजुळा राजकुळांत पडली याचें श्रेय तुमच्याकडे आहे. या तुमच्या उपकारांची फेड करतां येणें अशक्य आहे. तरीपण तुह्मांस उसने दिलेले दहा हजार रुपये या आनंदाच्या प्रसंगीं मी तुम्हांस बक्षीस करितों.

यशवंतराव—रावबहादुर, या आपल्या औदार्याबद्दल आह्मी उभयतांहि आपले आभारी आहों. आपली प्रियकन्या व जामात आपला निरोप घेण्याकरितां येत आहेत, हें कळविण्यासाठीं आह्मी पुढें आलों आहों.

(विश्वासराव आपल्या नेहमींच्या पोषाखांत मंजुळेसह प्रवेश करितो. पांग्या व दगडी त्यांच्या मागून येतात. त्यांस पाहून रावबहादुर चकित होतात व संतापतात. म्हाळसाबाई दुसऱ्या बाजूनें प्रवेश करिते.)

रावबहादुर—(संतापून) अरे, हें मी काय पहातों आहें ! कुमारसाहेब कुठें आहेत ? दिवाणजी कुठें गेले ? या भिकारड्या विश्वासरावाचें इथें काय काम ? अरेरे ! दगा! दगा!! घात झाला शेवटीं! दम धरा, याबद्दल तुमच्यावर खटला करून तुह्मांला चांगलें प्रायश्चित्त देववितों. तुह्मीं या रावबहादुर पर्वतरावाला अद्यापि पुरा ओळखला नाहीं.

म्हाळसाबाई—(पुढें होऊन) तरी मी या लग्नाला रुकार देत नव्हत्यें बरं ! आतां का उगाच संतापतां ? तेव्हां तुमचाचना आग्रह चालला होता !

रावबहादुर—(रागानें) समजलों, समजलों, हें तुमचें सगळें कारस्थान मी समजलों. भिकारड्यांनो, मला अशा कपटानें फसविलेंत तर भोगा आतां आपल्या कर्माचीं फळें! (हातांतील बक्षीसपत्र फाडून टाकतो.) हुंड्यादाखल हें पंचवीस हजारांचें बक्षीसपत्र लिहून आणलें होतें तें घ्या! बरें झालें, माझे डोळे वेळेवरच उघडले! आतां मजकडून एक कवडीहि तुह्मांला मिळायची नाहीं!

यशवंतराव—रावबहादुर, आपण विनाकारण संताप करून घेत आहां. झाल्या गोष्टी विसरून जाऊन या मंगल प्रसंगीं आपण यांनां आशीर्वाद द्यावा हेंच योग्य आहे. जामातास हुंडा देण्याचा तुमचा मानस नसला तर कांहीं हरकत नाहीं. मला जे आतां आपण दहा हजार रुपये सोडलेत ते सर्व मी मंजुळाबाईंनां अहेरादाखल बक्षीस देतों.

झाळसाबाई—(पुढें येऊन) तरी मी या लग्नाला रुकार देत नव्हत्यें? इतक्या आग्रहानं लग्न लावून दिलंत आणि आतां कां असं करतां?

(इतक्यांत कहानसिंग हातांत तारेचा लखोटा घेऊन येतो.)

कहानसिंग—(यशवंतरावास) यह तार आपने नामपर आयी है.

यशवंतराव—(तार फोडून वाचल्यावर) अहो, कृपा करून मला घट्ट धरा! अगदीं घट्ट धरा! (नाचूं लागतो. रावबहादुर चकित होऊन पहात रहातात.) आतां मी हंसूं कीं रडूं? छे, छे! मला आतां हर्षवायु झाल्याविना रहात नाहीं. अहो धरा, धरा!

हंसाबाई—हें काय बाई! असं या तारेंत आहेतरी काय?

विश्वासराव—(यशवंतरावाचा हात धरून) अहो, असें काय करितां? यशवंतराव, डोकें ठिकाणावर आहेना?

यशवंतराव—हत्तिच्या! तुह्मांला नाहीं का अद्यापि समजलं! अहो, आमचे ते कृपण काकासाहेब शेवटीं स्वर्गवासी झाले. नाशिकच्या त्या महिपतराव वकिलांकडून मला ही तार आली आहे. आमचे चुलते निंबाजीराव यांच्या सर्व जिंदगीचा मी मालक झालों! ज्या कृपण काकासाहेबांनीं जिवंतपणीं एक छदामहि माझ्या हातीं लागूं दिला नाहीं, त्याच काकासाहेबांनीं आपल्या पश्चात् लाख दोन लाखांचा नव्हे तर सवासव्वीस लाख रुपयांचा मला मालक बनविलें! आतां हें त्यांचें औदार्य ह्मणावें कीं कार्पण्य ह्मणावें? आणि त्याचप्रमाणें ते निवर्तले म्हणून मीं हंसावें कीं रडावें? तुह्मीच याचा निर्णय करा. अहो! सवा-सव्वीस लाख रुपये! रावबहादुर,

राहिलें का आपल्या ध्यानांत ? सवा–सव्वीस लाख बरें ? पंचवीस लाख
एक लाख –(बोटें घालतो.) आणखी एक पावलाख !!! आतां ह
लांबलचक रकम माझ्या ध्यानांततरी कशी रहाणार ? अरे, माझी ती
तरी आहे कुठें ? लिहून ठेवतों तींत. माझें नोटबुक,
(खिसे चाचपतो.) आतां त्या खंडू बेलिफाला आणि त्या कस्तुर, नौल्
मारवाड्यांनां ह्मणावें, या, या यशवंतरावासमोर छाती असेल तर! य
मोठ्या रकमेचें मी करणारतरी काय ? आणि हे रुपये संपणारतर
छेछे छे ! आपल्यालातर कांहीं सुचतच नाहीं. (दोन्ही हातांनीं डोकें घट्ट

हंसाबाई—असं काय करायचं हें ? मी सांगत्यें आपल्याला युक्ती
अर्धी रकम अहेर ह्मणून हे आपले परम मित्र विश्वासराव यांनां द्या, अ
पंचवीस हजार रुपये या विश्वासू पांगोजीरावांस इनाम द्या.

यशवंतराव—(आनंदानें) ओहो ! योग्य वेळीं योग्य म
अगदीं योग्य सूचना आली. बस्स, अगदीं अस्सेंच करावयाचें. माझ्य
शब्द मी कधींहि वायां जाऊं देणार नाहीं. सवा–सव्वीस लाख रुपये
(इतक्यांत पांडू तारेचा दुसरा लखोटा घेऊन येतो, त्यास पाहून) आश्
ही आणखी कुणाची तार ?

पांडू—(मुजरा करून) जावयबुवांची तार आहे ही जावय
(विश्वासरावांच्या हातीं देतो. विश्वासराव ती उघडून वाचतो व आनंदाने
रावाच्या हातीं देतो व मंजुळेच्या कानांशीं लागतो.)

यशवंतराव—(तार वाचून आनंदानें) वाहवा ! आजचा दिव
विलक्षण आहे ! हा दुसरा चमत्कार पहा ! रावबहादुर, हे आपले
विश्वासराव वऱ्हाडांत असतांना यांनीं दुष्काळाच्या वेळीं जी मोठी कामगि
व औदार्य दाखविलें तिचें फळ आज त्यांनां मिळालें. रावबहादुर ऐक
सरकारानें आपल्या जामातांस रावसाहेब हा किताब देऊन त्यांचा गौरव के
ही तार विश्वासरावांच्या मुंबईच्या मित्राकडून आली आहे. (विश्वासरावास)
विश्वासराव ! आपणांस ही बहुमानाची पदवी मिळाल्याबद्दल आह्मी आपलें
अभिनंदन करितों.

पांग्या—(आनंदानें नाचतो.) व्हय् व्हय्, आमचे धनीसाव
त्या लायकीचे—रावसाहेब काय, पुन अक्षी राजेबी शोभत्याल ! (हंस

रावबहादुर—(आनंदानें विश्वासरावास आलिंगन देतो व म्हाळसाबाईकडे पाहून) शेवटीं माझ्या मंजुळेनेंहि मजप्रमाणेंच पदवीवाला नवरा पटकावला कीं नाहीं ! अग, साखरेचें खातो त्याला देव देतो ! यशवंतराव, विश्वासराव, आला का तुह्मांला याचा प्रत्यय ! माझ्यातर आनंदाला आज पारावार राहिला नाहीं !

मंजुळा—(नम्रतेनें) बाबा, आपणांसारख्या भोळ्याभाबड्या पित्याशीं आम्हीं उभयतांनीं कपटाचें वर्तन केलं त्याबद्दल आपण आह्मांस क्षमा करावी.

रावबहादुर—बाळे ! जें झालें तें झालें ! झाल्या प्रकाराबद्दल मी आतां कुणालाच दोष देत नाहीं. गतगोष्टी आपण सर्व विसरून जाऊंया. पण एवढें मात्र खरें कीं, तुमच्या या कृत्यानें आज माझे चांगलेच डोळे उघडले ! आज मला पक्केपणीं समजून आलें कीं, खरा मोठेंपणा जो आहे तो कांहीं पदवींत नसून मनाच्या थोरपणावरच विशेष आहे !

[पडदा पडतो.]

समाप्त.